सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २१ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ७९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आदिवासी समाजाच्या गावात १७ प्रकारच्या योजना राबविणार - मुख्यमंत्री

जळगाव, २० जून (हिं.स.)'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान'अंतर्गत राज्यातील आदिवासी गावांमध्ये १७ प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी करून आदिवासी समाजाचा कायापालट केला जाणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

धरणगाव येथे उभारण्यात आलेल्या क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाचे उद्घाटन व जामनेर तालुक्यातील गोद्री फत्तेपूर येथे गोर बंजारा आणि लबाना कुंभ स्मृतीस्थळी पाच कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे ई-भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धरणगाव येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण,पद्मश्री चैत्राम पवार, अनिल भालेराव, शरदराव ढोले, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतीस्मारक अत्यंत सुंदर झाले आहे. राणी दुर्गावती, भगवान बिरसा मुंडा, सिद्धू-कान्हू, तंट्या मामा, झलकारी बाई, राघोजी भांगरे, भिमा नाईक, रुमाल्या नाईक, राणा पुंजा भिल, यांच्यासारख्या अनेक नायकांचे दर्शन या स्मारकात घडते. हे स्मारक केवळ ऐतिहासिक नाही, तर येथे आश्रमशाळा असून अस्मिता जागवण्याचे कार्यही केले जाते. भविष्यात येथे महिलांसाठी कौशल्य विकास व फळप्रक्रिया प्रशिक्षण केंद्र उभारले जाईल. संस्कृती संवर्धनाचाही उपक्रम येथे राबविण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्याचा लढा सुरू केला



आणि त्यानंतर जनजाती समाजातील अनेक नायकांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. परंतु त्यांचा इतिहास दुर्लक्षित राहिला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अशा नायकांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असे श्री. फडणवीस म्हणाले.

खाज्याजी नाईक यांनी १८५७ च्या समरात भिल्ल जमातीचे ३० हजार लढवय्ये उभे करून महाराष्ट्र व मध्यप्रदेशात मोठा लढा दिला. त्यांच्या लढ्यामुळे इंग्रजांची सत्ता हादरली. इंग्लंडहून त्यांना ठार करण्याचे आदेश आले. त्यांच्यावर त्या काळी दोन हजार रुपयांचे बक्षीस ठेवले होते. त्यांनी इंग्रजांचा खजिना लुटून शस्त्र खरेदी केली. 'जिथे अन्याय, तिथे खाज्याजी नाईक' हे समीकरण बनले होते. अंबापाणीच्या लढाईत महिलांनीही शौर्य दाखवले. खाज्याजी नाईक अधिक काळ जगले असते तर कदाचित इंग्रजांना भारत सोडावा लागला असता, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'धरती आबा' योजनेंतर्गत राज्यातील आदिवासी गावांमध्ये १७ प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी होणार आहे. केंद्र शासनाने यासाठी ८० हजार कोटी रुपये मंजूर केले असून, पुढील ५ वर्षांत एकही आदिवासी बांधव बेघर राहणार नाही. त्यांना शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगार व रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

गोर बंजारा समाजाने देशभरात बावड्या, तलाव व पाणवठे उभारून समाजसेवा केली आहे. अशा समाजाच्या प्रेरणास्थळी गोद्री येथे सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

कार्यक्रमात शरदराव ढोले, अनिल भालेराव, पद्मश्री पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतीस्मारक समितीचे सचिव विलास महाजन यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना गोद्री येथील प्रसंगांवर आधारित पुस्तक भेट देण्यात आले.

खाज्याजी नाईक स्मृतीस्थळाचे उद्घाटन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाची कोनशिला अनावरण करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी स्मृतीस्थळाची पाहणी केली. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी खाज्याजी नाईक यांच्या स्मृती मंदिराला भेट देऊन अभिवादन केले.

# शुभमनसाठी संघाचे नेतृत्व करणे सोपे नसेल - रवी शास्त्री

लंडन , २० जून : भारताचा नवा कसोटी कर्णधार शुभमन गिलसाठी इंग्लंडमध्ये कसोटी संघाचे नेतृत्व करणे सोपे नसेल आणि यशासाठी त्याला संयमाने काम करावे लागेल, असे भारतीय क्रिकेट संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी म्हणलं आहे.

रवी शास्त्री यांनी 'आयसीसी रिव्ह्यू' मध्ये म्हटले आहे की, मला वाटते की त्याला वेळ द्यावा लागेल. ते म्हणाले, ते सोपे नसेल. त्याला एक कठीण काम देण्यात आले आहे. त्याला इंग्लंड



दौऱ्यावर भारतीय संघाचे नेतृत्व करावे लागेल. गिलने आतापर्यंत ३२ कसोटी सामने खेळले आहेत आणि ३५.०५ च्या सरासरीने १८९३ धावा केल्या आहेत. भारतीय संघाने २००७मध्ये इंग्लंडमध्ये शेवटची कसोटी मालिका जिंकली होती. इंग्लंडचा दौरा गिलसाठी शिकण्याची चांगली संधी असू शकतो असे शास्त्री मानतात. तो आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सचा कर्णधार आहे. हे सोपे नाही पण मला वाटते की तो खूप काही शिकेल.

विराट कोहली, रोहित शर्मा आणि आर. अश्विन यांच्या निवृत्तीनंतर भारतीय क्रिकेट बदलाच्या टप्प्यातून जात आहे. अशा वेळी, बीसीसीआयने भारतीय कसोटी संघाची कमान गिलकडे सोपवली आहे. भारतीय संघाने आजपासून इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्याला सुरुवात केली आहे

# रा.स्व. संघ ही सर्वसमावेशक संघटना : राज्यपाल राधाकृष्णन

मुंबई, २० जून : रा.स्व. संघ हे उच्चवर्णीयांची संघटना आहे हा हेतूपुरस्सर पसरवलेला गैरसमज आपल्या पुस्तकातून दूर करताना संघ ही सर्वसमावेशक संघटना असल्याची वस्तुस्थिती रमेश पतंगे यांनी आपल्या पुस्तकातून अधोरेखित केली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. लेखक व विचारवंत रमेश पतंगे लिखित 'व्हाय आर वी इन द आरएसएस?.... ' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन मुंबई येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. पूर्वी संघासाठी कार्य करणाऱ्यांना शासनात पदे स्वीकारता येत नसत, असे सांगून आज देशाचे पंतप्रधान, अनेक राज्यांचे राज्यपाल व मुख्यमंत्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्याचे राज्यपालांनी सांगितले.



देशात भूकंप, नैसर्गिक आपदा व रेल्वे अपघात होतात त्यावेळी संघाचे स्वयंसेवक नेहमीच सेवा कार्यात अग्रेसर असतात, असे राज्यपालांनी सांगितले.

उत्तर पूर्वेच्या राज्यातील लोकांना देशाच्या मुख्य प्रवाहाशी भावनेने जोडण्याचे काम रा.स्व. संघ करीत असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या स्थापनेचे शताब्दी वर्ष साजरे करीत असताना रमेश पतंगे यांचे संघावरील पुस्तक प्रकाशित होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना राज्यपालांनी लेखक पतंगे तसेच अनुवादक डॉ अश्विन रांजणीकर यांचे अभिनंदन केले.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी पुस्तकातील निवडक उतारे वाचून दाखवले तर 'आम्ही संघात का आहोत ...' या पतंगे यांच्या मूळ मराठी पुस्तकाचे अनुवादक डॉ. अश्विन रांजणीकर यांनी आपले विचार व्यक्त केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी तसेच उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी हे देखील पूर्वी संघ प्रचारक होते. रा स्व संघ आपल्या स्वयंसेवकांना भारत मातेच्या गौरवासाठी काम करण्यास सांगतो, या कारणास्तव आपण आयुष्यभर संघासाठी कार्य केले, असे रमेश पतंगे यांनी सांगितले. पुस्तकाचे भाषांतर सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये होणार असल्याची माहिती पतंगे यांनी यावेळी दिली.

रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'साप्ताहिक विवेक'तर्फे प्रकाशित या पुस्तकाला सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांची प्रस्तावना आहे.

## इस्लामिक देशांचे हँडलर हाताळताहेत काँग्रेसचा सोशल मीडिया

### आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचा दावा



दिसपूर, २० जून : इस्लामिक देशांचे हँडलर आसाम काँग्रेसतर्फे ५ हजारांहून अधिक सोशल मीडिया अकाउंट हाताळत असल्याचा दावा आसामचे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांनी केला आहे. आगामी २०२६ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आसामच्या राजकारणात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात परदेशी सहभाग असेल असा दावा मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी केला आहे. मुख्यमंत्री हिमंता यांनी यापूर्वी काँग्रेस नेते गौरव गोगोई यांच्यावरही आरोप केला होता. गौरव गोगोई पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेच्या आयएसआयच्या निमंत्रणावरून पाकिस्तानला भेट दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. गौरव गोगोई आयएसआयच्या निमंत्रणावरून पाकिस्तानला गेले होते. मी हे पहिल्यांदाच सांगत आहे. आमच्याकडे याची कागदपत्रे आहेत. गोगोई पर्यटनासाठी गेले नव्हते तर प्रशिक्षण घेण्यासाठी तिथे गेले होते. तो पाकिस्तानी आस्थापनेशी जवळून काम करत होते असा आरोप सरमा यांनी केला होता.

# ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं निधन

मुंबई, २० जून : मराठी मनोरंजन सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं गुरुवारी (दि.१९) निधन झालं आहे. लेखक, संगीत दिग्दर्शक अशीही त्यांची ओळख होती. अनेक वर्षांपासून ते इंडस्ट्रीत काम करत होते.त्यांच्या पश्चात एक मुलगी आहे. त्यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

विवेक लागू यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांना लेखन आणि दिग्दर्शनाची आवड होती. हीच आवड त्यांना मुंबईत घेऊन आली. त्यांनी रंगभूमीवरुन करिअरला सुरुवात केली. सुरुवातीला ते लेखन, दिग्दर्शन करायचे. काही नाटकांसाठी त्यांना पुरस्कारही मिळाला. शिवाय संगीतातही त्यांची रुची होती. मात्र अपघातानेच ते अभिनयाकडे वळले. विजय मेहता यांच्या शिबिरात येण्याची त्यांना संधी मिळाली होती.



मात्र त्या शिबिरात केवळ अभिनयाचेच धडे देणार होत्या. मुंबईत १ महिना फुकट राहता येणार होतं म्हणून त्यांनी शिबीर जॉइन केलं आणि अभिनय शिकले. दिग्दर्शनाची आवड असूनही त्यांनी अभिनयही चांगला केला. इतकंच नाही तर अभिनयातही त्यांनी पुरस्कार मिळवले.

विवेक लागू हे बँकेत काम करायचे. तिथे काम करता करताच ते इंडस्ट्रीतही काम करत होते. काही वर्षांनी त्यांनी नोकरी सोडली. टेलिव्हिजनवर सर्वाधिक काळ चाललेली आणि गाजलेली मालिका 'चार दिवस सासूचे' मध्ये त्यांनी काम केलं. त्यांनी शेक्सपियरची दोन नाटकंही केली. 'अगली', 'व्हॉट अबाऊट सावरकर', 'सर्व मंगल सावधान' या सिनेमांमध्ये ते होते.विवेक लागू यांनी १९७८ साली रीमा लागू यांच्याशी लग्न केलं होतं.पण काही काळानंतर दोघेही वेगळे झाले. रीमा लागू आणि विवेक यांना एक मुलगी देखील आहे, तिचं नाव मृण्मयी लागू. रीमा लागू यांनी त्यांच्या मुलीचं एकट्यानं पालनपोषण केलं. मृण्मयी लागू प्रसिद्ध लेखिका आहे. तिने 'थप्पड', 'स्कुप' सारख्या चित्रपटांचं लेखन केलं आहे. २०१७ मध्ये अभिनेत्री रीमा लागुचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. रीमा लागू बहुतेकदा बॉलिवूडमध्ये आईची भूमिका साकारताना दिसल्या.

## अमेरिकेवर ३७ ट्रिलियन डॉलरपेक्षा जास्त कर्ज, भारताकडूनही घेतले कर्ज

वॉशिंग्टन डी. सी. : अमेरिकेवर ३७ ट्रिलियन अमेरिकन डॉलरपेक्षा जास्त कर्ज आहे. अमेरिकेने भारत, चीन, जपान या आशियातील देशांकडूनही कर्ज घेतले आहे. दरवर्षी अमेरिका कर्जाचे व्याज भरण्यासाठी एक ट्रिलियन अमेरिकन डॉलरपेक्षा जास्त पैसे खर्च करत आहे. अमेरिकेच्या कर्जाबाबतची ही आकडेवारी शुक्रवार २० जून २०२५ रोजी जाहीर झाली आहे.

मागील काही महिन्यांपासून सोन्याच्या दरात वाढ होत आहे. धातू (कमॉडिटी) स्वरुपातील सोन्याचा दर सातत्याने वाढत आहे. जगभरातील ऑनलाईन व्यवहारांमध्ये वाढ होत आहे. ब्रिक्स देश स्वतःचे स्वतंत्र चलन कार्यरत करण्याचा विचार करत आहेत. काही देशांनी एकमेकांशी आयात - निर्यात करण्यासाठी फक्त एकमेकांच्या चलनाचाच विचार करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. यामुळे जगाचे अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी झाले आणि त्याचवेळी कर्जाचा भार वाढला तर अमेरिकेची अर्थव्यवस्था अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

# विशाखापट्टणमध्ये पंतप्रधानांच्या उपस्थितीत रचला जाणार विश्वविक्रम

विशाखापट्टणम: जगभरात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाणार आहे. योगाभ्यासाचे महत्त्व, आणि त्याचे फायदे जगाला कळण्यासाठी आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा केला जातो. त्यामुळे भारतातही अनेक ठिकाणी योगासनाचे कार्यक्रम आणि शिबिर आयोजन केले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर विशाखापट्टणम येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवा विश्वविक्रम रचला जाणार आहे. त्यासाठी पाच लाख लोक योगदिनात सहभाग घेणार असल्याचे म्हंटले जात आहे.

योगदिनाच्या निमित्ताने विश्वविक्रम करण्याकरिता विशाखापट्टणम समुद्रकिनाऱ्यावर मोठी तयारी करण्यात आली आहे. एकाच ठिकाणी विक्रमी पाच लाख लोक योग करू शकतील यासाठी आवश्यक अशी व्यवस्था करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण हे देखील या कार्यक्रमात सहभागी होतील. योगादिनाच्या विश्वविक्रमासाठी जय्यत तयारी

विशाखापट्टणम येथील आरके बीच ते भिमिली पर्यंत २६ किमी रस्त्यावर बॅरिकेड्स, मॅट्स, इलेक्ट्रिक लाईट्स, एलईडी स्क्रीन आणि प्रशिक्षकांसाठी प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहेत. पाऊस पडल्यास योगदिनाचा कार्यक्रम बंद पडू नये, याकरिता आंध्र विद्यापीठात पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, चंद्राबाबू नायडू सरकारच्या वतीनं राज्य स्तरावर आयोजित विविध वयोगटातील स्पर्धांमधील १७९ विजेत्यांची निवड करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात १०० कोटींचा घोटाळा

जालना : महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी राज्य शासनाने अनुदान वाटप प्रक्रिया सुरू केली. या अनुदानाच्या वाटपात १०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला. भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी हा घोटाळा उघड केला. अनुदान वाटप घोटाळा प्रकरणी दोषी आढळलेल्या २१ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. घोटाळा प्रकरणी SIT अथवा CBI मार्फत सखोल तपास करण्याची मागणी आमदार लोणीकर यांनी केली आहे.

# बँक अध्यक्ष बच्चू कडूंची अपात्रता, हायकोर्टात २४ जूनला सुनावणी

अमरावती, २० जून : अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे (एडीसीसी) अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांच्या संचालक आणि अध्यक्षपदाच्या अपात्रेबाबतच्या याचिकेची सुनावणी आता मंगळवार, २४ जून रोजी होणार आहे. या प्रकरणातील प्रतिपक्षाने आपली बाजू मांडण्यासाठी दोन दिवसांचा वेळ मागितल्यामुळे मंगळवारी नेमके काय होणार, याकडे सहकार विभागाचे लक्ष लागले आहे.

एडीसीसीचे संचालक हरिभाऊ मोहोड व इतर ११ संचालकांनी बच्चू कडू हे संचालक व अध्यक्षपदासाठी पात्र ठरत नसल्याची तक्रार विभागीय सहनिबंधक यांच्याकडे केली होती. कडू यांना नाशिकच्या न्यायालयाने एका प्रकरणात दोषी ठरवून एक वर्षाची शिक्षा ठोठावली आहे. सन २०१७ सालचे हे प्रकरण आहे. त्यामुळे बँकेच्या उपविधीनुसार ते संचालक आणि पर्यायाने अध्यक्षपदासाठी अपात्र ठरतात, असा तक्रारकर्त्यांचा युक्तीवाद होता. ही बाब ग्राह्य धरुन विभागीय सहनिबंधक यांच्या न्यायालयाने बच्चू कडू यांना दोन्ही पदांसाठी अपात्र ठरविले. अपात्रतेबाबतचा हा निर्णय गेल्या सोमवारी सार्वजनिकरीत्या समोर आला.

त्यानंतर लगेच दुसऱ्याच दिवशी बच्चू कडू यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली. विभागीय सहनिबंधकांच्या निर्णयाला या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. न्यायमूर्ती पानसरे यांच्या एकलपीठासमोर आज, गुरुवारी या याचिकेची सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान प्रतिपक्षाने दोन दिवसांचा अवधी मागितला. मुळात या प्रकरणात प्रतिपक्षानेही मंगळवारीच 'कॅव्हेट' दाखल केलेला असल्याने न्यायमूर्तींनी अवधी मागण्याचा त्यांचा मुद्दा ग्राह्य धरत पुढील सुनावणी २४ जून रोजी निश्चित केली. बच्चू कडू यांच्या वतीने या प्रकरणात ड. पराग कडू युक्तीवाद करणार आहेत. तर प्रतिपक्षाची बाजू मांडण्याचे काम ड. निलेश गावंडे करीत आहेत.

# पर्यावरण रक्षणासाठी युवकांनी घेतलेला हा उपक्रम समाजासाठी दिशादर्शक आहे - प्रा. बाबासाहेब देशमुख

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : आषाढी वारीच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत अमरावती येथील ४५ पर्यावरणप्रेमी युवकांनी प्रदूषणमुक्त भारताचा संकल्प घेऊन सायकल वारीद्वारे पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी प्रस्थान ठेवले आहे. ही जनजागृतीपर सायकल वारी गुरुवार, दिनांक २० जून रोजी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथ नगरी परळी वैजनाथ येथे मोठ्या उत्साहात दाखल झाली. यावेळी श्री वैजनाथ देवल कमिटीच्या वतीने सचिव प्रा बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते सर्वांचे पुष्पहार व प्रभुवैद्यनाथाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.



वाढते प्रदूषण, निसर्गाचा ऱ्हास आणि बदलते हवामान या पार्श्वभूमीवर समाजात जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी अमरावतीच्या युवकांनी एकत्र येत ही सायकल वारी सुरू केली. प्रभू श्री वैद्यनाथाच्या चरणी प्रदूषणमुक्त भारत या संकल्पाची त्यांनी प्रार्थना केली.

या प्रेरणादायी उपक्रमाचे स्वागत श्री वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख यांनी केले. त्यांनी सर्व युवकांचे पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते ड. मनोज संकाये, माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, इंजिनीयर मुकुंद देशपांडे, प्रकाश जोशी, पत्रकार बालाजी ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी श्री वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख म्हणाले, पर्यावरण रक्षणासाठी युवकांनी घेतलेला हा उपक्रम समाजासाठी अत्यंत दिशादर्शक आहे. निसर्गाचं संतुलन राखण्यासाठी जनजागृतीची गरज आहे, आणि ही सायकल वारी त्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे. वैद्यनाथ नगरीने नेहमीच समाजहिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले असल्याचे ते म्हणाले.

यानंतर सर्व युवकांनी प्रभू श्री वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. हर हर महादेव! वैद्यनाथ भगवान की जय! अशा जयघोषात ही पर्यावरण संदेश देणारी सायकल वारी पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासासाठी रवाना झाली.

## एअर इंडियाची ८ उड्डाणे रद्द

नवी दिल्ली, २० जून (हिं.स.) : विमान तपासणीत वाढ, खराब हवामान आणि हवाई क्षेत्रावरील निर्बंधांमुळे एअर इंडियाने आज, शुक्रवारी अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत उड्डाणे रद्द केली. प्रभावित झालेल्या उड्डाणांमध्ये दुबई, चेन्नई, दिल्ली, मेलबर्न, पुणे, अहमदाबाद, हैदराबाद आणि मुंबई दरम्यानच्या उड्डाणांचा समावेश आहे.

एअर इंडियाच्या निवेदनानुसार, दुबई ते चेन्नई पर्यंत एअर इंडियाची आंतरराष्ट्रीय उड्डाणे एआय-९०६; दिल्ली ते मेलबर्न एआय-३०८ ; मेलबर्न ते दिल्ली एआय-३०९; दुबई ते हैदराबाद एआय-२२०४ आणि पुणे ते दिल्ली पर्यंतची देशांतर्गत उड्डाणे एआय-१८७४; अहमदाबाद ते दिल्ली एआय ४५६; हैदराबाद ते मुंबई एआय-२८७२ आणि चेन्नई ते मुंबई एआय ५७१ ही देखभाल आणि ऑपरेशनल कारणांमुळे रद्द करण्यात आली आहेत.एअर इंडियाने प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे आणि त्यांच्या सोयीसाठी अनेक पावले उचलली आहेत. एअरलाइनने २१ जून ते १५ जुलै पर्यंत त्यांच्या काही आंतरराष्ट्रीय मार्गांवरील उड्डाणे कमी करण्याची आणि तीन मार्गांवरील उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्याची घोषणा केली आहे. यासोबतच, प्रवाशांना पूर्ण परतफेड किंवा मोफत रीशेड्युलिंगची सुविधा दिली जात आहे.

# आमची एकत्रित निवडणूक लढवण्याची इच्छा, पण चर्चेअंती निर्णय - शरद पवार

पुणे, २० जून - सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील महापालिका निवडणूक घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता निवडणूक लांबवता येणार नाहीत. येत्या तीन महिन्यात निवडणुकीच्या प्रक्रिया सुरू होतील. आमचा निर्णय झालेला नाही. तशी आम्ही अद्याप औपचारिक चर्चा केलेली नाही. पण, आमची एकत्रित निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. त्यामुळे काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष आणि आमचा पक्ष असे आम्ही एकत्रित मिळून निवडणुकीसंदर्भात चर्चा करू आणि अंतिम निर्णय घेऊ, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटले आहे. ते बारामतीत पत्रकारांशी बोलत होते.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार आहे. त्यासाठी सर्व पक्षांनी तयारी सुरु केली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागा वाटपावरुन अद्याप चर्चा सुरु झाली नसली तरी घटक पक्षांनी चाचपणी सुरु केली आहे. राज्यात मुंबई महापालिका निवडणूक ही सर्वासाठी महत्वाची आहे.

अद्याप महाविकास आघाडीमध्ये मुंबईसाठी कुठलीही ठोस चर्चा झालेली नाही. मात्र, महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे मुंबईत शक्तीस्थान आहे. त्याच्यामुळे मुंबईत एकत्र लढायचं का नाही ते एकत्र चर्चा करुन ठरवू, असेही त्यांनी सांगितले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कर्मयोगी लिंगायत रत्न पुरस्कार गिरवलकर यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** लातूर येथील शिवा लिंगायत युवक संघटनेच्या वतीने बार्शी रोड लगत असलेल्या गिरवलकर मंगल कार्यालयात आयोजित दुसऱ्या व्हीआयपी इव्हेंट २०२५ लिंगायत वधुवर परिचय सोहळ्यामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमात सांबप्पा गिरवलकर यांना त्यांच्या सामाजिक कार्याचा अग्रेसर असणाऱ्या शिवा लिंगायत युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील यांनी कर्मयोगी लिंगायत रत्न पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी यांच्यावर बसव मंत्रोच्चारात पुष्पवृष्टी करण्यात आली. या वेळी महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील वधुवर क्षेत्रात निस्वार्थ भावनेने काम करणारे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गिरवलकरअप्पा यांचे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूरच्या वाटचालीत बहुमोल योगदान आहे. तसेच त्यांनी विधिज्ञ म्हणून न्यायालयीन क्षेत्रात नावलौकिक कमावलेला आहे. सिद्धयोग ध्यान केंद्राच्या मार्फत अध्यात्मिक क्षेत्रातही लातूरचे नावलौकिक वाढवले आहे.

या वेळी शिवा लिंगायत युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील, प्राचार्य डॉ सिद्रामप्पा डोंगरगे, शिवराज शेटकार, कुमार स्वामी गणाचार्य, माया दयानंद पाटील, कु.मयुरी दयानंद पाटील, रुद्राप्पा दयानंद पाटील, सुहास अष्टके, नागेश कानडे, योगेश गिरवलकर,सौ माया मिसलगी,सौ,गिता शर्मा, विश्वनाथ पाटील वन्नाळीकर, महादेव स्वामी सोलापूर संबा खोत इचलकरंजी,व देशातील आठ राज्यातील व विदेशातील लिंगायत समाज व लातुरातील लिंगायत बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## शासनमान्य शाळेतच पाल्यांचे प्रवेश घ्यावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी लातूर जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश केवळ शासनमान्य शाळांमध्येच घ्यावा, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

शासनमान्यता नसलेल्या शाळांचा शोध घेण्यासाठी शिक्षण विभाग आणि जिल्हा परिषद यांच्यावतीने २३ व २४ जून २०२५ रोजी शोध मोहीम राबविली जाणार आहे. पालकांना शाळेची शासनमान्यता तपासता यावी, यासाठी सर्व तालुका गटशिक्षणाधिकारी कार्यालये आणि जिल्हास्तरावरील प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात मदतकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. पालकांनी या केंद्रांमधून मार्गदर्शन घेऊन पाल्यांचा नवीन शाळेत प्रवेश निश्चित करावा. चुकून शासनमान्यता नसलेल्या शाळेत प्रवेश झाला असेल, तर त्वरित पाल्याला त्या शाळेतून काढून शासनमान्य शाळेत प्रवेश घ्यावा. २४ आणि २५ जून रोजीच्या शोध मोहिमेनंतर अनधिकृत शाळांवर नियमानुसार कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती शिक्षण विभागाने दिली आहे. अधिक माहितीसाठी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी किंवा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) संजय क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा परिषदेचे प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी यांनी केले आहे.

## महानगर पालिकेच्या आयुक्त मीना यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे साकडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** शहरातील विविध प्रश्नांसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी महापालिकेच्या आयुक्त मानसी मीना यांची भेट घेवून चर्चा केली. मुलभूत समस्या सोडवण्याची यावेळी मागणी लावून धरण्यात आली. दरम्यान आयुक्त मीना यांचा सत्कार करण्यात आला.

शहरातील नागरिकांना मागील काही महिन्यांपासून कचरा, पाणी, पथदिवे आणि रस्त्यांवर झालेल्या चिखलामुळे मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. शहरातील पथदिवे बंद आहेत, ते सुरू करण्यात यावेत. शहरात विविध ठिकाणी कचरा साचलेला कचरा उचलण्यात यावा. अमृत योजना आणि विविध कामांसाठी शहरातील अंतर्गत रस्ते खोदण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना चालण्यासाठी अडचणी येत आहेत. त्या ठिकाणी मुरुम टाकण्यात यावा. अनेक भागातील नागरिकांना कबाले वाटप करण्यात आलेले नाहीत, हे कबाले वाटप करण्यात यावेत. तसेच सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता यासह विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यात आली.

यावर नूतन आयुक्त मानसी मीना यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रघुनाथ मदने, बसवराज इब्राहिम, फेरोज रेगुळगे, प्रसिध्दी प्रमुख डी. उमाकांत, जाकीर तांबोळी आदी उपस्थित होते.

## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** शिवसेनेच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त हरंगु ळ येथे जिल्हापरिषद शाळेत शिवसेना तालुका प्रमुख बाबुराव शेळके यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य परमेश्वर वाघमारे,ग्रामपंचायत सदस्य भीमाशंकर झुंजारे,विभागप्रमुख आप्पा माने,रमेश खोत,रामचंद्र शेळके,काशिनाथ पांचाळ,अमोल झुंझारे,आदीसह शाळेतील शिक्षिका विद्यार्थी उपस्थित होते.



## परपांत्रिय विद्यार्थ्याची लातुरात गळफास लावून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** लातूर शहराजवळ असलेल्या नांदेड रोडवरील कृषी महाविद्यालयाच्या वसतिगृहातील खोलीमध्ये एका परप्रांतीय विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (दि.१९) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास उघडकीस आली आहे. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस तपास करत आहेत.

कृषी महाविद्यालय अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरातच विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एकलव्य वसतिगृहाच्या खोली क्रमांक ३१३ मध्ये दीपककुमार धनावत (रा. रवतकल्याण, जि. सवाई माधवपूर, राजस्थान) या विद्यार्थ्याने खोलीतील पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याचा प्रकार गुरुवारी (दि.१९) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास सफाई कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आला. वसतिगृहातील प्रत्येक खोलीमध्ये तीन-तीन विद्यार्थी राहतात. दरम्यान, इतर दोन सहकारी विद्यार्थी खोलीबाहेर गेल्याचे पाहून दीपककुमार धनावत याने गळफास लावून आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.



दीपककुमार हा लातूरच्या कृषी महाविद्यालयात बीएससी ॲग्री द्वितीय वर्षात शिकत होता. गेल्या वर्षापासून तो या महाविद्यालयात शिक्षण घेत होता. त्याने वैद्यकीय प्रवेशासाठीची 'नीट' परीक्षा दिली होती. मात्र, या परीक्षेत त्याला २ मार्क मेमो मिळाले. या कारणाने त्याच्यावर मानसिक ताण होता, अशी चर्चा सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच विवेकानंद चौक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह शवविच्छेदनासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. शवविच्छेदनानंतर त्याच्या मृत्यूचे कारण कळणार आहे. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी दिली आहे.

## मांजरा प्रकल्प व जलशुद्धीकरण केंद्रास पालिका आयुक्तांची भेट



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी पाणीपुरवठा विभागातील अत्यावश्यक कामांचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी धनेगाव येथील मांजरा प्रकल्प तसेच हरंगुळ व आर्वी येथील जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन पाहणी केली. बोरवटी व कव्हा येथील एसटीपी प्लांटलाही भेटी देऊन त्यांनी पाहणी केली.

गुरुवारी आयुक्त श्रीमती मानसी यांनी कार्यकारी अभियंता विजयकुमार चव्हाण, शाखा अभियंता डी.जी.डोईजोडे यांच्यासह संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना घेऊन मांजरा प्रकल्पास भेट दिली. प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर धनेगाव येथून उचलण्यात येणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. पंपिंग बंद राहणार नाही याची दक्षता घ्यावी,अशा सूचनाही त्यांनी केल्या.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची त्यांनी पाहणी केली. प्रकल्प व्यवस्थापक, सल्लागार व ठेकेदारांनी काम गुणवत्तापूर्ण व मुदतीत पूर्ण करावे, असे त्या म्हणाल्या.शहरास होणारा दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत व्हावा या दृष्टीने पंपिंग चालू ठेवावे. हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रातून दूषित व पिवळा पाणीपुरवठा होऊ नये यासाठी योग्य ती दक्षता घेऊन शहरास स्वच्छ पाणी पुरवावे, असे त्यांनी सुचित केले. केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत शहरात भुयारी गटार योजना टप्पा १ अंतर्गत कामे सुरू आहेत. त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन आयुक्तानी कामाची तपासणी केली.ही कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना केल्या. कव्हा येथील एसटीपी प्लांटला तसेच आर्वी येथील जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन तेथील अडीअडचणी आयुक्तांनी जाणून घेतल्या.बोरवटी येथे ३२ एमएलडी क्षमतेचा मलनि:सारण प्रकल्प उभारला जात आहे. तेथेही आयुक्तांनी भेट दिली. प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी विद्युत पुरवठा सुरू करून तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी संबंधितांना केल्या.

## लातूर बाजार समितीचे वसतिगृह दिशादर्शक ठरेल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांनी सर्व जाती-धर्मांना न्याय देण्याचे काम केले. त्यांचे कार्य समोर ठेवून लातूर बाजार समितीने प्रशस्त इमारत बांधून राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब हे मुलींचे वसतिगृह सुरू केले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलींना सर्व प्रकारच्या चांगल्या सुविधा माफक दरात मिळतील. हे वसतिगृह इतर समित्यांना दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले.

लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे बांधण्यात आलेल्या राजमाता जिजाऊ महिला वसतिगृहाच्या इमारतीची देशमुख यांनी पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. यावेळी विलास साखर



कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथ शिंदे, साखर संघाचे संचालक आबासाहेब पाटील, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख, उपाध्यक्ष ॲड. प्रवीण पाटील, ॲड. उदय गवारे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, संतोष देशमुख, चंद्रकांत पाटील, बाजार समितीचे सचिव अरविंद पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी दिलीपराव देशमुख म्हणाले, ग्रामपंचायतीनंतर ज्या बाजार समितीपासून माझ्या राजकारणाची सुरूवात झाली तेथे वसतिगृहाच्या रूपाने ही दिमाखदार वास्तू उभी राहत आहे, याचा आनंद आहे. ही वास्तू लातूरच्या वैभवात भर टाकणारी आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, हमाल, मापाडी यांच्या मुलींसाठी मोठ्या प्रमाणात या वास्तूचा फायदा होणार आहे. यावेळी बावणे यांनी, राज्यात पहिल्यांदाच बाजार समितीने अशा प्रकारचे वसतिगृह सुरू केले आहे. येथे आम्ही कुठलीच कमतरता जाणवू देणार नाही, असे सांगितले.

## रस्त्याच्या मधोमध वाहन : गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** रस्त्याच्या मधोमध वाहन उभे करून रहदारीला अडथळा निर्माण केल्याची घटना चाकूर रोडवर घडली. याबाबत चाकूर पोलिस ठाण्याचे पोहेकॉ. रितेश अंदुरकर यांनी चाकूर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून ऑटोचालकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दरम्यान, लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथेही सार्वजनिक रस्त्यावर ऑटो उभा करून अडथळा निर्माण केल्याची घटना घडली. याबाबत पोलिस कर्मचारी श्याम कच्छवे यांच्या फिर्यादीवरून ऑटोचालकाविरुद्ध शिवाजीनगर पोलिसात गुन्हा नोंद आहे.

## जगद्गुरुंच्या हस्ते रविवारी विविध पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** श्री जगद्गुरु विश्वाराध्य ज्ञान सिंहासन, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्यावतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य कार्य करणाऱ्या व्यक्तींना श्री काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते रविवारी (दि.२२) सकाळी ११ वाजता बाभळगाव रोडवरील ओम हामणे पॅराडाईज येथे विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज औसेकर व सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या नेतृत्वात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून



बाबासाहेब कल्याणी व त्यांच्या सुविद्य पत्नी सुनीता कल्याणी आणि खासदार डॉ. शिवाजी काळगे उपस्थित राहणार आहेत.

यावर्षीचा राष्ट्रीय मातृशक्ती पुरस्कार वीरपत्नी माधुरी सचिन वनंजे, नांदेड व दीपाली संदीप गायकर, अहिल्यानगर यांना देण्यात येणार आहे. १ लाख रुपये रोख, गौरवपत्र, शाल, श्रीफळ रोप व रुद्राक्ष माळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आठ मान्यवरांना १० हजार रुपये रोख, गौरवपत्र, रुद्राक्ष माळ, शाल व श्रीफळ रोप देऊन गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सिध्दया स्वामी हिरेमठ, ॲड. गंगाधरप्पा हामणे, प्रा. मन्मथ पंचाक्षरी, बसवंतप्पा भरडे, डॉ. अनिल सर्जे, भालचंद्र मानकरी, बाबूराव वडगावे, राजेंद्र बलसुरे, ओमप्रकाश झुरळे, श्रीकांत हिरेमठ, रामलिंग ठेसे, ॲड. उमाशंकर पाटील, शिवकांत स्वामी यांच्यासह संयोजन समितीच्या अन्य सदस्यांनी केले आहे.

### यांचा होणार सन्मान

विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. यात डॉ. रवींद्र बेंबरे, नांदेड यांना साहित्य पुरस्कार, मानाजी रोंगे, लातूर यांना आदर्श शिक्षक सिध्देश्वर म्हेत्रे, सोलापूर यांना कृतज्ञता पुरस्कार, मदिना हक, सोलापूर यांना प्रज्ञा पुरस्कार, सुनीता देशमुख, लातूर यांना नाट्यकर्मी पुरस्कार, न्यायवेंदाताचार्य मारुती महाराज तुणतुणे, सोलापूर यांना कीर्तनकार, नलिनी चिरणे यांना समाजसेवा पुरस्कार, तर प्रा. रामेश्वर बद्दर, लातूर यांना पत्रकारिता पुरस्काराने जगद्गुरुंच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

## योगा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी व्हावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** जागतिक योगा दिनानिमित्त जिल्हा प्रशासन व विविध योग संघटनांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, गणेश पवार, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, ज्ञानेश्वर काकडे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती यांच्यासह पतंजली योग समिती, योगासन भारत समिती, प्रजापिता ब्रह्मकुमारी आदी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

जागतिक स्तरावर २१ जून हा दिवस योगा दिवस म्हणून साजरा केला जातो. लातूर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विविध शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये यादिवशी योगा शिबिरे आयोजित करावीत. या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची मदत घेवून नागरिकांमध्ये योगा विषयक जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर यांनी केले. २१ जून रोजी सकाळी ६.३० वाजता जागतिक योगा दिनाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे.

## जिल्हा बँकेतर्फे मयतांच्या वारसांना अपघात विमा धनादेशाचे वितरण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्यावतीने गुरुवारी (दि.१९) मयत १२ सभासदांच्या वारसांना जनता अपघात विमा धनादेशाचे वितरण करण्यात आले.

लातूर जिल्हा बँकेने शेती सहकारी संस्था अंतर्गत कर्जदार सभासदांना विम्याचे संरक्षण मिळावे या उद्देशाने जनता अपघात विमा योजना स्विकारली असून, याचा लाभ शेतकरी सभासदांना होत आहे. या योजनेंतर्गत ५८६ प्राथमिक शेती सहकारी संस्थांचे २ लाख ३८ हजार ८७८ सभासदांचा बँकेने जनता अपघात विमा उतरविला असून, आजपर्यंत जिल्ह्यातील १ हजार ३६६ मयत शेतकरी सभासदांच्या वारसांना २० कोटी ४२ लाख रुपये इतकी नुकसान भरपाई रक्कम प्राप्त झाली आहे.

गुरुवारी (दि.१९) या योजनेंतर्गत अपघाती मृत्यू झालेल्या १२ सभासदांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये प्रमाणे एकूण ६० लाख रुपयांचे धनादेशाव्दारे बँकेचे मार्गदर्शक, माजी मंत्री दिलीपराव देशमुख व संचालकांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, संचालक एन. आर. पाटील, भगवान पाटील, पृथ्वीराज सिरसाठ, सुनील कोचेटा, राजकुमार पाटील, जयेश माने, व्यंकट बिरादार, अनुप शेळके, स्वयंप्रभा पाटील, लक्ष्मी भोसले, कार्यकारी संचालक एच. जे. जाधव आदींची उपस्थिती होती.

## लातूर सायकलिस्ट क्लबची लातूर - पंढरपूर सायकल वारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० जून -** हजारो वर्षांची परंपरा असलेल्या आषाढी वारीत लाखो पांडुरंग भक्त आळंदी ते पंढरपूर पायी सहभागी होतात,आता या वारीचाच भाग, आषाढीनिमित्त पांडुरंगांना वंदन करत पर्यावरणाचा जागर करत रविवार २२ जून रोजी पांडुरंगाच्या दरबारी राज्याच्या विविध शहरातील ९७ क्लबचे तब्बल ५ हजार सायकलिस्टाचा रिंगण सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती लातूर सायकलिस्ट क्लबचे अध्यक्ष श्रवण उगले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बांधकाम व्यावसायिक डॉ. धर्मवीर भारती, डॉ. अभिजित देशपांडे, सरसंबेकर, नागनाथ गीते यांची उपस्थिती होती.

आषाढी वारीनिमित्त पांडुरंगाच्या चरणी लाखो भाविक नतमस्तक होतात, यावर्षी भक्तांबरोबरच राज्याच्या कानाकोपऱ्यातील सुमारे



५ हजार सायकलिस्ट नाशिक ते पंढरपूर वारी काढून पर्यावरण संतुलनाचा संदेश घेऊन वारीपूर्वीच पंढरपुरात सायकल रिंगण सोहळा साजरा करणार आहेत. विठ्ठल नामाचा गजर करतानाच पर्यावरणाचा जागर करत सायकल बारीचे २० जून रोजी लातूर सायकलीस्ट क्लबचे सदस्य लातूर ते पंढरपूर असा प्रवास करतील व २२ रोजी अखंड महाराष्ट्रातील सायकलिस्टची मांदियाळी पंढरपूर येथे सायकल रिंगण सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

अभिमानाची गोष्ट म्हणजे या वारी व रिंगण सोहळ्याचे यजमान पद लातूर जिल्हा भूषविणार आहे. ही पर्यावरण वारी राज्यभरातून आपापल्या मार्गाने सायकलवरून २१ जूनला पंढरपूर येथे मुक्कामी येणार आहेत गेल्या काही वर्षांत सायकल वारीचा विस्तार होताना आज लहान मुलापासून ते वृद्धापर्यंतचे दीडशेहून अधिक सायकलिस्ट यात सहभागी होत आहेत. याशिवाय राज्यातील पन्नासहून अधिक शहरातील ९७ सायकल क्लब पंढरपुरात येऊन एकत्र येणार आहेत.पंढरीच्या दिशेने प्रवास करताना हे सायकलिस्ट मार्गावरील गावागावांमध्ये पर्यावरणविषयक जागृती करत आणि ठिकाणी वृक्षारोपण करत येणार आहेत.पंढरीत आल्यावर २१ जून रोजी मनमाडकर यांच्या आरती प्रांगणात सर्वांची ओळख परेड होऊन वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला जाणार आहे. २२ जून रोजी सकाळी पंढरपूर सायकल क्लबचे अध्यक्ष अभिजित कुलकर्णी व उमेश परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली ५ हजार सायकलिस्टची नगर प्रदक्षिणा होईल, त्यानंतर पंढरपूर येथील रेल्वे मैदानावर या सायकलिस्ट्चा मनमोहक असा रिंगण सोहळा सर्वांच्या साक्षीने रंगणार असल्याची माहिती यावेळी श्रवण उगले यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांची माजी सैनिक महामंडळाच्या संचालकपदी नियुक्ती



पुणे (प्रतिनिधी) : एअर मार्शल प्रदीप बापट, झतडच् तडच् (निवृत्त) अध्यक्ष अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद,महाराष्ट्र आणि गोवा यांची महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को) च्या संचालकपदी १८ जून २०२५ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने नियुक्ती करण्यात आली आहे.मेस्को ही महाराष्ट्र शासनाची उपक्रम संस्था असून, १८ जानेवारी २००२ रोजी तिची स्थापना झालेली आहे.ह्या संस्थेचा मुख्य उद्देश माजी सैनिकांच्या पुनर्वसन व कल्याणासाठी तसेच विविध क्षेत्रांमध्ये त्यांना अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांच्या नियुक्तीमुळे मेस्को (चएडउज) या संस्थेच्या दृष्टीकोनात नवचैतन्य निर्माण होईल,तसेच माजी सैनिकांचे सक्षमीकरण आणि मुख्य प्रवाहात त्यांचा समावेश करण्यावर अधिक भर दिला जाईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.ही संचालक पदाची प्रतिष्ठेची नियुक्ती राज्य शासनाच्या माजी सैनिकांप्रती असलेल्या कटिबद्धतेचे व त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षेतील आणि विकासातील योगदानाचे प्रतिक आहे.

एअर मार्शल बापट (निवृत्त), यांना यापूर्वी २६ जानेवारी २०२० रोजी परम विशिष्ट सेवा पदक व २६ जानेवारी २०१४ रोजी विशिष्ट सेवा पदक राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते.तसेच २६ एप्रिल २०२२ रोजी त्यांना मध्यप्रदेश रत्न अलंकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## अमृता विद्यापीठमचा जागतिक कीर्तीचा पराक्रम: 'द वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२५'मध्ये टॉप ५०मध्ये समावेश

मुंबई : टाइम्स हायर एज्युकेशन इम्पॅक्ट रँकिंग २०२५ जाहीर होताच, अमृता विश्व विद्यापीठम जागतिक स्तरावर टॉप ५० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवणारे भारताचे एकमेव उच्च शिक्षण संस्थान ठरले आहे. ४१व्या क्रमांकासह, अमृता भारतातील सर्वोच्च एसडीजी विद्यापीठ म्हणून पुढे आले आहे. गेल्या वर्षी याच संस्थेने ८१व्या क्रमांकावर कामगिरी केली होती. गुणवत्तापूर्ण शिक्षण) साठी अमृता विद्यापीठाने जागतिक ५वा क्रमांक, तर स्वस्त व स्वच्छ ऊर्जा साठी ६वा क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर, लैंगिक समानतासाठी १४वा व आरोग्य व कल्याण साठी २९वा क्रमांक मिळवत, अमृता विद्यापीठ जागतिक स्तरावरील उच्च दर्जाच्या संस्थांमध्ये स्थान मिळवते.

## कला, चारित्र्य आणि निवडीला चालना देणारी मोहीम 'दि सिलेक्ट वन्स'

मुंबई : भारतातील सर्वोत्तम लघुपट कथाकथनासाठी समीक्षकांनी प्रशंसित केलेले व्यासपीठ, रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्सने त्यांची नवीन संकल्पनात्मक मोहीम, फॉर द सिलेक्ट वन्सचे, सादरीकरण केले, ज्यामध्ये प्रसिद्ध कलाकार राजकुमार राव आणि पत्रलेखा यांचा सहभाग आहे. एफसीबी निओ ची संकल्पना असलेलीही मोहीम अशा लोकांना समर्पित आहे जे यशाच्या प्रवासात, सातत्याने विचारपूर्वक निवडकरत असतात - त्यांच्या मूल्यांशी आणि आकांक्षांशी प्रामाणिक राहून बदल आणि ज्ञानासाठी प्रयत्न करतात. ब्रँडच्या यशाच्या तत्वज्ञानावर आधारित, ही मोहीमेची फिल्म एक सांस्कृतिक आणि कलात्मक प्रदर्शन आहे - जे रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्सच्या मूळ, उद्देशपूर्ण आणि विशिष्ट कथांप्रती असलेल्या वचनबद्धतेला पुन्हा बढती देतो.

## ब्रिजस्टोन इंडियाकडून सिलेक्ट स्टोअर नेटवर्कचा विस्तार

नाशिक: ब्रिजस्टोन इंडिया ही जागतिक स्तरावर नावाजलेल्या ब्रिजस्टोन ग्रुपची उपकंपनी असून टायर तसेच दळणवळण पर्यायांतील अग्रगण्य नाव आहे. त्यांनी अलीकडेच ब्रिजस्टोन सिलेक्ट स्टोअर - मेसर्स नाशिक टायर्स अँड सर्व्हिसेसची अभिमानाने घोषणा केली. हा विस्तार म्हणजे ब्रिजस्टोनच्या नवीन कल्पक, ग्राहककेंद्री सेवा प्रस्तावांसह भारतभर टायर रिटेल अनुभव वाढविण्याच्या नियमित वचनबद्धतेचा भाग आहे. धोरणात्मकदृष्ट्या वसलेल्या या दुकानाचे उद्घाटन ब्रिजस्टोन इंडियाचे राजर्षी मोईत्रा यांनी केले. आधुनिक पायाभूत सुविधा आणि उच्च दर्जाच्या सेवा व्यवस्थेमुळे, मेसर्स नाशिक टायर्स अँड सर्व्हिसेस नाशिक प्रदेशातील टायर आणि संबंधित सेवांसाठी वन-स्टॉप सोल्यूशन म्हणून कार्यरत आहे.

## अधार ने मुंबईत एका विशेष संध्याकाळचे आयोजन केले

मुंबई - १३ जून २०२५ च्या संध्याकाळी,इंटेलेक्चुअल डिसेबिलिटी लोकांसाठी आशियातील सर्वात मोठी काळजी घेणारी संस्था, अधार ने कृतज्ञता, कनेक्शन आणि उत्सवाची संध्याकाळ नावाचा एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम मुंबईतील बीकेसी येथील एमसीए क्लबच्या बाउंड्री हॉलमध्ये झाला, जिथे काळजी घेणारे कुटुंबे, देणगीदार, सामाजिक कार्यकर्ते आणि समर्थक एकत्र आले आणि हा प्रवास संस्मरणीय बनवला. आधार ने एका स्वप्नासह सुरुवात केली - मुलांसाठी आणि आयुष्यभर इतरांवर अवलंबून असलेल्या आणि स्वतःच्या बळावर जगू शकत नसलेल्या लोकांसाठी एक सुरक्षित, कायमस्वरूपी आणि सन्माननीय घर निर्माण करणे. आज अधार ने महाराष्ट्रातील बदलापूर, नाशिक आणि सातारा येथे पसरलेल्या त्यांच्या तीन केंद्रांद्वारे ४३५ हून अधिक कुटुंबांशी संपर्क साधला आहे. याचा उद्देश असा आहे की कोणत्याही कुटुंबाला माझ्या नंतर माझ्या मुलाची काळजी कोण घेईल? असा विचार करून एकटे राहू नये.कार्यक्रमाची सुरुवात श्री अजय मेहता यांच्या स्वागत भाषणाने झाली, ज्यात त्यांनी सर्वांचे आभार मानले आणि अधार च्या ध्येयाची झलक दाखवली. हा संपूर्ण कार्यक्रम श्री. सचिन केळकर यांनी अतिशय साधेपणाने आणि संवेदनशीलतेने आयोजित केला.

## ओयोकडून सर्वोत्तम हॉटेल व्यवस्थापकांचा सन्मान

पुणे : जागतिक हॉस्पिटॅलिटी टेक्नॉलॉजी कंपनी ओयोने पुण्यातील हॉटेल एमराल्ड गेस्टिमोनी येथे आयोजित एका कार्यक्रमात त्यांच्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या हॉटेल भागीदारांचा सन्मान केला. तंत्रज्ञान, मार्केटिंग आणि महसूल ऑप्टिमायझेशन साधनांद्वारे पहिल्या पिढीतील हॉटेल व्यावसायिकांना सक्षम बनवण्याच्या ओयोच्या चालू प्रयत्नांचा हा एक भाग आहे. या कार्यक्रमात ओयोशी संलग्न हॉटेल व्यावसायिक, रिअल इस्टेट मालक आणि हॉस्पिटॅलिटी उद्योजकांसह प्रमुख भागधारकांना वाढीच्या संधी, सर्वोत्तम पद्धती आणि भविष्यातील व्यवसाय धोरणांवर चर्चा करण्यासाठी एकत्र आणले. २०२५ मध्ये व्यवसाय, विश्रांती आणि धार्मिक पर्यटन क्षेत्रात प्रवासाच्या मागणीत वाढ होत असल्याने, महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर आणि कोल्हापूर यासारख्या प्रमुख शहरांमध्ये ३०० हून अधिक हॉटेल्स जोडण्याची योजना ओयो करत आहे. यापैकी बहुतेक हॉटेल्स 'कंपनी सर्व्हिस्ड' हॉटेल्स श्रेणी अंतर्गत जोडली जातील, जे ओयोच्या ऑपरेशन्समध्ये सक्रिय सहभाग दर्शवते.

## ग्रीनफिल्ड ल्युमिनियम डायकास्टिंग क्षमतेचीसुरुवात

छत्रपती संभाजी नगर- उनो मिंडा लिमिटेड या जागतिक स्तरावरीलऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट्स आणि सिस्टम उत्पादनातील आघाडीच्या कंपनी तर्फे आज घोषणा करण्यातआली की त्यांच्या संचालक मंडळाने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथेग्रीनफिल्ड ल्युमिनियम डाय कास्टिंग च्या उत्पादनाचे केंद्र स्थापन करण्यास मान्यता दिलीआहे. या महत्त्वपूर्ण अशा वाढी मुळे आता वेगानेवाढणार्या इलेक्ट्रिक दुचाकी आणि चार चाकींच्या मागणी बरोबरच त्यांच्या सुट्या भागांचीवाढती मागणी पूर्ण होणार आहे. इलेक्ट्रिकमोबिलिटी कडे वाढणारा कल पाहता ल्युमिनियम डाय कास्टिंग ही हलक्या, उच्च क्षमतेच्या वाहन मंचासाठी उपयुक्तगोष्ट ठरली आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी आतामोठ्या प्रमाणावर ल्युमिनियम वर आधारीत स्ट्रक्चरल आणि थर्मल सूटे भाग हे इंटर्नल कम्बर्शन इंजिनच्यातुलनेत अधिक लागतात, परिणामी अत्याधुनिक डाय कास्टिंग क्षमता ही ईव्ही पावरट्रेन आणिबॉडीच्या प्लिकेशन्स मधील महत्त्वाचे घटक ठरतात.

## माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या कडून जिल्हा परिषद गटातील विद्यार्थ्यांना वही व पेन्सिलचे मोफत वाटप

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० जून

सामाजिक बांधिलकी जोपासत माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या हस्ते आमखेडा जिल्हा परिषद गटातील सुमारे ३००० विद्यार्थ्यांना वही व पेन्सिलचे मोफत वाटप करण्यात आले. हा उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरला आहे.



या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या शिक्षणात उत्साह आणि आत्मविश्वास वाढला आहे. शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे पुष्पाताई काळे यांनी यावेळी नमूद केले.वही व पेन्सिल वाटपाचा कार्यक्रम सोयगाव केंद्र, जरंडी केंद्र व तिडका केंद्र येथील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये पार पडला.या वेळी केंद्रीय प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता सोनवणे,विष्णू मापारी,प्रा.निलेश गाडेकर,प्रशांत जाधव व तसेच इतर शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांची उपस्थिती आणि सहकार्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.पुष्पाताई काळे यांनी यापूर्वीही अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवत विद्यार्थ्यांसाठी निस्वार्थ सेवा दिली आहे.भविष्यात देखील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी असे उपक्रम सुरू राहतील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ईस्टमन कंपनीने प्रगत सौर उत्पादनांच्या श्रेणीसह महाराष्ट्रात केला अक्षय ऊर्जा क्षेत्रात विस्तार

छत्रपती संभाजीनगर , २० जुन २०२५ : सौरऊर्जा उत्पादनांच्या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ईस्टमन ऑटो ॲण्ड पॉवर लिमिटेड ने महाराष्ट्रात उच्च कार्यक्षमतेच्या सौरऊर्जा उत्पादनांच्या व्यापक श्रेणीसह विस्तार सुरू केला आहे.राज्यातील विश्वासार्ह आणि शाश्वत ऊर्जेची वाढती गरज लक्षात घेता, ईस्टमन आता ग्रीड टाय इन्व्हर्टर, हायब्रिड इन्व्हर्टर, ऑफ-ग्रीड इन्व्हर्टर, लीड-ॲसिड व लिथियम बॅटऱ्या आणि सौर पॅनेल्स यांचा समावेश असलेली उत्पादनांची सशक्त श्रेणी सादर करत आहे. ही सर्व उत्पादने निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहेत.

ईस्टमनची इन्व्हर्टर श्रेणी रूफटॉप सौर प्रणालीशी अखंडपणे एकत्रित होईल, अशा प्रकारे डिझाइन करण्यात आली आहे. या प्रणालीच्या साहाय्याने वापरकर्त्यांना अतिरिक्त सौरऊर्जा निर्माण करून ती ग्रीडमध्ये पाठविता येते. परिणामी, वीज बिलात लक्षणीय घट होते आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन मिळते. महाराष्ट्र आपल्या सौरऊर्जा प्रयत्नांना गती देत असताना, ईस्टमनच्या प्रगत सौर उपायांचा उद्देश पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे आणि राज्याच्या स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टांमध्ये योगदान देणे हाच आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नागपूर, लातूर, सांगली आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये वेगाने वाढणारी उपस्थिती असलेल्या ईस्टमनने, मजबूत डीलर नेटवर्कद्वारे सर्व सौरऊर्जा उत्पादनांची सहज उपलब्धता सुनिश्चित केली आहे. हा एकच समाधानकारक दृष्टिकोन तुमच्या सर्व सौरऊर्जेशी संबंधित गरजांची पूर्तता करतो, ज्यास तज्ज्ञांचे तांत्रिक सहाय्य आणि शहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये विश्वासार्ह विक्री-पश्चात सेवा लाभते.

## जाहिर प्रगटन

**मा. व्हि. डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ११५/२०२५

पुढील तारीख ०५/०७/२०२५

अर्जदार : १. सरलाबाई शेषराव निकम. वयः ६७ वर्ष. धंदाः शेती. रा.वडाळी. ता. कन्नड. जि. औरंगाबाद. २. संतोष शेषराव निकम वयः ३८ वर्ष. धंदाः शेती. रा. वडाळी. ता. कन्नड. जि. औरंगाबाद.३. मोतीराम शेषराव निकम. वय. ३२ वर्ष. धंदा: शेती. रा. वडाळी. ता. कन्नड. जि. औरंगाबाद. ४. मायाबाई शेखर पाटील. वय. ३४ वर्ष धंदा घरकाम. रा. मोघन. ता. जि. धुळे.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत शेषराव धनसिंग निकम यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र.१ ही मयम शेषराव धनसिंग निकम यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ मुले व अर्जदार क्र. ४ मुलगी आहे. नामे मयत शेषराव धनसिंग निकम यांना अर्जदार क्र. १ ते ४ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत मयत शेषराव धनसिंग निकम, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे पति व वडील हे दि. १९/०३/२०२२ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा वडाळी येथे करण्यात आलेला आहे. मयत शेषराव धनसिंग निकम यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः १३/०६/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (आर.एस. तापडीया) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- ३०८/२०२५

अर्जदार : १. फकिरराव पिता बाजीराव साखरे, वय ४२ वर्षे, धंदा - शेती, रा. वाकद / खेडी ता. कन्नड जि. औरंगाबाद २. चंद्रकलाबाई भ्र. सर्जेराव थोटी, वय ७२ वर्षे, धंदा - शेती, रा. चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. कौशल्याबाई भ्र. गंगाधर गवारे, वय ६२ वर्षे, धंदा - शेती, रा. करंजखेडा (जहां.) ता. कन्नड जि. औरंगाबाद४. दुर्गाबाई भ्र. सोनाजी रोडे, वय - ५७ वर्षे, धंदा - शेती, रा.मु.पो. वडोद ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. सरलाबाई भ्र. उत्तम गायकवाड, वय-४७ वर्षे, धंदा - शेती, रा. केळगांव ता. सिल्लोड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : जिल्हाधिकारी कार्यालय

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी ॲड.आर.डी.. राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत बाजीराव पिता बाळा साखरे हे मुळ पुरुष होते ते दिनांक ०४.०८.२०२२ रोजी मौजे वाकद /खेडी ता. कन्नड येथे मयत झाले आहे त्यानंतर अर्जदारांची आई व मयत बाजीराव पिता बाळा साखरे यांची पत्नी नामे समिंद्राबाई भ्र. बाजीराव साखरे हया दि. १३.११.२०२३ रोजी मौजे वाकद / खेडी ता. कन्नड येथे मयत झालेल्या आहेत. मयत बाजीराव पिता बाळा साखरे व समिंद्राबाई भ्र. बाजीराव साखरे यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत बाजीराव पिता बाळा साखरे व मयत समिंद्राबाई भ्र. बाजीराव साखरे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी ग्रामपंचायत वाकद / खेडी तलाठी कार्यालय, तहसील कार्यालय व ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. असा मजकुर नमुद करून अर्जदार यांनी मयत बाजीराव पिता बाळा साखरे व समिंद्राबाई भ्र. बाजीराव माखरे यांचे वारस असल्या बाबत वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करून त्यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब ही जाहीर नोटीस

दिनांक १५/०६/२०२५

प्रकरणात पुढील तारीखः- १९.०८.२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही.डी.पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क. २२२/२०२४

पुढील तारीख २१/०६/२०२५

अर्जदार : १. संगीता भ्र. भावलाल राठोड, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सितानाईक तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद, २. बळीराम पि भावलाल राठोड, वय २७ वर्षे, धंदा शेती, रा. सितानाईक तांडा, ता. कड जि. औरंगाबाद,३. वैभव पि. भावलाल राठोड, वय २१ वर्षे, धंदा शेती, रा. सितानाईक तांडा, ता. कत्रद जि. श्रीरंगाबाद.४. मनिषा बलदेव चव्हाण, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कवड जि. औरंगाबाद.५. प्रियंका योगेश चव्हाण, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सातकुंड तांडा, ता. कनड जि. औरंगाबाद. ६. काजल कुंदन चव्हाण, वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. काड जि. औरंगाबाद ७. जयश्री सुनिल नाईक, वप- २२ वर्षे, धंदा घरकाम, रा. मालखेड तांडा ता. जामनेर, जि. जळगाव

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद..

अर्ज - वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ते ७ यांची आई आहे. तसेच अर्जदार क्र. २ ते ७ हे आपसात सख्खे भाऊ-वहीनी आहेत. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील नामे भावलाल नरसिंग राठोड हे होते ते दिनांक २१/०९/२०२२ रोजी सितानाईक तांडा ता. कन्नड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ते ७ हे मयत भावलाल नरसिंग राठोड यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी तसेच तहसिल कार्यालयात, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्यावावत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप चाहा धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०६/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : १६/०६/२०२५

दि.कि. अर्ज क्र. २७६/२०२५

अर्जदार : १) रफियाबी मुसाखान पठाण, वयः ४६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. छमन का बंगला, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २) रझिया बाबू शेख, वयः ५४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. शिवनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३) आशियाबी सिराज शेख, वयः ३७ वर्षे, धंदाः घरकाम, रा. शिवनगर कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : १-महाराष्ट्र शासन, व्दारा- जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद. २-शेख भिकन दाऊद, वयः ४० वर्षे, धंदाः शेती, रा. शिवनगर, कन्नड, ता. कन्नड,

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. एच. जी. शेख यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ यांचे वडील नामे शेख दाउद शेख दादा हे दि.२१/०४/२०१५ रोजी मौजे कन्नड, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ यांची आई नामे महेमूदाबी भ. दाउद शेख उर्फ महेमूदाबी पि. इब्राहिम शेख ही देखील दि.०५/०८/२०२३ रोजी मयत झालेली आहे. मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत शेख दाउद शेख दादा व मयत महेमूदाबी भ्र. दाउद शेख उर्फ महेमूदाबी पि. इब्राहिम शेख यांना अर्जदार क्र. १ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि १२/०६/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## आज हनुमान व्यायाम शाळेमध्ये योगा दिवस साजरा करण्यात येणार

परळी प्रतिनिधी : शारीरिक आणि मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाच्या माध्यमातून योगाचे फायदे सांगितले जातात. योग दिनाची सुरुवात आंतरिक शांती आणि संतुलनाला प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आली. समाजात एकता आणि सौहार्द वाढविण्यासाठी जागतिक स्तरावर योग दिन साजरा करण्यात येतो आज जगभरात विविध प्रकारांमध्ये याचा सराव केला जातो आणि लोकप्रियता वाढत आहे. त्याचे सार्वत्रिक आवाहन ओळखून, भारताचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी संयुक्त राष्ट्र संघाकडे मागणी केल्याच्या नंतर ११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्र संघाने ठराव ६९/१३१ द्वारे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित केला. हनुमान व्यायाम शाळेतील २१जुन रोजी सकाळी ६ वाजता योगा डे साजरा करण्यात आहे येणार आहे त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा असे हनुमान व्यायाम शाळेचे ज्येष्ठ मार्गदर्शक दत्ताआप्पा ईटके गुरुजी व हनुमान व्यायाम शाळेच्या सर्व विश्वस्तांनी, व शिक्षक यांनी केली आहे

## टी. सी. हरवली आहे

विक्रम सुनील सातदिवे मु.पो. मक्रणपूर ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर या शालेय विद्यार्थ्याची दि.०६/०६/२०२५ रोजी कन्नड ते छ संभाजीनगर प्रवासात कॉलेज बॅग हरवली असून या बॅग मध्ये इयत्ता १० वीची टी.सी, गुणपत्रक वगैरे महत्वाची कागदपत्रे आहेत. सदरील कॉलेज बॅग कोणास आढळल्यास खालील पत्यावर संपर्क करावा ही विनंती.

**संपर्कासाठी पत्ता : विक्रम सुनील सातदिवे**

**मु.पो. मक्रणपूर ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर मो नं. ८४८३९ २४१०६**

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर मॅडम दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. २१८/२०२५

अर्जदार - १- पुजा भ्र. अतुल मनगटे, वय- २५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. लोहगाव ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. आर.एक्स.१/५ शिवनेरी हाऊसिंग सोसायटी बजाजनगर, औरंगाबाद. ता. जि. औरंगाबाद २- रेवांश पि. अतुल मनगटे, वय- ३ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र. १ जन्मदाती आई ३- करुणाबाई भ्र. हिम्मत मनगटे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोहगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद,

-विरुध्द-

गैर अर्जदार - महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ पी.एस. जाधव यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ व २ हे आई व मुलगा असुन अर्जदार क्र. ३ ही अर्जदार क्र. १ हीची सासु व अर्जदार क्र. २ ची आजी आहे. अर्जदार क्र. १ होचे पती, अर्जदार क्र. २ चे वडील व अर्जदार क्र. ३ चा मुलगा नामे अतुल हिम्मत मनगटे हा होता तो दिनांक २१/०५/२०२३ रोजी आजार पणामध्ये मयत झालेला आहे, तसेच अर्जदार क्र. १ हीचे सासरे, अर्जदार क्र. २ चे आजोबा व अर्जदार क्र. ३ चे पती हे देखील दिनांक २७/१२/२०१२ रोजी मौजे लोहगाव ता. कन्नड येथे मयत झालेले आहे.

अर्जदार यांना मयत अतुल हिम्मत मनगटे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १२/६/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कत्रड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १४१/२०२५

पुढील तारीखः २५/०४/२०२५

अर्जदार- १ श्रीमती सुनिता भ्र. विनायक राठोड वय ४४ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. वडणेर तांडा, ता. कत्रड, जिल्हा औरंगाबाद २-सौ. सोनीया भ्र. ज्ञानेश्वर चव्हाण, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपरखेडा ता. नांदगांव, जिल्हा नाशिक ३-रोहीत विनायक राठोड, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४-कु. निकीता विनायक राठोड, वय १७ वर्षे ०८ महिणे, धंदा शिक्षण, अ.पा.क. सुनिता विनायक राठोड, जन्मदाती आई अर्जदार क्रं. १ ५-छबीबाई भ्र. जयसिंग राठोड, वय ७८ वर्षे, धंदा काहीनाही, रा. वडणेर तांडा ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद

- विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. एस. एम. शिरसे, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायम रहिवाशी असून त्यांनी मे. न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे, अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार क्रमांक २ ते ४ यांचे वडील तसेच अर्जदार क्रमांक ५ चा मुलगा नामे विनायक जयसिंग राठोड हा होता तो दिनांक १६.९.२०२४ रोजी मौजे वडणेर तांडा ता. कन्नड येथे आजारपणामुळे मयत झाला आहे, अर्जा सोबत ग्राम पंचायत वडणेर ता. कन्नड चा मृत्युचा दाखला अर्जदारांनी या न्यायालयात दाखल केला आहे, मयतास मृत्यु पश्चात अर्जदार क्रमांक १ पत्नी, अर्जदार क्रमांक २ व ४ मुली, अर्जदार क्रमांक ३ हा मुलगा व अर्जदार क्रमांक ५ ही मयताची आई आहे, मयत विनायक राठोड यांस अर्जदार क्रमांक १ ते ५ शिवाय इतर कोणीही वकायदेशीर वारस नसून अर्जदार हेच एकमेव वारस आहे. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार सोबत स्वतःचे आधार कार्ड विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ०४.०४.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : ०४.०४.२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## अग्रलेख...

# वनोपनिषदाचा विवेचक

नाती जोडणे कठीण असते असे म्हणतात. नाती टिकविणे तर महाकठीण! नवी नाती निर्माण करणे ही तर एक अशक्यप्राय गोष्ट असते. आजकाल अपार्टमेंट नावाच्या दरवाजाबंद खुराड्यात राहून त्यालाच आपले विश्व समजण्याची वृत्ती कदाचित नाईलाजाने असेल तरी वाढीस लागली. अशा काळात नाती जोडणे, नाती टिकविणे किंवा नवी नाती निर्माण करणे शक्य नाही. माणसाचे माणसाशी माणसासम वागणे हीदेखील एक बातमीच होऊ पाहात असून माणसाने तसे वागावे यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करावी लागते. अशा परिस्थितीत माणसाने माणसाशी नाते जोडून माणसासम वागण्याची अपेक्षा तर धूसरच; पण मानवेतर सजीवांशी नाते जोडणे हा तर विचारही महाग होऊ पाहात आहे. मारुती चितमपल्ली नावाचा एक महान माणूस काळाच्या पडद्याआड जावा, हे मोठे नुकसानच म्हणावे लागेल. एकाच कुटुंबात जर तीन भावंडे असतील, तर तिघा भावंडांतील थोरल्या व धाकट्या भावांचे नाते दूरचे असते. कारण मधे एक भाऊ असतो. अशी आजकालच्या नातेसंबंधांची मानवी व्यवहारांतील स्थिती वर्णिली जात असते. त्यातील अतिशयोक्तीचा किंवा विनोदाचा भाग सोडला, तरी परस्परांसोबत असलेली नाती दुरावत चालल्याची एक खंत त्यामधून व्यक्त होत असते. माणसांचे माणसांशीच असलेले नाते अशारीतीने दुरावत चालले असेल, तर माणसाचे निसर्गाशी असलेले नाते पुन्हा जोडण्याचा गंभीर विचार केला तरी ते प्रत्यक्षात येणे फारसे सोपे नाही, असेच जाणवते. अशी खंत व्यक्त करणारी माणसे आसपास आहेत, पण विकासाचा मारा एवढा प्रबळ आहे की, त्याच्या लोंढ्यात वाहवत चालल्यावर असे विचार करण्यासही उसंत मिळत नाही आणि निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते जपण्याचा ध्यास असलेल्या काही मोजक्यांच्याच संख्येचा ऱ्हास होणे अधिकच क्लेशकारक ठरते. सध्या नेमकी हीच स्थिती असताना मारुती चितमपल्ली यांचे निधन व्हावे, हा समाजमनावरचा मोठा आघात ठरणार आहे.

मारुती चितमपल्ली यांनी निसर्गाशी नाते जोडले, ते टिकविले आणि अन्यांचेही नाते निसर्गाशी जडावे यासाठी आपले उभे आयुष्य अक्षरशः समर्पित केले. ते कार्य पूर्ण होण्याआधीच जगाचा निरोप घेताना त्यांच्या मनात याची खंत निश्चितच लागून राहिलेली असेल. हे काम सोपे नव्हते. त्यासाठी आधी अरण्याचे, जंगलांचे आणि वनांचे मन जाणून घेणे आवश्यक असते. त्यासाठी वनांचे वाचन करावे लागते, मारुती चितमपल्ली यांनी आयुष्यभर अरण्यवाचन केले आणि वनाचे मन माणसासमोर मोकळे केले पाहिजे या ध्यासाने विपुल लेखन करून माणूस व वने यांचे नाते जोडण्याचा प्रयत्न केला. आपल्या प्रामाणिक आणि सोज्वळ लेखनातून त्यांनी माणसाला जंगलांची, तिथल्या जीवनाची आणि निसर्गाच्या कहाणीची ओळख करून दिली, म्हणून आज त्यांच्या नसण्याची पोकळी प्रत्येकास जाणवते आहे हे खरे आहेच; पण ही पोकळी भरून काढणारा कुणी वारस सापडला नाही, तर त्यांची ती खंत कधीच संपणार नाही, याची जाणीव ठेवली तरच त्यांच्या कार्याला समाजाने, व्यवस्थेने आणि यंत्रणांनी मान्यता दिल्याचे स्पष्ट होईल. आपल्या उण्यापुऱ्या ९२ वर्षांच्या आयुष्यातील उमेदीचा संपूर्ण काळ त्यांनी अरण्यवाचनासाठी वाहून घेतला. या कामास त्यांनी एवढे समर्पित केले की, त्या काळातील त्यांची नोकरी हा त्यांच्या उपजीविकेच्या साधनापेक्षाही, निसर्गाशी नाते जोडण्याच्या त्यांच्या ध्यासाचे साधन ठरले होते. लौकिकार्थाने सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयातील पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची पावले अरण्य वाचनाच्या दिशेने चालू लागली. कोईम्बतूर, बंगळुरू, दिल्ली, कान्हा आदी ठिकाणी घेतलेल्या व्यावसायिक शिक्षणातून अरण्य वाचनाची लिपी जाणून घेतली. आत्मसात केलेल्या वनोपनिषदाचे विश्लेषण, विवेचन करण्यासाठी लेखन, भाषण आणि संवाद ही साधने महत्त्वाची मानून निसर्ग, वने, जंगल, वनातील जमाती आणि वन्यप्राण्यांच्या जीवनशैलीतून माणूस व निसर्ग यांच्या नात्याचे धागे शोधण्याचा एक अचंबित करणारा प्रयोग त्यांनी सुरू केला व मारुती चितमपल्ली आणि अरण्य हे एक अद्वैत होऊन गेले. भौतिक जीवनाशी एकरूप होताना, स्वार्थाव्यतिरिक्त अन्य सर्व भवतालाचा विसर पडण्याचा जमाना जोमात असताना, मारुती चितमपल्ली स्वतःसही विसरून गेले आणि अरण्याशी एकरूप झाले. गेल्या काही दशकांत विकासाचे वारे वेगवान होऊ लागले आहेत. त्यासाठी निसर्गावर करवती चालविल्या जात आहेत. जंगले नष्ट होत आहेत. हा विकास जेव्हापासून सुरू झाला, तेव्हाच वने आणि जंगले हाच ज्यांचा नैसर्गिक व हक्काचा अधिवास असतो, अशा वन्य प्राण्यांचा माणसावरील विश्वास कमी होत गेला असावा. अगोदरच माणसापासून दूर राहण्याची वृत्ती असलेल्या वन्य प्राण्यांचे माणसाशी वैर सुरू झाले. मानव व वन्यप्राण्यांच्या संघर्षाच्या कथा सुरू झाल्या आणि जंगलासोबतचे माणसाचे नाते तुटल्याच्या जाणिवा स्पष्ट होत गेल्या. जंगले जपणे गरजेचे आहे, असा कंठशोष सुरू झाला, पण त्यामागेही पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास मानवी जीवन संकटग्रस्त होणार या भीतीचाच भाग मोठा होता. जंगलांच्या, अरण्यांच्या आश्रयाने हक्काने आपले अधिवास बनविणाऱ्या प्राण्यांच्या चिंतेस या भीतीमध्ये फारसा थारा नव्हता. अशा वेळी त्या जंगलांना, तेथील रहिवासी असलेल्या वन्यजिवांना, वनस्पतींना आणि तेथील पर्यावरणालाही माणसापर्यंत आपल्या व्यथा पोहोचविण्याची गरज वाटली असावी आणि मारुती चितमपल्ली यांच्या रूपाने आपल्याला अशा संवादाचे साधन सापडले या विचाराने निसर्ग, वने आणि अरण्येही सुखावली असावीत. अरण्य वाचनामुळे मन प्रगल्भ झालेल्या चितमपल्ली यांनी वनांची हीच वेदना जाणली; त्यासाठी रात्रंदिवस अरण्ये, जंगले, वनांमध्ये वणवण केली, तिथल्या आदिवासी कोरकू, गोंड, निहाल आणि अनेक जमातींची जीवनशैली, श्रद्धास्थाने, कथा, दंतकथाही जाणून घेतल्या आणि या सामग्रीतून सिद्ध झालेल्या साहित्यानिशी वनांच्या व्यथांची उपनिषदेच त्यांच्या लेखणीतून साकार झाली. वनदेवता, वृक्षदेवता, निसर्गदेवता या केवळ कल्पना नाहीत, तर तिथल्या जीवनशैलीचे ते एक वास्तव आहे. ते जाणून घेतले तर वृक्ष, वनस्पती आणि सृष्टीतील प्राणिमात्रांशी संवाद साधता येतो. याचे बीज आपल्या प्राचीन ग्रंथांतूनही आढळून येते, पण हेच ज्ञान आपल्याला पाश्चात्त्य अभ्यासकांनी दिल्यावर खरे वाटू लागते, ही त्यांची खंत होती. आपल्या लेखनातून हीच माहिती, ज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचावे आणि वास्तवाचे भाव यावे यासाठी त्यांनी केलेले विपुल लेखन हा अद्भुत माहितीचा खजिना होता, असेच अनेकांस वाटले, पण तो केवळ करमणुकीसाठी किंवा निसर्गाच्या माहीत नसलेल्या असंख्य बाबींचा डांगोरा जनांसमोर पिटण्यापुरता मर्यादित नव्हता. या माहितीतून माणसाने निसर्गाशी तुटत चाललेले, दुरावत चाललेले नाते पुन्हा जोडावे, निसर्गाशी संवाद साधावा आणि विकासाच्या नावाने निसर्गाचा व नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास होऊन निसर्गावर जगणे निर्भर असलेल्या मानवेतरांचे जगणेही आश्वस्त करावे, ही त्यांची तळमळ होती. त्यासाठी त्यांनी आपली वाणी आणि लेखणी झिजविली, तरीही त्यांचे काम अपूर्णच राहिले. जल, वायू, वृक्ष, पक्षी आणि निसर्ग यांच्या जगण्याचे शास्त्र उलगडण्याचा त्यांचा संकल्प होता. शतकाच्या उंबरठ्यावरही, त्यासाठी ते झिजत राहिले, म्हणून ते 'अरण्यऋषी' ठरले. चितमपल्ली हे स्वर्गातील दिव्य वृक्षाला आलेल्या खास बहरातून उमललेले एक फूल होते. सुगंध उधळणाऱ्या वाऱ्यावर झुलत हे एकदा धरतीवर अवतरले आणि एकटेच रानात पडले; तिथेही ते निसर्गासोबत झुलत राहिले.

मन मोहवून टाकणारा सुगंध उधळत राहिले... ही वने, जंगले आणि अरण्ये हीच आपल्यासाठी प्रभूने निवडलेली रम्य उद्याने आहेत आणि तेच आपले आहे, अशा भावनेतून वनांशी नाते जोडणाऱ्या चितमपल्ली यांच्या तपश्चर्येतून तयार झालेले नव्या नात्यांचे धागे नव्याने जोडले जातील, तो खंतावलेल्या निसर्गाचा सुदिन ठरेल. केवळ कोणाच्या जाण्याने पोकळी निर्माण झाल्याच्या भावनेने उसासे सोडण्यापेक्षा, ती पोकळी भरून काढण्याची जबाबदारी पेलणारी मने निर्माण होणे ही चितमपल्ली यांच्याशी बोलणाऱ्या अरण्यांची अपेक्षा असेल. ती पूर्ण करण्यासाठी नाती जोडावी लागतील. माणसाने माणसाशी माणसासम वागावे, अशा अपेक्षेच्या काळात, माणसाने निसर्गाशी माणसासम वागावे, या अपेक्षेची भर पडली आहे. मारुती चितमपल्ली नावाच्या अरण्यऋषीने यासाठीच आयुष्य वेचले, म्हणून आपण त्यांचे ऋणी असायलाच हवे.

## जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत (२१)

भारतीय साहित्यात 'महाभारत' या ग्रंथाचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. धर्म, नीती, व्यवहार, इतिहास, काव्य, समाजरचना, राजकारण, तत्त्वज्ञान या सर्व अंगांनी समृद्ध असलेला हा महान 'राष्ट्रीय ग्रंथ' आहे. आधुनिक परिस्थितीच्या संदर्भातही त्यात वर्णिलेली अनेक मौलिक शाश्वत सिद्धांतांची अनुभूती सहजपणे आपल्याला येते. मागील अनेक लेखांमधून आपण याचा पडताळा घेतला आहे. त्या संबंधात सन १९३३ साली महाभारत ग्रंथ संशोधन समिती स्थापन झाली होती. त्या समितीतील एक विद्वान, अभ्यासू आणि महाभारताचा सखोल अभ्यास असणारे दा. सा. यंदे हे आपले मत प्रकटन करताना म्हणतात, ''आपल्या सर्व आर्य ग्रंथात उपनिषद ग्रंथ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने, श्रीमद् भागवत ग्रंथ भक्तिमार्गाच्या दृष्टीने जसे श्रेष्ठतर आहेत; त्याप्रमाणे व्यवहार, समाजकारण, राजकारण या तीनही दृष्टीने महाभारत ग्रंथ श्रेष्ठ आहे. भारतीय साहित्यात महाभारतासारखा दुसरा श्रेष्ठ ग्रंथ नाही, असे जे मत सद्यस्थितीत जगातील विद्वानांचे होऊन राहिले आहे, ते खरेच आहे. सांप्रतच्या आपत्तिकाळात मनाची शांती ठेवून कर्तव्य-जागृती करणारा महाभारतासारखा दुसरा ग्रंथ नाही. त्याचमुळे त्याचे अध्ययन, चिंतन आणि प्रसार करणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे.''

महाभारताचा, त्यातील नीतितत्त्वांचा परिस्थितिसापेक्ष विचार केला तर चक्रवती भरताच्या भारताचे आणि त्यात पुत्ररूपाने राहणाऱ्या, त्याचे वारसदार असलेल्या हिंदू समाजाची दुरवस्था, दैनावस्था कशामुळे झाली? याचे प्रत्यक्ष दर्शन घडते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्ता प्राप्त झालेल्या नवीन राज्यकर्त्यांनी महाभारतात वर्णिलेल्या शाश्वत सिद्धांतांशी फारकत घेऊन आधुनिक 'भारत' 'अ' न्यू नेशन इन मेकिंग'च्या भाडोत्री तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून घडविण्याचा प्रयत्न केला. विचार दारिद्र्याने परिपूर्ण असलेल्या सामान्यजनांनी, भोळसटपणे विभूतिपूजेच्या आंधळ्या भक्तीने अनादिकाळापासून 'देवनिर्मितं देशं हिंदुस्थानं प्रचक्षते' अशी देवांनी निर्मित केलेली 'भूमी' अशा भारताच्या पारंपरिक निष्ठेचा त्याग करून महात्मा गांधी एका 'संतसादृश' विभूतीला 'राष्ट्राचा पिता' म्हणून स्वीकारले. तेथूनच भारताच्या दैवी अस्तित्वाला सूर्य आणि चंद्राला जसे ग्रहण लागते त्याप्रमाणे ग्रहणाचे वेध लागले. त्याचे 'खग्रास' ग्रहणात रूपांतर झाले, ज्यावेळी 'इंदिरा इज इंडिया' या दुर्दैवी घोषणेने भारतीय राजनीतीचे अंतरंग व्याप्त झाले. ग्रहणाचा मध्यान्ह काळ 'आय ॲम ऑक्सी- डेंटली बॉर्न ॲज हिंदू' (मुझे गधा कहो लेकिन हिंदू मत कहो) या वाक्यांनी आपला हिंदू धर्म, हिंदू संस्कृती, हिंदू परंपरा यांची उघड उघड नालस्ती, निंदा करणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडात व्यतीत झाला. त्यांच्या 'हिमालयीन ब्लंडर्स'मुळे झालेल्या चुकांची भीषण किंमत भरताच्या वारसदारांना अद्यापही चुकवावी लागते आहे. हे होणे स्वाभाविकच असते; त्याची कारणमीमांसा महाभारतात सहस्रावधी वर्षांपूर्वी महर्षी व्यासांनी केली आहे. त्याचे दर्शन त्यांनी विदूर आणि धृतराष्ट्र यांच्या संवादात घडविले आहे. ते असे- विदूर धृतराष्ट्राला म्हणतात- ''हे राजन! इंद्रियांवर ताबा नसलेले, उपभोगवादी, चंगळवादी, धर्माचा दुस्वास करणारे, अहंमन्य, चांगल्या लोकांचा चांगला सल्ला न मानणारे, दुसऱ्यांचा मोठेपणा, कर्तृत्व यांचा आदर न करणारे, आत्मलोब्ध म्हणजे स्वतःच्याच सुख-दुःखाला, कुटुंबाला महत्त्व देणारे, जपणारे, स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी राष्ट्राचाही अवमान करणारे असे लोक स्वतःच्या दूषित कर्मांनी बांधले जाऊन स्वतःबरोबर इतरांनाही संकटात, अडचणीत टाकतात. लक्षात ठेव की, वाळलेल्या काष्ठाशी मिसळल्यामुळे ओलेही जळते.''

**'शुष्केणार्द्र दहयते मिश्रभावात्**

या प्रकारच्या योग्यता नसलेल्या राजप्रमुखाभोवती मग स्वार्थी, हाजी हाजी करणाऱ्यांचा जमघट म्हणजे संच जमा होतो. ते स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी अशा राजप्रमुखाची खोटी नाही स्तुती करून त्याला खूश ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या खोट्या स्तुतिसुमनांची हुरळून गेलेला हा राजा, खूशमस्कऱ्यांचेच ऐकणारा होतो. त्याच्या मंत्रिमंडळातील अप्रिय पण हितकारक सल्ला देणाऱ्यांचे तो ऐकेनासा होतो. त्यांचा त्याग करतो. हे राजन! लक्षात ठेव की,

सुलभा : पुरुष राजन सततं प्रियवादिनः।
अप्रियस्य तु पंथ्यस्य वक्ता श्रोताः च दुर्लभः ॥१५॥

म्हणजे- 'हे राजन प्रिय बोलणारे नेहमी सुलभ म्हणजे पुष्कळ असतात, परंतु अप्रिय पण हितकर बोलणारा आणि ऐकणाराही दुर्मिळ असतो.' वरील स्पष्ट निर्देश देताना परखडपणे महात्मा विदुराच्या द्वारा महर्षी व्यासांनी एका दैवी गुणाने परिपूर्ण असलेला शाश्वत संदेश संपूर्ण भरताच्या वारसदारांसाठी दिला आहे; तो म्हणजे- बुद्धी कलुषित होऊन विनाश ओढवला असता अन्याय हाच न्यायासारखा दिसू लागून हृदयातून दूर जात नाही म्हणून बुद्धी कलुषित होऊ देऊ नये. कारण लक्षात घ्या, देव काही गुराख्याप्रमाणे हातात दंड घेऊन मनुष्याचे रक्षण करीत नाही तर ज्याचे रक्षण करण्याची त्यांची इच्छा असते त्याला ते चांगली बुद्धी देतात. त्याचसाठी श्रीसमर्थांनी त्यांच्या 'बुद्धि दे रघुनायका' काव्यरचनेत 'न लगे मजला कांही बुद्धि दे रघुनायका' असे म्हटले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात महाभारताचा संदेश नूतन प्रस्थापित झालेले राज्यकर्ते विसरले. कलुषित झालेल्या बुद्धीने स्वार्थांध होऊन, मदांध होऊन राज्य कारभार करू लागले. देश, धर्म, संस्कृती, न्याय, नीती समाज रक्षण, स्त्रियांचे रक्षण, भूमीचे रक्षण, देशाच्या सरहद्दीचे रक्षण, प्रजेचे संरक्षण करण्याचा राजधर्म विसरले, धृतराष्ट्राप्रमाणे पुत्रमोहात, कन्या मोहात अडकले, अहिंसा परमोधर्माच्या नावाखाली, भंपक आणि भ्रांत असलेल्या हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या मृगजळामागे धावत सुटले. त्याचे दुष्परिणामाचे चटके सहन करीत भरताचे वंशज असलेल्या कोट्यवधी हिंदूंचेच अस्तित्व नष्ट होण्याच्या धोक्याच्या, विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले. पण भारताच्या संरक्षणाचा भार परमेश्वराने उचललेला आहे. त्यासाठी त्याने अनेक अवतार घेतले आहेत म्हणून स्वामी विवेकानंदांनी हिला 'देवभूमी' म्हटले आहे तर योगी अरविंदांनी भारताला 'गॉड चोझन लॅण्ड' म्हटले आहे. परमेश्वराच्या अस्तित्वाच्या काही रचना भारतीय तत्त्वज्ञानात मांडल्या आहेत. त्या म्हणजे व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्ठी. यातील परमेश्वराचे 'समष्टी रूप' म्हणजे लोकशाही. तिचा आधार 'जनता.' म्हणूनच श्रीसमर्थांनी 'जन आणि जनार्दन यात नाही भिन्नपण' असे म्हटले आहे. भारतातील लोकशाहीच्या रूपाने अस्तित्वात असलेला परमेश्वर आणिबाणीनंतरच्या कालखंडात झालेल्या निवडणुकीच्या द्वारा प्रकट झाला. सत्तापिपासू इंदिरा गांधींची सत्ता निर्मूलन झाली, पण जनतेने 'कलुषित बुद्धी'ने वागण्यास प्रारंभ केला. त्यामुळे तिचेच अस्तित्व नष्ट होण्याचा प्रसंग आला. पण परमेश्वराने पुन्हा सद्बुद्धी दिली? देशात योग्य ते परिवर्तन घडवून आणले. त्या बुद्धिदात्या, आत्मस्थ परमेश्वराला साष्टांग प्रणिपात!.

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# 'राज' की बात...

राज्यात मुंबई, नागपूर, नाशिक महापालिकांसह अनेक महापालिकांच्या निवडणुका दिवाळीनंतर होण्याचे संकेत आहेत. या पाठोपाठ जिल्हा परिषद व नगर पालिकांच्याही निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी राजकीय तडजोडी आणि तोडफोड सुरू झाल्या आणि वादळं उठू लागली आहेत. निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर आरोप करण्यास सुरुवात करून राजकीय रणधुमाळी सुरू केली आहे. सत्ताधारी आणि विरोधकांचे आरोप-प्रत्यारोप अपेक्षित आहेत. पण, या राजकीय वर्तुळात प्रत्येक निवडणुकांच्या तोंडावर एक व्यक्ती सत्तेत आणि विरोधात नसूनही कायम चर्चेत असते. प्रत्येक वेळी आपली भूमिका बदलवत गेल्याने त्यांना मतदार गंभीर घेत नसले, तरी निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे इंजिन पटरीवर आल्याशिवाय राहत नाही. मुंबई महानगरपालिका निवडणूक डोळ्यांपुढे ठेवत 'राज'कारणात पुन्हा 'टाळी'चा विषय सुरू झाला आहे. स्वतंत्रपणे स्वतःचा मुलगाही निवडून न आणू शकणारे राज ठाकरे मात्र निवडणुकांच्या तोंडावर भाव खाऊन जात आहेत. युवासेनेत होत असलेली घुमसट लक्षात घेता राज ठाकरे यांनी आपली वेगळी पार्टी उभी केली. तो धक्का बाळासाहेबांच्या जिव्हारी लागला. बाळासाहेबांनी शेवटचा श्वास घेतल्यानंतर अन्त्यसंस्कारापूर्वीच दोन्ही भावांनी एकत्र येण्यावर चर्चा सुरू झाल्या होत्या. त्या आजपर्यंत सुरू आहेत. एका राजकीय महत्त्वाकांक्षेने पछाडलेले दोघेही एकत्र कसे येतील, हा प्रश्नच आहे. तसे ढगं जमा होतात. पण, एकत्रीकरणाचा पाऊस पडत नाही. यात आपले महत्त्व कमी होईल अशी भीती काहींना सतावत असल्याने ती टाळी वाजत नाही अन् भावबंधकी तशीच चर्चेत राहते. मुंबई, ठाणे आणि नाशिक महानगर पालिकेच्या निवडणुकीनिमित्त पुन्हा ती चर्चा सुरू झाली. सुरुवातीला मुख्यमंत्री फडणवीस आणि राज ठाकरे यांची भेट चर्चेत असताना आता ठाकरे यांची शिवसेना शिंदे गटासोबत युतीची चर्चा सुरू झाली. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त त्यावर बोलल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा नवे समीकरण तयार होण्याचे संकेत आहेत. मनसेचा मुंबई, ठाणे आणि नाशिकमध्ये बऱ्यापैकी प्रभाव होता. मात्र गेल्या काही वर्षांत पक्षाची गळती झाली, निवडणुकांतील कामगिरीही कमी झाली. उद्धव ठाकरे यांच्याशी मतभेद झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी बंड करून शिवसेनेने भाजपासोबत सत्ता स्थापन केली. त्यानंतर आता राज ठाकरे आणि शिंदे एकत्र आल्यास एक महत्त्वाचा राजकीय टप्पा ठरेल. ठाकरे आणि शिंदे दोघेही हिंदुत्ववादी भूमिका घेणारे आहेत. (उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी जी लाचारी केली ती अद्याप राज ठाकरे यांनी घेतली नाही.) शिंदे आणि मनसे एकत्र आल्यास मराठी मतांचे विभाजन थांबेल असा एक सूर आहे. विधानसभेत अवघा महाराष्ट्र काबू केल्यानंतर साहजिकच भारतीय जनता पार्टीला मुंबई महापालिकेवरून उद्धव ठाकरे यांना धोबीपछाड द्यायचे आहे. त्यामुळे हिंदुत्ववादी पक्षांची एकजूट हा त्यांच्यासाठी फायदेशीर पर्याय निवडल्या जाण्याचे शक्यता नाकारता येत नाही. मुंबई महानगर पालिका शिवसेनेचा गड आहे. पण, काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाऊन उबाठा कमकुवत झाली आहे. उद्धव ठाकरे यांचा राजकीय आत्मविश्वास ढासळत चालला आहे. पुत्र कर्तव्य म्हणून आदित्यचीही फारशी हिंमत त्यांना नाही. संजय राऊत सध्या नरकातील स्वर्गातच गुंतून आहेत. आता त्यांना शिंदेचे स्वप्न समजू लागले आहेत. आज सकाळी त्यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त झळकलेल्या जाहिरातीत बाळासाहेबांचा फोटो लावल्यावरून बाळासाहेबांचा तुमचा काय संबंध, असा प्रश्न विचारत तुम्ही मोदी आणि शाहांचे फोटो लावावे, असे शिंदेंना सुनावले.


याही पुढे जाऊन राऊत यांनी शिंदेंना शाह आणि पंतप्रधान मोदी यांचे स्वप्न पूर्ण करायचे असल्याचे सांगितले. स्वतःच्या पक्षापेक्षा त्यांना शिंदेच्या पक्षाची जास्त चिंता असल्याचे दिसते. एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे एकत्र आल्यास त्याचा फटका पुन्हा उबाठाला बसल्याशिवाय राहणार नाही, हे सांगण्यासाठी आता कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. राज ठाकरे आणि शिंदे गटाची युती ही मराठी मतांचे विभाजन रोखण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. या युतीमुळे उद्धव ठाकरे यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण होणार. ही युती झाल्यास शरद पवार गट आणि काँग्रेसलासुद्धा जड जाणार आहे. राजकारणावर 'प्रभाव' आणि उद्धव ठाकरे यांचा 'अडकाव' करणारी ठरू शकते. शेवटी राजकारण म्हणजे बदल, समीकरण आणि सामंजस्याचा खेळ आहे. राज ठाकरे यांच्याकडे बाळासाहेबांसारखी वक्तृत्व शैली आणि कलात्मक ताकद आहे. पण, ते मतांमध्ये परिवर्तित करता आले नाही, हे वास्तव आहे. शेवटी 'एका'वर शून्य दहा होतातच ना... राज ठाकरेंचेही तसेच काहीसे समजा... निवडणुका आल्या की त्यांचे महत्त्व वाढते... अखेर, राज की बात है!

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# शरद पवारांचे आवडते आणि नावडते



'शरद पवार यांना समजायला शंभर वर्षे लागतील' असे उद्धव ठाकरे यांचे हनुमान खा. संजय राऊत यांचे एक प्रसिद्ध विधान आहे. काही बाबतीत हे विधान काहीसे खरे तर बहुतेक बाबतीत साफ खोटे आहे. शरद पवार म्हणजे निव्वळ संभ्रमावस्था आहे, भुलभुलय्या आहे. शरद पवार कोणाचेही नाहीत. असते तर त्यांनी आपल्या मुलीला किमान मुख्यमंत्री बनवले असते. मुलगी जाऊ द्या, पुतण्याला तरी मुख्यमंत्री केला असता. एकदा तर तशी संधी चालूनही आली होती. राष्ट्रवादी काँग्रेसला जास्त जागा मिळालेल्या असताना पवारांनी मुख्यमंत्रिपद काँग्रेसला दिले होते. त्यामुळे विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले होते. अजितदादांचा राग तेव्हापासून असणार. ही चर्चा करायचे कारण म्हणजे दोन राष्ट्रवादीच्या मनोमिलनाच्या चर्चा. गेल्या महिन्यात एका इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत शरद पवारांनी अजित पवारांबरोबर हातमिळवणी करण्यावरून पक्षात दोन मतप्रवाह असल्याचे मान्य केले होते. मात्र तो निर्णय पुतण्या अजितदादा आणि मुलगी सुप्रिया सुळे एकत्र बसून घेतील, असे सूचक विधानही त्यांनी केले होते. त्यावरून काका-पुतणे एकत्र येत असल्याच्या चर्चेचे गुऱ्हाळ गेले दीड-दोन महिने सुरू होते. चार दिवसांपूर्वी शरद पवारांची लहर फिरली. 'भाजपाबरोबर जाणाऱ्यांशी हातमिळवणी नाही' अशी स्पष्ट भूमिका त्यांनी पक्षाच्या मेळाव्यात मांडली. काका-पुतण्या यांच्या मनोमिलनाच्या चर्चांना यामुळे पूर्णविराम मिळाला.

''कोणाशीही संबंध ठेवा, पण भाजपाशी संबंध ठेवू नका. भाजपाशी संबंध ठेवणारा काँग्रेसच्या विचाराचा असू शकत नाही. आपल्याला संधिसाधूपणाच्या राजकारणाला प्रोत्साहित करायचे नाही'' असेही ते म्हणाले. ज्या शरद पवारांनी आयुष्यभर संधिसाधूपणाचेच राजकारण केले, ५०-५५ वर्षे महाराष्ट्राला संभ्रमावस्थेत ठेवले त्या पवारांनी विचारधारेच्या गोष्टी कराव्या यापेक्षा दुसरा कुठला विनोद असू शकतो? 'जिधर बम उधर हम' हीच ज्यांची विचारधारा राहिली ते शरद पवार आता शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेत आहेत. भाजपासोबत बसू नका असे आता म्हणता तर मग २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारला बाहेरून बिनशर्त पाठिंबा का दिला होता? उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची ताकद कमी व्हावी, युतीमध्ये बेबनाव व्हावा म्हणून आपण हा डाव खेळला होता, असे स्पष्टीकरण नंतर त्यांनी दिले होते. उद्धव तेव्हाच सावध झाले नसते तर शिवसेना पवारांनी गुंडाळली असती. भाजपाचा विटाळ होता तर मग 'मध्यरात्रीचा शपथविधी' उरकायचा याच काकाने आपल्या पुतण्याचा का पाठवले होते? ही लबाडी कशापायी? १९७८ मध्ये काँग्रेसचेच आमदार फोडून वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर का खुपसला? १९९९ मध्ये काँग्रेसने पंतप्रधानकी दिली नाही म्हणून 'सोनिया गांधी विदेशी जन्माच्या आहेत' असे सांगत त्यांच्या विरोधात वेगळी काँग्रेस का काढली? तोच मुद्दा पुढे साडेचार वर्षांत गुंडाळून युपीए सरकारमध्ये कृषिमंत्री म्हणून का गेले? विचारधारा कशाशी खातात हे तरी पवारांना ठाऊक आहे का? दगाबाजीपलीकडे त्यांनी काय केले? पवारांसोबत राजकारण सुरू केलेले ममता बॅनर्जीसारखे अनेक नेते पुढे गेले. पवारांनी महाराष्ट्रात काड्या करण्यात स्वतःला धन्य मानले. पवारांना स्वतःच्या हिमतीवर कधीही ७१ पेक्षा जास्त आमदार आणि ९ पेक्षा जास्त खासदार निवडून आणता आले नाहीत. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकीत तर त्यांना जेमतेम १० आमदार आणि ८ खासदार निवडून आणता आले. शरद पवारांना आज भाजपा अस्पृश्य वाटतो. कारण त्यांच्या राजकारणाला तो सोयीचा नाही. गेल्या तीन निवडणुकांमध्ये महाराष्ट्र भाजपाच्या पाठीशी राहिला आहे. २०१९ च्या निवडणुकीत उद्धव ठाकरे या पवारांच्या नादी लागले नसते तर अडीच वर्षेही पवारांची सर्कस टिकली नसती. पवारांच्या संगतीत ठाकरे संपले. शरद पवार हे राजकीय समुद्रातला 'बर्म्युडा ट्रँगल' आहेत. त्यांच्याजवळ जे जे गेले ते संपले. हा इतिहास आहे. मात्र, हेच शरद पवार आज भाजपासोबत जाऊ नका म्हणत आहेत. कोण ऐकणार त्यांचे? पुतण्याने तीन वर्षांपूर्वीच काकाला सोडले. आज पुतण्या राज्याचा उपमुख्यमंत्री आहे, अर्थमंत्री आहे. बहुमतासाठी आमदार कमी पडतात म्हणून भाजपाने अजितदादांना जवळ घेतले अशातला भाग नाही. भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भविष्य आहे, याची खात्री पटल्याने लोक स्वतःहून भाजपाकडे आकृष्ट होत आहेत. पवार ज्यांच्या कुबड्या घेऊ पाहताहेत त्या काँग्रेसचे नेते भाजपामध्ये येत आहेत. काँग्रेसचे दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या नातसून जयश्री पाटील नुकत्याच भाजपामध्ये आल्या. आपले राजकारण केव्हाच संपले हे पवारांनाही कळते. पक्ष गुंडाळून त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात आले पाहिजे. मात्र, 'पडलो तरी टांग वर' असा त्यांचा खाक्या आहे. त्यामुळे आज वयाच्या ८४ व्या वर्षीही त्यांना धावपळ करावी लागतेय. पावसात भिजत सभा करावी लागतेय. तो त्यांचा नाईलाज आहे. फिरले नाहीत तर त्यांचा पक्ष भंगारात निघेल. आता तर पवार हे उद्धव सेनेच्याही फार उपयोगाचे उरलेले नाहीत. काँग्रेसही त्यांना दारात उभी करेल, अशी शक्यता कमीच आहे. महापालिका निवडणुकीत खरी लढाई मुंबई महापालिकेसाठी आहे. महाविकास आघाडीची पुंगी तिघांनी मागेच मोडून खाल्ली. वाजवायला आहे काय?

पवार एकटे पडत चालले आहेत. मुलीच्या हातात पक्ष देता येत नाही. कारण मुलीचं नेतृत्व कार्यकर्त्यांना मान्य नाही. सुप्रिया सुळे यांना पक्षात मिळत असलेले महत्त्व अजित पवारांना खुपत होते. त्यातून दोघांमध्ये सुप्त संघर्ष सुरू होता. अशा हवेत या भावा-बहिणीचे एकत्र येणे अशक्यच होते. तरीही पिता म्हणून शरद पवारांना आशा होती. पुतण्याला खेचून भाजपाच्या जवळ जाण्याचा पवारांचा गेम होता. इतकी वर्षे राजकारण करूनही आपण मुलीसाठी काही करू शकलो नाही, याचे एक बाप म्हणून पवारांना वैफल्य आले असणार. सुप्रियाचे करीअर लायनीवर लावून रिटायर व्हावे, असे त्यांच्या मनात असावे. पण नियतीला ते मंजूर नसावे. एकत्र यायचे तर पहिला फोन कोणी करायचा? बॉस कोण असेल? ठाकरे बंधूंच्या मनोमिलनातही हाच मोठा अडसर आहे. पहिला फोन कोणी करायचा? राज किंवा उद्धव यापैकी एकाने फोन केला तर दोन भावांच्या मनोमिलनाचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो. पवारांच्या घरचे जे झाले थोडेफार तेच ठाकरे घराण्याचे होईल, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे. पवार भाऊ-बहीण म्हणा किंवा ठाकरे बंधू म्हणा, भविष्याच्या शोधात आहेत. पण भाजपाशिवाय कोणाला भविष्य असेल? २०२९ च्या निवडणुकीत भाजपा स्वबळावर लोकांपुढे जाऊ शकतो. तसे झाले तर अजितदादा, सुप्रिया तसेच उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे यांचे काय हाल होतील, हे सांगायला कोण्या ज्योतिष्याची गरज नाही. चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागत आहेत. भविष्यातल्या निवडणुका निकालांचे ते ट्रेलर असेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### पर्यटनात अतिउत्साह नको

पुण्यात मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे पावसाळ्यात रोज अनेक पर्यटक भेट द्यायला येतात. येथील इंद्रायणी नदीवर एक पूल बांधलेला आहे. या नदीवरील पूल अचानक कोसळला अन् या अपघातात अनेक जणांनी आपला जीव गमावला. ज्या बातम्या वाचण्यात आल्या त्यानुसार हा पूल वाहतुकीसाठी योग्य नाही, अशी सूचना लावण्यात आली होती. आपण पाहतो आहे की, अलिकडे हौशी पर्यटकांची तसेच पर्यटकांची संख्या सर्वच पर्यटन स्थळी वाढली आहे. अनेक पर्यटकांना धबधब्याच्या, नदीच्या टोकावर जाऊन सेल्फी आणि फोटो काढण्याची हौस असते, तर काही जण धुक्यात नसते प्रयोग करतात. त्यांच्या या उत्साहामध्ये रस्ते चुकणे अथवा दरीत कोसळणे अशा अनेक घटना दरवर्षी घडतात. खरं तर पावसाळ्यातील पर्यटनात 'अतिउत्साह' दाखवू नये. सर्वच पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटकांनी आपली वागणूक नियमानुसारच ठेवली पाहिजे. अनुचित घटना घडली की, सरकार तसेच स्थानिक प्रशासनाला दोष दिला जातो. पर्यटकांनी पावसाळी म्हणा की हिवाळी पर्यटकांनी निखळ आनंद मनसोक्त लुटावा; पण यात अतिरेक नसावा की ज्यामुळे निखळ आनंदाला गालबोट लागेल.

**अविनाश देशपांडे**/ ९२८४६७९६२३

### शहर स्वच्छतेकडे प्रशासनाने लक्ष द्यावे

'आपलं नागपूर! स्वच्छ नागपूर! सुंदर नागपूर!' असं लिहिलेली फलकं दर्शनी भागात दिसायची. आज ती दिसतात, पण त्यातली स्वच्छ आणि सुंदरता हरवलेली आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून पालिका प्रशासनाकडे मनपाचा कारभार सोपविला आहे. शासन बदलले तरी प्रशासनात असणारे कर्मचारी, अधिकारी तेच असतात. त्यांची मानसिकता काही केल्या बदलत नाही. गल्लोगल्ली कचऱ्यांची ढिगारं, रस्त्यांच्या कडेला बांधकाम साहित्य, अरुंद रस्त्यांवर विवाहाचे मंडप, बाजारपेठांच्या रस्त्यांवर फेरीवाल्यांची अतिक्रमणे या बाबी आता नित्याच्याच झाल्या आहेत. थातूरमातूर कारवाई केली की पालिका प्रशासनाची संपली जबाबदारी. आमच्या लहानपणी आम्ही रोज साफसफाई करणारे स्वच्छतादूत बघत होतो. आता ते दूत कुठे गेले? सफाई कर घेता मग रस्ते स्वच्छ का दिसत नाहीत?

**गजेंद्र डोळके**/नागपूर

### वेदना देणारे शब्द

भयंकर, भयानक, भीषण, थरार हे किती भीती निर्माण करणारे शब्द आहेत. ऐकून, वाचून वेदना होतात. तर ते त्या अनुभवातून जातात त्यांचे काय होत असेल या कल्पनेनेच अंग कापायला लागते. क्षणांत सर्व चित्र बदलते. मी स्वतः पावसाच्या थराराचा अनुभव घेतला आहे. एकदा रेल्वेत चार वर्षाच्या मुलीला घेऊन चार दिवस एकाच बोगीत, त्याच सीटवर, थांबलेली गाडी व तुफान पाऊस सुरू होता. रुळ काय प्लॅटफार्मच पाण्यात होते. चार दिवसांनी त्याच गाडीने नागपूरला सुखरूप घरी पोहोचले. पुन्हा वणीला नोकरी करत असताना पावसांमुळे अडकलो होतो.

खाजगी बसमध्ये जामच्या आधी चार दिवस बसमध्ये होतो. सतत जोरात पाऊस सुरूच होता. सोमवारी निघालेलो गुरुवारी रात्री ८ वाजता ८२ तासांनी वणीला पोहोचलो होतो. दोन्ही प्रवासात सोबत चांगली होती. हाल झाले नाही. पावसाळ्यात या दोन घटनांची नेहमीच आठवण येते. म्हणूनच कोणावर संकट आल्याचे समजले की, मला प्रवासातले सगळे अनुभव आठवतात.

**प्रा. अंजली पळणीटकर**/नागपूर

### सुसंस्कार घरातूनच मिळतात

'जे मुला-मुलींच्या जीवनाला देतात आकार त्यांना म्हणतात सुसंस्कार.' संस्कार आणि सुसंस्कार या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटत असल्या, तरी त्यात फरक आहे. संस्कार हे समाजाकडून, शाळेकडून, मित्रपरिवाराकडून मिळत असतात. मात्र, सुसंस्कार हे घरातील आई-बाबा तसेच आजी-आजोबा यांच्याकडूनच मिळतात. आई-बाबा हे सुसंस्काराचे जनक असतात. त्यांच्या प्रत्येक उपदेशात सुसंस्कार पेरलेले असतात.

मुला-मुलींसाठीच्या त्यांच्या प्रत्येक कृतीत विधायक, सकारात्मकता भरलेली असते. त्यांचे बोलणे, उपदेश, सल्ले, आदेश, सूचना या सुसंस्कारमयच असतात. मुला-मुलींना शिक्षण कोठूनही मिळू शकते. परंतु सुसंस्कार घरातून व विशेषतः आई-बाबा यांच्याकडूनच मिळतात. आईला सुसंस्कारांची जननी म्हणतात तर पिता हा सुसंस्कारांचा जनक व रचनाकार असतो. आई-बाबांपेक्षा सुसंस्कारांचा मोठा जनक या जगतात कोणीही नाही. म्हणून मुला-मुलींनी आपल्या जन्मदात्या आई-बाबाची आज्ञा, सूचना शिरोधार्य मानून त्यांनी दाखविलेल्या मार्गावरच चालावे व जीवनाला सत्यम्, शिवम्, सुंदरम आकार द्यावा.

**धोंडीरामसिंह राजपूत**/ ९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडून योग दिनानिमित्त रॅलीस हिरवी झेंडी

## जिल्हा प्रशासन व पतंजली योग समितीच्यावतीने योग दिनाची तयारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**

योग जनजागृतीसाठी जिल्हा प्रशासन व पतंजली योग समितीच्या वतीने जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी महेद्रकुमार कांबळे यांनी या रॅलीस हिरवी झेंडी दाखवली.

२१ जून रोजी सकाळी सहा वाजता संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर जिल्हा प्रशासनाच्यावतीने भव्य येऊ शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराच्या जनजागृतीसाठी २० जून रोजी सकाळी नऊ वाजता अपर जिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी सम ाधान घुटूकडे, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार, सहाय्यक क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, पतंजली योग समितीचे राज्य समिती सदस्य तथा जिल्हा संरक्षण कुंडलिकराव निर्मले, महिला समितीच्या प्रांत सदस्य माधुरी शास्त्री, भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, सह प्रभारी बालासाहेब हरण, महिला प्रभारी ज्योती शेळके, लीगल सेल जिल्हा प्रभारी एकनाथ बांगर, जिल्हा कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल, महामंत्री शितल तापडिया, सोशल मीडिया प्रभारी प्रणत अग्रवाल, पूजा चौरसिया, नाशिक योग विद्या धाम चे रत्नाकर महाजन, जायंट्स ग्रुपचे जिल्हाध्यक्ष अभय भारतीया, माणिक स्मारक, सरजू देवी व शांताबाई दराडे विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षकासह विविध योग प्रेमी संस्थांच्या प्रम ुख उपस्थितीत या रॅलीचे शहरात आयोजन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात येत असून या दिनानिमित्त सर्व शाळा, महाविद्यालये याठिकाणी पतंजली योग समितीच्या सदस्यांनी विद्यार्थी, शिक्षक तसेच योग प्रेमीसाठी योग शिबीरांचे आयोजन केले आहे. तसेच संत नामदेव पो-लीस कवायत मैदानावर पतंजली योग समितीच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून रॅलीचा समारोप करण्यात आला.

# नोटांचा हार घेवून शेतकरी संघटनेचे कृषी विभागात आंदोलन

## बोगस खतविक्री करणाऱ्यांचा परवाना निलंबीत करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**



बोगस खत विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांचा परवाना कायमस्वरूपी निलंबीत करावा तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने नोटांचा हार घेवून कृषी अधिकाऱ्याच्या दालनात ठिय्या आंदोलन करीत घोषणाबाजी केली. यावेळी पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला होता.

शहरातील गोदावरी कृषी केंद्रावर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दि १९ जून रोजी छापा टाकला. यामध्ये डीएपी खत बनावट असल्याच्या संशयावरून अधिकाऱ्यांनी संबंधित दुकानाला सील ठोकले आहे. या शिवाय केंद्रचालक कृष्णा निलावार याच्यावर कायदेशीर कारवाई देखील करण्यात आली आहे. याप्रकरणी शुक्रवार दि २० जून रोजी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, नामदेव पतंगे, प्रवीण मते, गजानन काळे, बाळासाहेब बोंगाणे, ज्ञानेश्वर कावरखे, दशरथ मुळे, संजय मुळे, शेख रफीक, एकनाथ नागरे, गणेश मुंढे, प्रवीण मानमोठे यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी पदाधिकाऱ्यांनी कृषी विभाग तसेच विक्रेत्याच्या विरोधात घोषणाबाजी केली.

हिंगोली जिल्ह्यात ईपॉस मशीनवर खताची विक्री होत नाही तसेच काही ठिकाणी बोगस खत विक्री केले जात असल्याचे कृषी विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे संतप्त पदाधिकाऱ्यांनी नोटांचा हार तयार करून आणला. बोगस खत विक्री करणाऱ्या खत विक्रेत्याचा परवना कायमस्वरूपी निलंबीत करा तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा अशी मागणी यावेळी करण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी आणलेला नोटांचा हार जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या गळ्यात घालण्याचा प्रयत्न पदाधिकाऱ्यांनी केला. परंतु पोलिस निरीक्षक शाम डोंगरे यांनी मध्यस्थी केली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात ठाण मांडले. कृषी विभागाला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले असून लवकरच कारवाई करण्याचे आश्वासन यावेळी आंदोलकांना देण्यात आले.

# आज संत निरंकारी मंडळाच्यावतीने योग दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**




येथील संत निरंकारी मंडळाच्या वतीने शनिवारी तारीख २१ सकाळी सात ते आठ या वेळेत सत्संग भवन येथे योग दिनाच्या कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले आहे.

संत निरंकारी मिशन मार्फत आंतरर्राष्ट्रीय योग दिवसा-चे औचित्य साधून शनिवार, २१ जून रोजी देशभरात १००० पेक्षा अधिक ठिकाणी एकाच वेळी योग दिवस' आयोजित केला जाणार आहे. मिशनच्या विविध शाखांम ध्ये हे आयोजन स्थानिक योग प्रशिक्षकांच्या म ार्गदर्शनाखाली खुल्या प्रांगणात किंवा उद्यानांमध्ये करण्यात येईल, ज्यामध्ये निरंकारी भक्तगण, सेवादल स्वयंसेवक व स्थानिक नागरिक उत्साहाने भाग घेणार आहेत. मंडळाच्या हिंगोली शाखेच्या वतीने संत निरंकारी सत्संग भवन येथे सकाळी ७ ते ८ या वेळेत योग दिवसाचे आयोजन करण्यात आले असून त्याम ध्ये निरंकारी भक्तगणांसह इतर नागरिकांनीही सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे

२०१५ सालापासूनच संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन द्वारे योग दिवस' नियमितपणे देशव्यापी स्तरावर आयोजित केला जात आहे. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आशीर्वादाने या उपक्रमाचा सातत्याने विस्तार होत आहे सतगुरु माताजींचे हेच मार्गदर्शन आहे की स्वस्थ मन, सहज जीवन', योन ही भारतातील एक प्राचीन विद्या आहे जी केवळ शरीरालाच बलवान असे नव्हे तर म नाला शांती देते आणि आल्याला जागृत करण्याची क्षम ता बाळगते याचा नियमित अभ्यास करून मनुष्य तनाव, असंतुलन आणि रोग इत्यादीपासून स्वत चा बचाव करणे आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी सहभागी होण्याचे आ-वाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे



**हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील सुरेगाव येथे संशयीत क्षय रूग्णांची एक्स रे तपासणी करण्यात आली. यावेळी क्षयरोग तज्ज्ञ डॉ देवेंद्र जायभाय यांनी ११० रूग्णांची तपासणी केली. यावेळी तालुका अधिकारी डॉ गजानन चव्हाण, सरपंच शीलाताई पोले, डॉ ताटेवाड, डॉ बेंगाळ, डॉ जाधव, डॉ ढेंबरे यांच्यासह आरोग्य सेविका, गटप्रवर्तक, आशा वर्कर आदी. छाया- दत्तात्रय शेगुकर**

## संक्षिप्त वृत्त

### जागतिक योग दिनानिमित्त फलकलेखन

हिंगोली- कै. नागनाथराव गुंडेवार माध्यमिक विद्यालय, सा-लेगाव येथे २१ जून रोजी जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार या निमित्ताने शाळेतील कलाशिक्षक आणि चित्रकार शिवाजी आर. निळकंठे यांनी विशेष फलकलेखन करून विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जनजागृती केली. योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यविषयक लाभ, तसेच भारताच्या योग परंपरेचा गौरव या विषयांवर आधारित संदेशमूल्य असलेले फलक विद्यालयाच्या मुख्य भिंतीवर सजविण्यात आले. निळकंठे सरांच्या सृजनशील हातातून साकारलेले हे फलक लेखन विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष लक्ष वेधून गेले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत आत्मीयता निर्माण झाली असून, योग हे केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक स्वास्थ्यासाठीही आवश्यक आहे, याची जाणीव सर्वांना झाली. या उपक्रमाचे विद्यालयाच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी विशेष कौतुक केले.

### कोनाथा येथून ओंकारनाथ भगवान संस्थानची पायी दिंडी पंढरपूरकडे रवाना



वसमत- तालुक्यातील कोनाथा येथील ओंकारनाथ भगवान संस्थानची पायी दिंडी पंढरपूरकडे रवाना झाली आहे. मागील सतरा वर्षापासून २०० हून वारकरी या दिंडीत सहभागी होतात. दिंडीचे नेतृत्व अशोकराव बेंडे व रामदास बेंडे हे करीत आ-हेत. यावेळी ओंकारनाथ भगवानची महापूजा करून वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने पंढरपूरकडे प्रस्थान केले आहे.

### सुरेगाव येथे संशयीत क्षयरोग तपासणी शिबीर

हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील सुरेगाव उपकेंद्रात क्षयरोग रुणाची एक्स-रे तपासणी शिबिर शुक्रवारी( दि.२०) रोजी सकाळी ९ ते ४ या वेळामध्ये आयोजित करण्यात आले. जिल्हाक्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र लोहरा अंतर्गत उपकेंद्र सुरेगाव येथे संशयित क्षयरोग रुणांची एक्स-रे तपासणी करण्यात आली. या क्षयरोग रुणाची एक्स-रे तपासणी ११० रुणांची तपासणी करण्यात आली आहे .यावेळी या शिबिराचे उद्घाटन सरपंच शीलाताई माधवराव पोले यांच्या हस्ते झाले. या शिबिरास तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गजानन चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश ताटेवाड ,समुदाय अधिकारी डॉ. रघुनाथ बेंगाळ, डॉ. गजानन जाधव, डॉ.विजय ढेंबरे यांच्यासह आशा वर्कर, गटप्रवर्तक आदींची उपस्थिती होती.

# १५ लाखात एक किलो सोने देण्याचे आमिष दाखवून व्यापाऱ्याची फसवणूक

## वसमत शहर पोलिस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २० जून**

नांदेड येथील एका व्यापाऱ्याला १५ लाखात १ किलो सोने घेण्याचे आमिष दाखवून आरोपींनी चक्क बनावट सोने देऊन फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी वसमत शहर पोलिस ठाण्यात गुरूवार दि १९ जून रोजी रात्री गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी आसेगाव टी पॉईंटवरील सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपींची ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार नांदेड शास्त्री नगर भागातील व्यापारी संतोष बेलापूरे यांच्या दुकानात एक अनोळखी कुटुंब गेले होते. पूलाच्या खोदकामात सोने सापडले असून सदर सोने खरे आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी आली मदत हवी असल्याचे सांगितले. त्यानंतर त्या कुटुंबाने संतोष यांना सोन्याचे मनी दिले. त्यांनी सराफा व्यापाऱ्याकडे जाऊन चौकशी केली असता सदर सोने खरे असल्याचे सांगितले. त्यानंतर त्या कुटुंबाने १५लाखात एक किलो सोने देण्याचे संतोष यांना सांगितले. कमी किंमतीत एक किलो सोने मिळत असल्याने संतोष यांनी त्याची कुठही वाच्यता केली नाही. त्यानंतर संतोष याने सौदा झाल्यानंतर १५ लाख रूपये एकत्र केले. त्यानंतर त्या कुटुंबाने त्यांना वसमत येथील आसेगाव टी पॉईंटवर बोलावून घेतले. त्याठिकाणी संतोष यांच्याकडून १५ लाख रूपये घेतले व त्यांना एक २० पदरी हार दिला. त्यानंतर ते कुटुंब निघून गेले.

दरम्यान, काही दिवसानंतर संतोष यांनी सदर सोने गहाण ठेवण्यासाठी बँकेत नेले असता त्या सोन्याच्या हाराबाबत त्यांच्या पत्नीला संशय आला. त्यांनी घरी येऊन हार पाण्याने धंतला असता तो काळा पडला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी भाग्यनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. मात्र सदर घटना वसमत शहर पोलिसांकडे वर्ग केला. यावरून पोलिसांनी दोन पुरूषांसह एका महिलेविरूध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बालाजी मिरासे पुढील तपास करीत आहेत. सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिस पोलिस तपास करीत आहेत.

# नशाबंदी मंडळ राज्यात ड्रग्ज फ्री अभियान राबविणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत व्यसनमुक्तीवर कार्य करणारी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य ही स्वयंसेवी संस्था आहे. संस्थेने ६८ व्या वर्षात पदार्पण करत महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकाचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन शिबीर दि.१३ते१५ जून दरम्यान प्रयास, सेवाकुंर भवन अमरावती येथे पार पडले.

राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्यात व्यसनमुक्ती विषयावर कार्यरत जिल्हा संघटकाना २०२५-२६ ची मान्यता तसेच वर्षभरात संघटकाचे व्यसनमुक्ती कार्य नियोजन करण्यात आले. व्यसनमुक्ती प्रचार आणि प्रसारार्थ जिल्हा संघटकांना पोस्टर, पत्रक, महामानव-ाने विचारांचे ग्रंथ, व्यसनमुक्ती विषयावर प्रबोधनात्मक सापशिडी वितरित करण्यात आली. शिबीरात प्रयास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश सावजी, नशाबंदी मंडळाचे सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक चिटणीस अमोल मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा यांची प्रमुख उपस्थिती होती. नशाबंदी मंडळाचे पदाधिकारी रामकृष्ण डिग्रसकर यांनी व्यसनमुक्तीपर गीताचे प्रशिक्षण दिले. राज्यातील ३६ जिल्ह्यातील संघटक, ७ विभाग प्रमुख, कार्यालयीन कर्मचारी, व्यसनमुक्ती चळवळीतील कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. राज्यातील जिल्ह्यानिहाय किमान १० शाळा तंबाखूमुक्त करण्याचा उपक्रम, जिल्ह्या-जिल्ह्यात ड्रग्स फ्री जिल्हा अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आला अशी माहिती नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या कार्यकर्त्या शुभदा सरोदे, बालाजी दुमाणे, विठ्ठल सादुलवार, रघुनाथ सवंडकर, कृष्णा चौंडेकर, राधाकिशन हंचाटे, सुभाष कुंभारकर यांनी दिली आहे. शिबिराचे प्रारंभ महाराष्ट्र गीताने करण्यात आले. सम ारोपिय सत्रात जिल्हा संघटकांना सहभाग प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

# शिक्षकेत्तर संघटनेकडून सहाय्यक लेखाधिकारी पतंगे यांचा सत्कार

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २० जून**



येथे नव्याने रुजू झालेले वेतन पथक अधीक्षक कार्यालयातील सहाय्यक लेखाधिकारी म्हणून नांदेड येथील समाज कल्याण कार्यालयात सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत असलेले बदलीने नांदेड येथून हिंगोली येथे वेतन पथक अधीक्षक कार्यालयात सहाय्यक लेखाधिकारी म्हणून रुजू झा-लेले डी.वाय. पतंगे यांचा सत्कार हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हिंगोली येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी अध-ीक्षक कार्यालयात घेण्यात आलेल्या या कार्यक्रम ाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून लेखाधिकारी आर.ए.लांडे, विनोद करंडे,मिलिंद इंगोले, एन पी खरवडे, श्रीमती पाचपुते यांची उपस्थिती होती. यावेळी हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक उच्च म ाध्यमिक शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक,जिल्हा उपाध्यक्ष संतोष गंगावणे, वसमत तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, आकाश बांगर, शेख अली, बी. एस.दराडे, घोगरे, खिल्लारे, परसराम भोसले, मनोहर गायकवाड,मुख्याध्यापक राजकुमार यादले, ओमकार सावरे, शेख मन्नान, वैजनाथ गाडे यांनी नव्याने रुजू झालेले सहाय्यक लेखाधिकारी डी.वाय.पतंगे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# वसमत शहरासाठी बायपास मंजूर आ. राजू नवघरे यांची माहीती

**तभा वृत्त सेवा**
**वसमत, २० जून**



वसमत विधानसभेचे आमदार राजू नवघरे यांनी नुकतीच केंद्री परिवलन मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली असून शहरासाठी बायपास रस्ता मंजूर झाल्याची माहीती दिली आहे.

आमदार राजू पाटील नवघरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याम ुळे शक्य झाली आहे. अनेक बैठका, पाठपुरावा, प्रशासन व केंद्रीय स्तरावर चर्चा करून त्यांनी हा मुद्दा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पातळीवर नेऊन वसमत बायपास मंजुरीचा निर्णय मिळवला. या निर्णयामुळे वसमत शहरातून जाणाऱ्या अवजड वाहनांची गर्दी कमी होणार असून, रहदारीला सुटसुटीत वाट मिळणार आहे. अपघाताचे प्रमाण कमी होणे, प्रदूषण घटणे आणि शहराचा सर्वांगीण विकास होणे, या दृष्टिकोनातून हा बायपास म हत्वाचा ठरणार आहे.

आमदार नवघरे यांची भूमिका: वसमतकरांना वाहतुकीपासून होणाऱ्या त्रासापासून कायमचा दिलासा देण्याचे माझे स्वप्न हो-ते. अखेर त्याला यश मिळाले. लवकरच बायपासचे काम सुरू होईल आणि वसमत शहर नवा विकास अनुभवेल, असे आम दार राजू पाटील नवघरे यांनी सांगितले. या निर्णयामुळे वसमत शहरातील नागरिकांत आनंदाचं वातावरण आहे. व्यापारी, शेतकरी, विद्यार्थ्यांपासून साम ान्यनागरिकांपर्यंत सर्वांनी आम दार नवघरे यांचे आभार मानले आहेत.

www.tarunbharat.net

शनिवार, दि. २१ जून २०२५

तरुण भारत छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

- उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्प २७२ किलोमीटर लांबीचा आहे.
- या उपक्रमाचा प्रमुख भाग म्हणजे चिनाब रेल्वे पूल! हा जगातील सर्वाधिक उंच रेल्वे पूल ठरला आहे.
- या प्रकल्पात एकूण ३६ बोगदे असून त्यांची एकत्रित लांबी ११९ किलोमीटरपेक्षा जास्त आहे.
- चिनाब पूल बांधण्यासाठी २८ हजार मेट्रीक टनांहून अधिक स्टील, ६ लाखांपेक्षा जास्त बोल्ट आणि १७ स्वतंत्र स्पॅन वापरले आहेत

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी** / ९८८११५२४३९

# चिखल्या



महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांब अशी समृद्ध किनारपट्टी लाभली असून, हिवाळ्याच्या दिवसात अनेक विदेशी पक्षी या किनारपट्टीवर विहार करण्यासाठी येतात. यांना पाहुणे पक्षी असंही म्हणतात. यापैकी एक पक्षी आहे चिखल्या! या पक्ष्याच्या वेगवेगळ्या प्रजाती असून, आकाराने लहान आणि एकत्र दाटीवाटी करून राहणारे पक्षिजीव आहेत. स्वभावाने अतिशय लाजरे असल्यामुळे, आपण जवळ जाण्याचा थोडा जरी प्रयत्न केला तर हे सर्व उडून लांब जाऊन बसतात. या पक्ष्यांचा रंग हा किनाऱ्यावरील वाळूशी मिळताजुळता असल्याने, वेगवेगळ्या प्रजातीच्या पक्ष्यामधील अमुक पक्षी नक्की कोणत्या प्रजातीतील आहे, हे सहजपणे ओळखता येत नाही आणि हेच या चिखल्याचे वैशिष्ट्य आहे. आपल्याला ओळखता येण्यासारख्या याच्या प्रामुख्याने दोन प्रजाती आहेत आणि ते केवळ त्याच्या आकारावरून! म्हणूनच त्या दोन प्रजातींना मोठा चिखल्या आणि छोटा चिखल्या असे म्हटले जाते. चिखल्याची आणखी एक विशेषता म्हणजे मार्च-एप्रिल महिन्यांदरम्यान या पक्ष्यांचा विणीचा हंगाम जवळ येऊ लागतो तसा त्यांच्यात आमूलाग्र बदल होतो. जणू आपल्या गावी जाऊन विणीचा उत्सव साजरा करण्यासाठी हे सर्व नटूनथटून तयार होतात. या काळात या चिखल्या परिवाराची प्रत्येक प्रजाती वेगवेगळे रूप धारण करते. या बदलांमुळे त्यांना ओळखणे सोपे होते. पक्ष्यांच्या या थव्यात छोटा चिखल्या आणि मोठा चिखल्या या दोन प्रजातींची संख्या जास्त असते. या दोन्ही प्रजाती सारख्या वाटत असल्या तरी त्यांच्या पायांचा रंग व चोचीचा आकार वेगळा असतो. यांचाच छोटा भाऊ केंटिश चिखल्याची संख्याही या समूहात मोठी असते. आकाराने बरेच मोठे असलेले राखी चिखल्या आणि सोन चिखल्या या दोघांचे रंग फिके असल्याने ते सारखेच दिसतात. पण विणीच्या हंगामात नावाप्रमाणे त्यांचे रंग गडद दिसतात. ?'पॅसिफिक गोल्डन प्लोव्हर?' अर्थात चिखले किंवा चिखल्या या छोटाशा स्थूल पक्ष्यांच्या पिसाऱ्यांमध्ये सोनेरी आणि तपकिरी रंगाचे मिश्रण असल्याचे आढळते. समुद्रकिनाऱ्याजवळ आणि तटीय भागांमध्ये आढळून येणारे हे पक्षी किडी, फुलपाने, छोटे कीटक आणि शेवाळ खातात. जलद गतीने धावताना त्यांचा आवाज? 'चीं -चीं?' असा ऐकू येतो.

## टॉम आणि जेरी

भीत नाही धिटुकले
जेरी भाऊ पिटुकले
कसबी मोठे कारागीर
गोलम गोल गोटूकले

राहता फक्कड स्वच्छ
बुद्धी तल्लख लख्ख
टॉम असून मांजर तिला
घाम फोडता चक्क



काळ्या सुंदर मिशा
हसू खेळते ओठावर
लांब पिवळा ठिपका
गोल ढेबऱ्या पोटावर


टॉम लागताच मागे
लपून बसता बिळात
उंदीर कसा जिंकतो
आणि, मांजर हरते मुळात?

प्रश्न आमच्या मनात
उत्तर देईल कोण?
जंगलातल्या सिंहालाच
लावून बघतो फोन

**-भानुदास धोत्रे**
७९७२६२५०८६

## Math puzzle

Put the numbers from 1 to 9 in circle so that each straight line of three numbers will have addition of 15. You can use each number only once.



Math Puzzle 31 Answer : 639

## शब्दचक्र पंचाक्षरी......

संकेत :-

1. राजाचा राणीवसा
2. जिम्मा, जोखीम, भार
3. पाण्यात बुडून मरण पत्करणे
4. पाण्यात पोहणे
5. शहरात येणाऱ्या मालावर स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा जकात आकारण्याचे ठिकाण
6. जमिनीत मिसळलेला, खाली पडलेला
7. पाणी भरलेल्या चिनी मातीच्या पेल्यांमधून सप्तस्वर काढणारे एक वाद्य
8. एका पौराणिक कथेनुसार सर्पयज्ञात 'तक्षकाय स्वाहा... इंद्राय स्वाहा' म्हणणारा राजा (उत्तर पुढील अंकी)




## वंडर गर्ल
# रेक्रिक लॉंगपोम कानग्लम

**संजय पेंडसे**/९४२२४४३२९५



**बालमित्रांनो,** आपण आपल्या आई-वडिलांबरोबर आपलं मत सांगावं, आपलं म्हणणं मांडावं, आपले विचार सांगावे, त्यांचा सल्ला घ्यावा, त्यांच्याशी गोष्टी कराव्या, असं प्रत्येकालाच वाटतं. पण, आपली आजची वंडर गर्ल रेक्रिक ही वर्षातून फक्त दोन महिने आपल्या आईवडिलांना भेटते कारण, ती मुळात अरुणाचल प्रदेशची आहे. नागपूरमध्ये देवी अहल्या मंदिर येथे ती राहते. साहजिकच इतक्या दूर, अनेक वेळा तिला जाता येत नाही. पण, त्यामुळे उदास होऊन बसून न राहता ती सातत्याने क्रियाशील राहते. इथे ती फक्त अभ्यासाकडे लक्ष देते असं नाही तर, तिला खेळाची आवड असल्यामुळे खेळाकडेही लक्ष देते. सुरुवातीला समितीच्या शाखेमध्ये खेळता खेळता तिला लंगडी या खेळाची आवड निर्माण झाली. महाराष्ट्? क्रीडा मंडळामध्ये जाऊन तिने खो-खोचा सराव केला. खो-खो हा खेळ तिच्या आवडीचा ठरला आणि बघता बघता महाराष्ट्? क्रीडा मंडळातर्फे वर्ष २०१७ पासून ती खोखोच्या निरनिराळ्या स्पर्धांमध्ये,भाग घेते, खासदार क्रीडा स्पर्धा सातारा, फलटण अशा अनेक ठिकाणी राज्यस्तरीय स्पर्धांमधून तिने पारितोषिकं मिळवली आहेत. शिवाय, या खेळात दहा ते पंधरा पदकं मिळवून, तिने आपलं प्राविण्य दाखवून दिलं आहे. तिचे खो-खो चे मार्गदर्शक वैभव तुंबडे सर, सुधीर चिटणीस सर हे असून पद्माकर चारमोडे हे नेहमीच तिला प्रोत्साहन देतात, असं ती आवर्जून सांगते. शाळेमध्ये इतिहास आणि भूगोल शिकवणाऱ्या कानसकर मॅडम तिला जास्त आवडतात. गोष्टी ऐकणं, गोष्टी सांगणं यात तिला विशेष रस आहे. समितीच्या घोषवादनातदेखील ही सहभागी होते. तिला शारीरिक शिक्षक व्हायचं आहे आणि आपल्यासारखं इतर मुलींनीदेखील सुदृढ व्हावं, याकरता प्रयत्न करायचा आहे .

हे सगळं करताना सकाळी एक तास समितीच्या शाखेत जाणं, त्यानंतर अभ्यास करणं आणि रोज जवळपास तीन तास खो-खोचा सराव करणं, हा तिचा नित्यक्रम आहे. ती अभ्यासातही मागे नाही. घरापासून दूर राहून आपल्या स्वप्नांना पूर्ण करणाऱ्या रेक्रिक या आपल्या आजच्या वंडर गर्लला तरुण भारतचा छोटे उस्ताद सलाम करतो आणि तिच्या भावी आयुष्यासाठी तिला शुभेच्छा देतो.

## तरुण भारतचा अभिनव उपक्रम
# ज्ञानांजली!



**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच - १६ उत्तरे

१) प्रेमरूपी चांदणे २) कापूर ३) बंडूतात्या ४) चिलीम ५) आत्माराम भिकाजी ६) कस्तुरी ७) पक्क्या८) मुंडगांव ९) बुक्का १०) मन

### प्रश्नसंच क्र. १६ चे भाग्यवान विजेते

**एकूण ६०९ जणांनी उत्तरे दिली. त्यापैकी, खालील गजानन भक्तांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले.**

अस्मिता लिमये, अनघा बिराजदार, करुणा कुळकर्णी, शुभांगी आडगळे, चित्रा शिनकर, कल्पना धोपे, हेमंत देशपांडे, सामिता अंधारे, श्रद्धा कोकणे, जयश्री डोरले, सुनेत्रा कोडापे, माणिक पांढरे, आशाराणी सुतार, सीमा धर्माधिकारी, तन्मय कुलकर्णी, सीमा निवसरकर, ज्योती नगरकर, मृदुला लोखंडे, सुरेखा भारत, वैशाली देवळे, स्नेहल, मनिषा शुक्ल, गायत्री कुळकर्णी, मिलींद पटोळे, तनुजा देसाई, शीला पडोळे, अलका भिरूड, नीलम पांढरीपांडे, प्रीतिलता वखरे, अनिता पोटे, स्वानंद फडके, आराधना पिंगळे, सुरेखा वाणी, प्रकाश कुंटे, अतुल देवगडे, संजय काळे, वसुधा कोरात्रे, प्रवीण कोदंडे, स्वाती जकाते, सतीश देवरस, नारायण तायडे, राधिका अडगळे, सीमा सावजी, प्रतिमा गोरे, अनघा वाचासुंदर, आरती देशपांडे, सुरेखा जोशी, शैलजा देशपांडे, नारायण जोशी, संध्या चावडीपांडे

## प्रश्नसंच - १७
### कोण कोणास म्हणाले ?

**१) जन्मे न कोणी। मरे न कोणी। हे जाणावयालागुनी।।परमार्थाचा उपाय जाणी। शास्त्रकारे कथन केला।।**
अ) बाळाभाऊ बंकटलालास ब) महाराज भास्करास क) पितांबर लोकांना ड) बायजा पुंडलिकास

**२) आमुचे म्हणून जे जे काही । ते अवघेच आहे आपुले आई ॥**
अ) मारुतीपंत महाराजांना ब) महाराज पुंडलिकास क) बाळाभाऊ हरी पाटीलास ड) बापुना महाराजांना

**३) आता इतुकीच विनंती । आहे शेठजी तुम्हांप्रती ॥ मला नेऊन पायावरती । घाला शीघ्र समर्थांच्या ॥**
अ) बंकटलाल भवानीरामांना ब) पुंडलिक बंकटलालास क) भाऊ कवर बाळाभाऊस ड) जानकीराम बंकटलालास

**४) म्हणे काम ना माझे ये ठाई । मी न आलो मागण्या काही।। तारवाला शिपाई । वाट पहातो काय हे ?**
अ) महाराज भाऊ कवरला ब) भास्कर बाळाभाऊस क) काशीनाथ मनाशी ड) भाऊ कवर मनाशी

**५) तू आता मागे सर । अवलियाचे भजन कर ॥ तेच नेतील आपणा पार । त्याची चिंता करू नको ॥**
अ) भाऊ कवर गाडीवाल्यास ब) जोशी शिपायास क) बाळाभाऊ गाडीवाल्यास ड) महाराज खंडू पाटीलास

**६) हे नरदेहधारी परमेश्वरा। हे दयेच्या सागरा।। लेकरासी कृपा करा। अर्भक मी तुमचे असे।।**
अ) बंकटलाल महाराजांना ब) व्रजभूषण महाराजांना क) निमोणकर महाराजांना ड) भास्कर महाराजांना

**७) सत्पुरुषाचे आचरण । पुढील पिढीला साधन ॥ होते कराया संरक्षण । निसर्गाच्या धर्माचे ॥**
अ) दासगणू लोकांना ब) बंकटलाल लोकांना क) भास्कर लोकांना ड) बाळाभाऊ लोकांना

**८) आज प्रसाद घेऊन । तुम्ही तृप्त व्हा अवघे जण ॥ मात्र उद्यापासोन । या स्थळाशी येऊ नका ॥**
अ) महाराज कावळ्यांना ब) महाराज गाईला क) महाराज घोड्याला ड) महाराज भागाबाईला

**९) आम्ही तया योगीवरा । कोठे न जाऊ देऊ खरा ॥ निधी चालत आला घरा। त्याते कोण दवडी हो ?**
अ) पिंपळगावचे लोक शेगावचे लोकांना ब) कोंडोलीचे लोक इतर लोकांना क) बुटी शेगावच्या लोकांना ड) कोंडोलीचे लोक पुंडलिकास

**१०) त्याचा परिणाम ऐसा होतो । अविधि कृत्यास ऊत येतो।। तो येता सहज जातो । समाज रसातळा ॥**
अ) जानकीराम मुलांना ब) कुटाळ गंगाभारतीस क) गंगाभारती कुटाळास ड) हवालदार बाळाभाऊंना

# आईची राखलेली पायघड

**अनिरुद्ध नरखेडकर**/ ९५९५१५५२५५

एका मध्यमवर्गीय शहरात, विजय नावाचा तरुण आपल्या पत्नी आणि दोन मुलांसोबत राहत होता. त्याचे वडील पूर्वीच वारले होते आणि त्याची आई सुनंदा आता ७८ वर्षांची झाली होती. शरीर अशक्त झालं होतं, चालताना हाताला आधार हवा लागत असे. पण, डोळे अजूनही तेजस्वी होते कारण, त्यात मायेचा प्रकाश अजूनही होता. सुनंदाबाईंच्या आठवणी अजूनही ताज्या होत्या. त्याच घरात तिने कष्ट करून पोरांना वाढवलं, त्यांची हौसमौज सांभाळली, पोटाला चिमटा घेऊन त्यांचा शैक्षणिक खर्च केला. विजय सरकारी अधिकारी झाला.

पण, जसजशी आई म्हातारी झाली, तसतसं विजयला तिचं अस्तित्व त्रासदायक वाटू लागलं. 'आई पावलं घासत चालते. तिच्या पायाच्या नखांनी फरशीवर ओरखडे येतात. घरात नेहमी औषधांचा वास रहातो, अशी कुरबूर तो आपल्या बायकोसमोर करत असे.



आईचे पाय सुजायला लागले, श्वास फुलू लागला. डॉक्टरकडे न्यायला हवं होतं पण, विजयला वाटायचं 'वय झालंय...आता काही फरक पडणार नाही.' त्याने घरातच तिला पडून राहू दिलं. खायला दिलं पण, औषधं वेळेवर नाही. ताप आला तरी, 'थोडा आराम कर' एवढंच म्हणत राहिला.

आई नेहमी विचारायची,'विजू, मला डॉक्टरकडे कधी घेऊन जाशील?'

तो म्हणायचा,'आई, मी बिझी आहे. पुढच्या आठवड्यात नेईन.'

एक दिवस, आईचा श्वास थांबला. संपलं सगळं! त्या दिवशी विजय ऑफीसमधून घरी परतला, तेव्हा घरात शांतता होती. आई शांत झोपली होती...कायमची! तिच्या पायाजवळ त्याच्या लहानपणीच्या पायघड्या ठेवल्या होत्या. त्याच्या डोळ्यांसमोर बालपणात आईने रात्री जागून त्याच्या आजारपणात केलेली उस्तवार आठवली. तापानं फणफणलेल्या अंगावर हात ठेवून आई म्हणायची,'माझा जीव याच्यात आहे.'

आज तिच्या शरीरात जीव नव्हता पण, त्याच्या अंत:करणातील सल मात्र जीवंत होता. आई ही केवळ जन्मदात्री नसते तर ती आयुष्य घडवणारी असते. तिच्या वृद्धत्वात, तिच्या आजारपणात, तिच्या नाजूक अवस्थेतही ती तुमचं बोट धरत नाही. पण, तुम्ही तिचं धरायला हवं. मदर्स डे साजरा करण्याइतका उत्साह जर वृद्ध आईच्या काळजीसाठी, तिला डॉक्टरांकडे नेण्यासाठी दाखवला असता तर, कदाचित तिचे शेवटचे श्वासही मायेने गेले असते. ही गोष्ट कुणाला टोचावी यासाठी नाही तर, आणखी कुणी चुकू नये म्हणून आहे कारण...आई पुन्हा पुन्हा मिळत नाही.

# बंटीची बंडखोरी

**(भाग ५५)**

**प्रीती वडनेरकर** /९८२३९९४७९२



'बंटी, आपल्या फुटबॉल मॅचेस उद्यापासून सुरू होताहेत. सध्या शाळा, कॉलेजला सुट्या असल्याने, रोजच चालू असणार आहेत. आपल्याला खूप सराव करावा लागेल,' यश म्हणाला. 'हो यश, बरोबर आहे तुझं! आपण आपल्या दिनक्रमात थोडा बदल करून, सकाळीसुद्धा फुटबॉलसाठी वेळ देऊ या. नाहीतर आपल्या जिमखाना ग्राउंडवर, सकाळी फक्त नवशिक्यांना ट्रेनिंग दिलं जातं त्यांच्या वेळा विचारून, त्या वेळा टाळून, दुसऱ्या वेळेत आपण मॅचेस खेळू शकतो,' बंटीनं सांगितलं.

'पण आपण तर फक्त सात जण आहोत. टीम पूर्ण व्हायला अजून चार जण लागतात. मग?' शिरीषनं विचारलं. 'आपल्या टीमचं सिलेक्शन झालंय नं? त्यांनाही विचारू या. ते सुद्धा येतील, सरावाला! मॅचेस जिंकायच्या तर जिद्दीनं तेवढी मेहनत ही घ्यायला लागेल. शिवाय, आपल्या कोच सरांनाही विनंती करावी लागेल. आपल्याबरोबर विरूद्ध टीमसुद्धा लागेल,' बंटी म्हणाला. संध्याकाळी फुटबॉल ग्राऊंडवर पोहचल्यावर, कोच सरांशी चर्चा केल्यावर, बरेचसे प्रश्न सुटले. पण मुख्य प्रश्न विरोधी टीमचा राहिला.

ज्यांची टीममध्ये निवड झाली नव्हती, त्या मुलांना कोचसरांनी सकाळी सरावासाठी येण्याची विनंती केली. त्यांनी पुष्कळ आढेवेढे घेतले, लंगड्या सबबी सांगितल्या. शेवटी 'तुमच्यापेकी ज्याचा परफॉर्मन्स उत्तम होईल, त्याला टीममध्ये सामील केलं जाईल,' असा शब्द दिल्यावर कुठे त्यांनी यायची तयारी दाखवली.

मॅचेस सुरू व्हायला जेमतेम आठच दिवस राहिले होते. ज्या मुलांनी विरोधी टीममधे सरावापुरते येण्याची तयारी दाखवली होती, ती टीमच सकाळी गैरहजर राहिली.

सरावाच्या वेळी, चांगला परफॉर्मन्स देऊन निवड होण्याच्या ऐवजी बंटीच्या टीमची कोंडी करून, त्यांचा खेळ खराब करण्यात त्यांना धन्यता वाटत होती. कोचसरांनी त्यांना तंबी दिली,'तुम्ही आता मॅच खेळायला आला नाहीत तर, संध्याकाळी मी तुम्हाला कोचिंग देणार नाही.' आश्चर्य म्हणजे, दहा मिनिटातच त्यांची संपूर्ण टीम ग्राउंडवर हजर झाली. 'नाक दाबलं की तोंड उघडतं' म्हणतात ते का? हे आत्ता तुम्हाला कळलं असेल. बंटी स्वतःशी पुटपुटला. पण, तो जे बोलला ते त्याच्या ग्रुपला बरोबर ऐकू गेलं. सारे गालातल्या गालात हसू लागले.

गेम सुरू झाला. बंटीच्या टीमचे अकरा आणि विरूद्ध टीमचे अकरा असे दोन्ही टीम्सचे बावीस खेळाडू ग्राउंडवर होते. पंच म्हणजेच रेफरीसुद्धा होते. एक सहाय्यक रेफरी होता.

सारं काही, प्रोफेशनल फुलबॉल मॅचसारखं चालू होतं. स्वानंद गोल कीपरचं काम उत्तम तऱ्हेनं सांभाळत होता. नव्वद मिनिटांच्या खेळात, पंचेचाळीस मिनिटं झाल्यावर ब्रेक टाईम होता.

कोचसर प्रत्येक खेळाडूला प्रोत्साहन देत होते. बंटी उंच असल्याने बॉलवरची त्याची पकड सैल होत नव्हती. गोल करण्यात तो यशस्वी होत होता. विरूद्ध पार्टीसुद्धा तयार होती. जिवाच्या आकांताने ते गोल करायचा प्रयत्न करत होते. स्वानंद गोल होऊ देत नव्हता. बॉलला परतवून लावत होता. अखेर दोन गोल्सनी बंटी ग्रुपनं मॅच जिंकली. कोचसरांनी दोन्ही टीमचं अभिनंदन केलं.'मुलांनो, तुम्ही सारेच चांगले खेळलात. पण, फायनल्सपर्यंत पोहचायचं असेल तर, जास्त लवचिकता आणि ताकद यायला हवी. त्यासाठी जास्त व्यायाम करणं आवश्यक आहे. उद्यापासून मॅचच्या आधी ग्राउंडला पाच फेऱ्या, थोडे पुश अप्स करायला हवेत. समजलं?' कोचसरांनी सांगितलं.'यस सर... आमची तयारी आहे,' बंटी आणि त्याचा ग्रुप म्हणाला.

'सर, तुम्ही सांगितलं होतं की, या मॅचमध्ये ज्याचा परफॉर्मन्स चांगला असेल, त्याची टीममध्ये निवड होईल म्हणून! पण, आता तुम्ही काहीच बोलत नाही आहात. म्हणजे सगळ्य थापा होत्या, असं समजायचं का? तुम्ही आम्हाला आमिष दाखवून खेळायला भाग पाडलंत,' विरूद्ध पार्टीचा म्होरक्या सौरभ म्हणाला. 'नाही नाही... मी तुम्हाला शब्द दिला आहे तो नक्की पाळणार. पण खरं सांगू, आज तुमचा परफॉर्मन्स फारसा चांगला नव्हता. म्हणून तर मी सांगतोय, सगळ्यांना वॉर्मिंग अपसाठी भरपूर व्यायाम करणं आवश्यक आहे. म्हणजे तुमच्या हालचालींमध्ये, पळण्यामध्ये, बॉल आपल्याकडे ओढण्यामध्ये सहजता येईल. जेव्हा तुमचा खेळ चांगला होईल, तेव्हा तुमच्यापैकी एकाची नाही तर दोघांची निवड होईल, हा माझा शब्द आहे.' सरांचं बोलणं साऱ्यांनी मनावर घेतलं. ताकद वाढवण्यासाठी व्यायाम सुरू केला.

'बंटी, तुम्ही ग्राउंडवर व्यायाम करता, ते ठीक आहे. पण, घरी योगासनं सुद्धा करत जा, सूर्यनमस्कार घालत जा,' बंटीची आई म्हणाली. 'टी.व्ही.वर बरेच चॅनल्स असे आहेत, ते योगासनांचं, सूर्यनमस्कारांचं ऑनलाईन ट्रेनिंग देतात. त्यांचे ट्रेनर स्वतः करून दाखवतात आणि तुमच्याकडून तसं करूनही घेतात. त्यांच्या वेळा मात्र पाळाव्या लागतात,' आईनं बंटीला मार्ग सुचवला. ' छान सुचवलंस आई... मी बोलतो सगळ्यांशी आणि वेळ ठरवून घेतो,' बंटी म्हणाला.

सकाळी सहाची वेळ साऱ्यांनी ठरवली. बंटीच्या घरी येऊन प्रत्येक जण योगासनांसाठी, सूर्यनमस्कारासाठी प्रात्यक्षिक घेऊ लागला. अंजीर, आक्रोड, मनुका, फ्रूट ज्यूस, मिल्क शेकचं सेवनही सुरू केलं. सूर्यनमस्कारासारखा सर्वांगसुंदर व्यायाम नाही, हे पटलं सगळ्यांना! 'बंटी, खरंच योगासनं आणि सूर्यनमस्कार केल्यावर, वेगळीच ताकद आणि स्फुर्ती आल्यासारखं वाटायला लागलंय,' यश म्हणाला.'आपण पहेलवान झाल्यासारखं वाटतंय. मला तर कुस्ती खेळायची इच्छा होतेय...' शिरीष म्हणाला.

'बाळांनो... अर्ध्या हळकुंडानं पिवळे होऊ नका. हे तर नुस्तं ट्रेलर आहे. पिक्चर अजून बाकी आहे. एवढं खरं आहे की, हा व्यायाम झाल्यावर पूर्ण दिवस ताजं, टवटवीत वाटतं आहे. उत्साह वाढल्यासारखं वाटत आहे, थकल्यासारखं वाटत नाही,' बंटीनं आपला अनुभव सांगितला. बंटी ग्रुप नेहमीप्रमाणे सकाळच्या सरावासाठी ग्राउंडवर पोहचला. 'मुलांनो... एक आनंदाची गोष्ट म्हणजे माझी अहमदाबादच्या युनिव्हर्सिटीत फुटबॉल कोच म्हणून निवड झाली आहे,' सरांनी सांगितलं. साऱ्यांनी टाळ्या वाजवून सरांचं अभिनंदन केलं.

'मला, उद्याच जॉईन व्हायचंय तिथे, मला जावं लागेल,' सर पुढे म्हणाले.'ओह नो, सर तुम्ही जाऊ नका. तुम्ही गेलात तर आमचं काय होईल? नाही, जाऊ नका सर,' सारे जण हळहळले.'मलासुद्धा तुम्हाला अर्धवट मॅचसाठी सोडून जावं जिवावर येतंय. पण, तुमच्यासाठी कोच सरांची व्यवस्था करूनच मी जातोय. ऑल द बेस्ट!' कोचसर गेल्याने, सारेच हिरमुसले होते. पण, त्यांची शिकवण सगळ्यांनी सोडली नव्हती. बंटी ग्रुप एकेक मॅच जिंकत फायनल पर्यंत पोहचला. ग्राउंडवर प्रेक्षकांची गर्दी होती. मॅच अटीतटीची होती. बंटी ग्रुप जोशात दुसऱ्या टीमला हरवायला तयार होता. रेफरीनं शिटी वाजवून बॉलचा ताबा घ्यायला, बंटीला आणि विरोधी पार्टीच्या कॅप्टनला बोलावलं. गेम सुरू झाला. विरोधी पार्टीनं शिरीषच्या पायात पाय घालून त्याला पाडलं. रेफरीनं शिट्टी वाजवून खेळ थांबवला. शिरीष उभा राहू शकत नव्हता. त्याला स्ट्रेचरवरून ड्रेसिंग रूममध्ये नेण्यात आलं.

शिरिष जखमी झाल्याचं पाहून, बंटी ग्रुपचं अवसानच गळालं. विरूद्ध पार्टीची गोलसंख्या वाढली आणि बंटी ग्रुपची खाली येत चालली. इतक्यात, त्यांचे जुने कोच सर आलेले दिसले. साऱ्यांचा उत्साह वाढला. मध्यंतर संपला आणि अचानक जखमांवर बँडेज बांधून शिरीष गेम खेळायला आला. परत उत्साहाचे वारे संचारले. बंटी आणि शिरीषनं गोल करायला सुरूवात केली. गोलची संख्या वाढली आणि बंटी ग्रुप जिंकला. कोचसरांनी त्यांचं अभिनंदन केलं. टाळ्यांच्या कडकडाटात सर्वांनी अभिनंदन केलं. ग्राउंडवर भव्य मिरवणूक काढून, बंटी ग्रुपनं साऱ्यांना अभिवादन केलं.

**क्रमशः**

# ग्रामीण पोलीसांनी काढली सराईत गुन्हेगाराची धिंड



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० जून -**

मोक्कामधून जामीनावर बाहेर येवून एकास मारहाण करत पोलिसांवरच पिस्तूल रोखणाऱ्या सराईत गुन्हेगाराची ग्रामीण पोलिसांनी विष्णूपुरी परिसरात धिंड काढली. तसेच आरोपी विरोधात बिनधास्तपणे तक्रार करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले.

विष्णूपुरी येथील प्रभाकर हंबर्डे याच्यावर दहापेक्षा जास्त गुन्हे दाखल असून, मोक्कामधून तो जामीनावर परत आला आहे. जामीनावर असताना त्याने एकास गंभीर मारहाण केली. मारहाण करुन तो फरार असताना पोलीस त्याचा शोध घेत होते. दरम्यान अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसावरच त्याने पिस्तूल रोखल्याने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी त्याच्या पायावर गोळी झाडून त्यास अटक केली. आरोपी प्रभाकर हंबर्डे याच्यावर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असून, लोकांना पैसे मागणे, खंडणी मागणे, हप्ता मागणे, दरोडा टाकणे अशा स्वरुपाचे गुन्हे दाखल असून या गुन्ह्यामुळे लोकांमध्ये त्याची दहशत निर्माण झाली होती. हि दहशत संपविण्यासाठी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने आरोपी प्रभाकर हंबर्डे याची विष्णूपुरी परिसरातून धिंड काढली. तसेच परिसरातील नागरिक व आरोपीच्या समक्ष पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आरोपी विरोधात तक्रार असल्यास बिनधास्तपणे तक्रार देण्याचे आवाहन करत तक्रारदाराचे नाव गोपनिय ठेवण्यात येणार असल्याचे स्पिकर वरुन सांगितले. तसेच हा किंवा इतर आरोपी त्रास देत असल्यास, गुंडगिरी करत असल्यास ११२ किंवा ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन ओमकांत चिंचोलकर यांनी केले.

# अवैध रेती वाहतुकिविरोधात कारवाई;२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० जून -**

मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दापका गुंडपंत शिवारात रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या एकास मुक्रमाबाद पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून २८ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजू चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक मोरे, सहायक पोलीस उपनिरीक्षक कदम हे दि.२० जून रोजी पहाटे दोनच्या सुमारास गस्त घालत असताना दापका गुंडोपंत रोडवर पोलिसांच्या पथकाला अवैधरित्या रेतीची वाहतूक करणारा हायवा क्र.एमएच-२६-सीएच-६७६७ आढळून आला. पोलिसांनी तपासणी केली असता या हायवामध्ये ४५ हजार रुपयांची विनापरवाना बेकायदेशीररित्या उपलब्ध केलेली नऊ ब्रास लाल रेती आढळून आली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी बाबुराव माने रा.औराद याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला असून, २८ लाखांची हायवा व ४५ हजार रुपयांची नऊ ब्रास लाल रेती असा एकूण २८ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# मुदखेड - बारड रस्त्यावर आयचरच्या धडकेत भाजप कार्यकर्त्याचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२० जून -**



मुदखेड बारड रस्त्यावरिल पार्डी वैजापुर वळण रस्त्यावर आयचर व दुचाकीच्या जोरदार धडकेत दुचाकीस्वार भाजप कार्यकर्त्याचा जागीच मृत्यू झाला.

दि.१९ जुन रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास बारड मुदखेड रस्त्यावरील पार्डी वैजापूर वळण रस्त्यावर बारड कडून भरधाव वेगाने मुदखेड कडे जाणारा आयचर क्रमांक टी एस ०६ यु ए ९१३४ या गाडीने दुचाकी क्रमांक एम एच २६ बी.व्ही. ८१८३ भाजप युवा मोर्चाचे अमोल बबनराव आबादार वय (३०) वर्ष राहणार शारदानगर मुदखेड यांना जोराची धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

महामार्ग पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी म्बुलन्सची व्यवस्था केली परिसरातील कार्यकर्त्यांनी अमोल आबादार यांना उचलून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते परंतू डॉक्टरांनी त्यांना मयत घोषीत केले.

दि. २० जुन रोजी ग्रामिण रुग्णालय येथे शवविच्छेदनानंतर शहरातील बारड रोड येथील हिंदू स्मशानभूमी येथे कै.अमोल आबादार यांच्या पार्थिवदेहावर अंतिम संस्कार करण्यात आले.यावेळी परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर व नवयुवकांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती.

# आषाढी निमित्त पंढरपूरसाठी २५० जादा बसेस

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० जून -**

आषाढी निमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागाच्या वतीने दि.२ ते १३ जुलै या कालावधीत जादा बसेस सोडण्यात येणार असल्याची माहिती नांदेड विभागीय नियंत्रकांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी राज्य मार्ग परिवहन नांदेड विभागाच्या वतीने दि.२ ते १३ जुलै या कालावधीत श्रीक्षेत्र पंढरपूरसाठी जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. दरवर्षी नांदेड जिल्ह्यातून असंख्य भाविक पंढरपूर येथे दर्शनासाठी जातात. या भाविकांची सोय व्हावी यासाठी जादा बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेचा मुख्य दिवस दि.६ जुलै व १० जुलै राहणार आहे. त्यामुळे नांदेड विभागाच्या वतीने पंढरपूर यात्रेसाठी २५० जादा बसेस सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यात नांदेड आगारातून ५०, भोकर-२६, किनवट-१६, मुखेड-३६, देगलूर-३१, कंधार-३६, हदगाव-२१, बिलोली-२६ तर माहूर आगारातून आठ बसेस सोडण्यात येणार असल्याची माहिती नांदेड विभाग नियंत्रकांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### देशपातळीवर अकाश एज्युकेशन सर्विसेस पहिल्या दहा विद्यार्थ्यांत पाच विद्यार्थी

**नांदेड** -अकाश एज्युकेशन सर्विसेस लिमिटेडने नीट परिक्षेत घवघवीत यश संपादन केले असून देशपातळीवर पहिल्या दहा विद्यार्थ्यांत अकाशचे



पाच विद्यार्थी असून नांदेड येथील शाखेचे ३० विद्यार्थी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी पात्र ठरले आहेत. नांदेड शाखेतील समर्थ फुलपगार या विद्यार्थ्यांने देशपातळीवर १५८१ क्रमांक पटकावून मुंबई येथील केईएम वैद्यकीय विद्यालयात प्रवेश घेण्यास पात्र ठरला असल्याची माहिती अकाशचे संचालक अमितकुमार सोनी यांनी एका पत्रकार परिषदेत हि माहिती दिली आहे. पत्रकारांशी बोलताना सोनी म्हणाले की, देशभरात वैद्यकीय शिक्षण व प्रवेश घेण्यासाठी घेण्यात आलेल्या २०२५ या वर्षातील नीट परिक्षेचा निकाल जाहिर झाला आहे. नीट परिक्षेत अखिल भारतीय पातळीवर अकाश एज्युकेशन सर्विसेस लिमिटेडने घवघवीत यश मिळवले आहे. घेतलेल्या नीट परिक्षेत देशपातळीवर पहिल्या दहा विद्यार्थीत ५ विद्यार्थी हे अकाशचे आहेत. आकाशच्या वतीने विद्यार्थांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे. ५५ टक्के विद्यार्थी हे पात्र ठरले असल्याचे सांगितले. नांदेड येथील शाखेचा नीट परिक्षेत निकाल चांगला लागला असून या शाखेचा विद्यार्थी समर्थ फुलपगार हा देशपातळीवर १५८१ क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तसेच तो मुंबई येथील केईएम वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरला आहे. २२० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरले आहेत. ३० टक्के विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरल्याचे सांगितले. या पत्रकार परिषदेला अकाश एज्युकेशन सर्विसेस लिमिटेडचे अनेक प्राध्यापक उपस्थित होते. नीट परिक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थी व पालक यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सहा जणांना पोलीस कोठडी


**माहुर** -दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सहा जणांना सिंदखेड पोलिसांनी मुलतान चिखली येथून घातक हत्यारासह अटक केली होती.



१किनवट न्यायालयाने या आरोपींना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. दि.१९ जून रोजी पहाटे तीनच्या सुमारास सिंदखेड पोलीस गस्त घालत असताना मांडवी रस्ता, सारखणी या मार्गावर ऑटो क्र.टीएस-१६-युडी-२९२४ मध्ये काही जण दबा धरुन बसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी ऑटो थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये शेख फारुख शेख कुर्बान, शेख पाशा शेख हामजा, शेख अजीम शेख अवनाक, शेख गुलफाम शेख शौकत, शेख अफरीदी शेख जैनोद्दीन, शेख जलाल शेख शौकत हे सहा जण घातक हत्यारासह आढळून आले. या सहा जणांविरुध्द सिंदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना किनवट न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने या सहा जणांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. हि कारवाई सिंदखेडचे सहायक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर, पोलीस अंमलदार गजानन कुमरे, सतीश कोंडा पलकुलवार, गोविंद कदम, रघुनाथ मडावी, प्रफुल्ल पवार, संदीप वानखेडे, संजय शेंडे, रवीकांत कांबळे, शाम चव्हाण, ज्ञानेश्वर वेलदोडे यांच्या पथकाने केली.

### उमरी प्रलंबित पाणंद रस्त्याचा अखेर प्रश्न मिटला

**उमरी-** उमरी शहर हदीतील गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला गट क्रमांक १०६ ते गट क्रमांक १३८ मधुन जाणारा पाणंद रस्ता



बऱ्याच काळापासून प्रलंबीत होता माजी नगराध्यक्ष शिवसेना तालुकाप्रमुख सुभाष पेरेवार यांनी पाठपुरावा करून महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत उप विभागीय अधिकारी स्वाती दाभाडे मॅडम, तहसील प्रशांत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील पाणंद रस्त्याचे मार्क आउट टाकून सर्व शेतकऱ्यांच्या समक्ष खूला करण्यात आला आहे . या वेळी नायब तहसीलदार सोलंनकर ,मंडळ अधिकारी बनसोडे मॅडम,भूमी अभिलेख कार्यालयाचे अधिक्षक बि.एस.मुंडलोड, भूमापक बिग.आर.जाधव,तलठी पि.जी.खानसोळे, माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार,माजी उप नगराध्यक्ष म.रफीक सज्जन सेठ,डॉ.विक्रम देशमुख तळेगावकर ,शंकर व्हटकर आणी संबंधित शेतकरी बांधव उपस्थित होते.या पाणंद रस्त्यामूळे बहूतांश शेतकऱ्यांना स्वतः च्या शेतापर्यंत जाण्यासाठी सोईचे झाल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

# तालुका अध्यक्षांच्या निवडीवरुन शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा राजीनामा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२० जून -**

कांही दिवसापूर्वी शिवसेनेचे नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष गिरडे पाटील यांनी शिवसेनेच्या नूतन तालुका अध्यक्षपदाची निवड करण्यात आली होती आता या निवडीविरोधात शिवसैनिकांनी सामूहिक राजीनामे दिले असून शिवसेनेचे शहर प्रमुख अजय टाक यांच्यासह शहर संघटक महेंद्र किनीकर शहर उपप्रमुख चेतन पारठकर शहर उपप्रमुख विठ्ठल सिलेमाने शहर समन्वयक बालाजी पाटील जाधव आदींनी राजीनामा देऊन सदरील राजीनामा पत्र जिल्हाप्रमुख पाटील यांना पाठविण्यात आला असल्याचे सांगितले.

यावेळी शहर प्रमुख अजय टाक म्हणाले की मी शिवसेना या पक्षामध्ये कार्यकर्ता म्हणून काम करणार आहे. माझा शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांवर विश्वास असून जिल्हाप्रमुख गिरडे पाटील हे जिल्हाप्रमुख झाल्यापासून एकवेळाही भोकर शहराला आले नाही. निवडीच्या अगोदर कोणत्याही कार्यकर्त्यांशी साधा संपर्क पण केला नाही. अचानक तालुका प्रमुख निवडण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

# उड्डाण पुलाखालील वाहतुकीचे वाजले तीन तेरा;प्रवाशांचे जीव धोक्यात



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२० जून -**

नागपूर - तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गाच्या महागाव ते वारंगा या टप्प्याचे काम घेणाऱ्या कंत्राटदाराच्या आडमुठ व हुकुमशाही पद्धतीने काम करण्याच्या पवित्र्यामुळे हदगाव जवळील उड्डाण पुलाखालून जाणाऱ्या प्रवाशांच्या जीव अक्षरशा टांगणीला लागले असून या ठिकाणी कोणतेही दिशा फलक, पूर्व सूचनाफलक नसल्याकारणाने प्रवाशांनी आपली काळजी आपणच घ्यावी अशी दंडेलशाहीव हुकुमशाही संबंधित कंत्राटदाराने राबविल्याची चित्र सध्यातरी दिसत आहे.

सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात राहिलेल्या या महागाव ते वारंगा या टप्प्याचे कामाने आतापर्यंत अपूर्ण राहिलेल्या रस्त्यामुळे शेकडो प्रवाशांचा जीव घेतला आहे परंतु या कंत्राटदाराने उड्डाण पुलाखालील उमरखेडहून सरळ येणारी वाहतूक हदगाव शहरात येऊन पुढे जात असताना या कंपनीच्या बिनडोक अभियंतांनी तो रस्ता बंद करत कच्च्या रस्त्याने तो वाहतूक पुढे उड्डाणपुला खाली वळवुन त्या ठिकाणीच उमरखेड हुन येणारी वाहतूक चालू आहे. या ठिकाणी भविष्यात एखादा भीषण अपघात होण्याची दाट शक्यता असून त्याच जबाबदार कोण राहणार असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. सदर उड्डाण पुलाखाली कोणतेही दिशा फलक, सूचनाफलक नसल्याकारणाने वाहनधारकात कमालीचे असंतोष पसरत आहेत तरी एकेरी वाहतूक चांगल्या रस्त्याने करावे व ज्या ठिकाणी दिशा फलक लावण्याची गरज त्या ठिकाणी संबंधित कंपनीने फलक लावून प्रवाशांची सुरक्षेतेची विशेष लक्ष द्यावे अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

# किनवट-माहूरातील महावितरणचा बेजबाबदार कारभार

## आ. भीमराव केराम यांनी उघड केली परिस्थिती रिक्त पदांमुळे खोळंबलेला वीजपुरवठा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२० जून -**



आदिवासी बहुल किनवट व माहूर तालुक्यांमध्ये विजेचा लपंडाव थांबायचे नाव घेत नाही, ग्रामीण भागात चार ते पाच दिवस विजेअभावी अंधाराचे साम्राज्य असते, आणि महावितरण मात्र गाढ झोपेत आहे. या पार्श्वभूमीवर किनवट-माहूर विधानसभा क्षेत्राचे आमदार मा. भीमराव केराम यांनी तातडीने हस्तक्षेप करत, महावितरणच्या मुख्य अभियंत्यांकडे लेखी पत्र देत रिक्त अधिकारी व तांत्रिक पदे तातडीने भरण्याची जोरदार मागणी केली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, किनवट व माहूर उपविभागात उपकार्यकारी अभियंता ही अत्यंत महत्त्वाची दोन पदे गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत. शिवाय सहाय्यक अभियंते आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या जागाही भरल्या जात नसल्याने, विजेचा पुरवठा वेळेवर होणे तर दूरच, नागरिकांच्या तक्रारी ऐकायलाही कोणी नसल्याचे चित्र आहे.

महावितरणच्या ढिसाळ व्यवस्थापनाचा बळी ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांना आधीच अस्थिर विजपुरवठ्यामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागतोय. पावसाळा सुरू होऊनही वीज उपलब्ध न होणे म्हणजे शेती, पाणीपुरवठा आणि रोजच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. पण याकडे महावितरण दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट दिसून येते.

नागरिकांमध्ये संताप अधिकाऱ्यांची अनुपस्थिती आणि कर्मचाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे कामचुकारपणा बळावला आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही. आ. केराम यांनी हे वास्तव अधोरेखित करत, प्रशासनाला जबाबदारीने काम करण्याची आठवण करून दिली आहे.

राजकीय हस्तक्षेपानंतरही प्रशासन मौनात! सर्वसामान्य जनतेचा प्रश्न उपस्थित करूनही महावितरण प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कृती केलेली नाही. यावरून महावितरणची निष्क्रियता व जबाबदारीशून्यता उघड झाली आहे. आ. केराम यांनी मागणी केली असली तरी खालील पातळीवर यंत्रणा अजूनही 'अभावाची'च आहे, ही बाब निदर्शनास आली आहे. महावितरण प्रशासनाने वेळीच जागे होऊन रिक्त पदे तातडीने भरावीत, अन्यथा विजेचा लपंडाव संपणार नाही, आणि नागरिकांचा रोष महावितरणच्या अकार्यक्षमतेविरोधात उफाळून येईल, हे निश्चित. आ. भीमराव केराम यांचे पाऊल नागरिकांच्या अपेक्षांचे प्रतिनिधित्व करणारे असून, यावर तत्काळ कार्यवाही होणे गरजेचे आहे.



**लोहा - अनेक वर्षाची कायम परंपरा ठेऊन साधू महाराज यांची कंधार ते पंढरपूर पायी दिंडीचे शहरातुन मार्गस्थ होताना माजी उपनगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार,भाजपचे शरद पाटील पवार व लक्की फुलवरे मित्र मंडळ, कळसकर यांनी स्वागत दिंडीतील भाविकांना खाऊ वाटप केले.**

# नायगाव तालुक्यात खरीप पेरण्या सुरू सोयाबीन पेरणीस उत्साह ; आता पावसाची प्रतिक्षा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२० जून -**

तालुक्यात मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून झालेल्या दोन-तीन वेळा जोरदार पावसानंतर व जून महिन्याच्या सुरुवातीला झाले ल्या मान्सून पावसामुळे जमिनीत चांगला ओलावा टिकून आहे. यामुळे नायगाव, छत्री शेळगाव, कोकलेगाव, नरसी, कुंचेली, धुप्पा, शेळगाव गौरी, होटाळा, कांडाळा, धानोरा, मरवाळी,मरवाळी तांडा, बेंद्रीखंडगाव, कोपरा या गावांतील अनेक शेतकऱ्यांनी ११ जूनपासून खरीप हंगामातील पेरण्या सुरू केल्या आहेत.

तालुक्यातील ग्रामीण भागातील छोट्या जिरायत जमिनदारांनी मान्सूनच्य पहिल्याच पावसात पेरणी केल्याने प्रत्येक गावागावांत शेतांमध्ये बियाण्यांची उगवण चांगल्या प्रकारे झाल्याचे दिसून येत आहे. मान्सूनच्या मुहूर्तावर केदरवडगांव येथील जिरायत जमिनदार संभाजी जाधव यांनी आपल्या शेतात सोयाबीनची यशस्वी पेरणी केली आहे. तसेच, नरसी सह नरसी तांडा येथील शेतकरी बळीराम पवार यांनीही



सोयाबीनची लागवड केली असून त्यांचे पीक उगवून येताना चांगले दिसत आहे. बेंद्री खंडगाव येथील शेतकरी पांडुरंग पाटील यांनीही खरीप पेरणीस सुरुवात केली आहे. मात्र,गेल्या काही दिवसांपासून दूपार नंतर आकाशा त काळे ढग दाटून येत असले. तरी पाऊस काही पडत नसल्यामुळे जमिनी तील ओलावा वरचे वर कमी होत चालला आहे. उगवलेली कोवळी मोडके ही आता पाण्याच्या प्रतीक्षेत जमिनीच्या कुशीत वार्-याच्या झोकात डुलताना दिसत आहेत. तर दूसरीकडे तालुक्यातील काही छोटे जिरायत शेतकरी वर्ग सध्या चिंतेत असून लवकरात लवकर पाऊस पडावा हीच छोट्या शेतकरी वर्गाची अपेक्षा आहे.

# कौडगाव ग्रामस्थांना हर घर जलचा हक्क मिळवून देणारी जलजीवन योजना पूर्ण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० जून -**

उमरी तालुक्यातील गोदावरी काठावरील कौडगाव या सुमारे ६३२ लोकसंख्येच्या गावात जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेली ८१.५२ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली असून, सदर योजनेचे संचालनाची जबाबदारी आता ग्रामपंचायतीकडे सुपूर्त करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत आधीपासून अस्तित्वात असलेल्या उद्धभव विहिरीचे खोलीकरण करून, त्यावर नवीन पंप हाऊस उभारण्यात आले. विहिरीपासून मुख्य टाकीपर्यंत अंदाजे अडीच किमी अंतरापर्यंत ५ इंची पाईपलाईन टाकण्यात आली आहे. तसेच गावामध्ये ४८ हजार लिटर्स क्षमतेची पाण्याची साठवण टाकी उभारण्यात आली आहे.

# पोलिसांवर हल्ला करुन धाडीत पकडलेले ट्रॅक्टर घेऊन वाळू माफिया पसार

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.२० जून -**

माहूर तालुक्यातील पैनगंगेच्या पात्रातील अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांची दादागिरी आता शिगेला पोहोचली असून, ग्राम महसूल अधिकाऱ्याने अवैध वाळू साठ्यावरुन वाळू भरत असलेला एक टिप्पर ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांना धक्का मारून ट्रॅक्टर पळवून नेल्याची १८ तारखेची घटना ताजी असतानाच १९ जून रोजी दिगडी ( कु.) येथे माहूर पोलिसांनी धाड टाकून पैनगंगा नदी पात्रातून अवैध वाळूने भरलेला विना नंबरचा ट्रॅक्टर व विना नंबरची मोटारसायकल ही वाहने ताब्यात घेतली असता वाळू माफियांनी काठ्या व रॉड घेऊन चक्क एका पोलिस कर्मचाऱ्यास शिविगाळ व थापडबुक्क्यांनी मारहाण करत जखमी करून ट्रॅक्टरमधील वाळू खाली टाकून नदीच्या सहाऱ्याने ट्रॅक्टर घेऊन पसार झाल्याची आणखी एक खळबळजनक घटना घडल्याने वाळू माफिया विरुद्ध महसूल प्रशासन अधिक पोलिस प्रशासन असा तिहेरी संघर्ष पेटला आहे.

माहूर तालुक्यातील मौजे दिगडी (कु.) येथील शेतशिवारात पैनगंगा नदी पात्रावर असलेल्या मोठ्या बंधाऱ्याच्या समोरील भागातून अवैधरित्या वाळू उपसा करून ट्रॅक्टरमध्ये भरून चोरी करत असताना

पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी पोलिस उपनिरीक्षक संदीप अनेबोईनवाड व इतर पोलिस अंमलदार यांनी छापा कार्यवाही करुन वाळूची चोरटी वाहतूक करणारा विना पासिंग नंबरचा ट्रॅक्टर व विना नंबरची मोटारसायकल रंगेहाथ पकडून ताब्यात घेऊन माहूर पोलीस स्टेशनच्या दिशेने आणत असताना

यातील वाळू माफियांनी गैरकायदेशिर जमाव जमवून शासकीय कामात अडथळा निर्माण करत वेगवेगळ्या मोटारसायकलवर हातात काठ्या व रॉड घेऊन सदरील ट्रॅक्टर समोर येवून तो अडवला आणि थेट एका पोलिस कर्मचाऱ्यास धक्काबुक्की करुन चक्क शर्टचे कालर पकडून ट्रॅक्टरच्या खाली खेचले व सदरील पोलिस कर्मचाऱ्यास रेती तस्करांनी हात पकडून शिविगाळ करत थापडबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले व वाळूने भरलेला ट्रॅक्टर रिकामा करून तो घेऊन पळून जात असताना पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी आपल्या पथकासह जवळपास तासभर वाळू तस्करांचा सिनेस्टाईल पाठलाग केला. मात्र नदीचा सहारा घेऊन वाळू चोरटे ट्रॅक्टर घेऊन पसार झाले. ही घटना दि.१९ रोजी सकाळी ०९ त १० वाजताच्या दरम्यान घडली आहे.

दिगडी ( कु) गावाजवळ रेती तस्करांनी गैरकायद्यायची मंडळी जमवून वेगवेगळ्या मोटर सायकल ने हातात लाठ्या काठ्या रॉड घेऊन ट्रॅक्टर समोर येऊन पोलिसांना अडवून धक्का बुक्की करून पोलिस कर्मचारी पवन राऊत यांची कॉलर धरून ट्रॅक्टर च्या खाली खेचत मारहाण करून जखमी केले व ट्रॅक्टर पळवून नेला.या वेळी पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी ट्रॅक्टर चा सिनेस्टाईल एक तास पाठलाग केला मात्र तस्करांनी आपले वाहन नदीच्या व जंगलाच्या दिशेने अवघड रस्त्याने नेल्याने सापडून आले नाही.या प्रकरणी शाकीर खान , बाबर खान,नंदू वानखेडे, रफिक नवाब, व इतर तीन अनोळखी इसम विरुद्ध माहूर पोलिस ठाण्यात शासकीय कामात अडथळा निर्माण करणे व गैर कायद्याची मंडळी जमवून लोकसेवकावर हल्ला करणे अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी ७० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून पुढील तपास पोउनि संदीप आनेबोईनवाड हे करीत आहेत.

# ऊस उत्पादकांसाठी नवीन तंत्रज्ञानाची पाहणी

## इंडिया-ब्राझील शुगर अँड बायो एनर्जी मिशन अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ जून**

जगातील सर्वाधिक ऊस उत्पादन करणारा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्राझीलमध्ये आयोजित 'इंडिया-ब्राझील शुगर ॅड बायो एनर्जी मिशन' या अभ्यास दौऱ्यात बीडचे खा.बजरंग सोवणे यांनी सहभाग नोंदविला आहे. दि.१५ जून पासून एक आठवड्याचा हा अभ्यास दौरा आहे. ब्राझिलमध्ये ते ऊस उत्पादकांच्या फायद्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची पाहणी करत आहेत.

भारताच्या नॅशनल शुगर फेडरेशनच्या पुढाकाराने आयोजित या दौऱ्याचा उद्देश ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून साखर व सहउत्पादनांच्या माध्यमातून उद्योगास उभारी देणे, तसेच नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने ऊस उत्पादकांना अधिक समृद्ध बनविणे हा आहे. या अभ्यास दौऱ्यात राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजलगाव छत्रपती साखर कारखान्याचे चेअरमन मोहन जगताप तसेच



नॅशनल शुगर फेडरेशनचे विविध तज्ञ सहभागी झाले आहेत. साखर उद्योगासाठी लागणारे नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, जैवऊर्जा निर्मितीची प्रगत साधने आणि सहउत्पादनांच्या नव्या शक्यता यांचा सखोल अभ्यास या मिशनच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. ब्राझीलच्या अनुभवातून आपण भारतीय साखर उद्योगाला अधिक सक्षम बनवू शकतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी हे तंत्रज्ञान आणि योजना भारतात लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती होणे आवश्यक असून नवनवीन तंत्रज्ञानातून ऊस उत्पादकांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल घडू शकतो, यासाठीच आपण अभ्यास दौऱ्यावर आलो असल्याचा उल्लेखही खा.बजरंग सोनवणे यांनी आवर्जून केला आहे.


# संतश्रेष्ठ गजानन महाराजांच्या पालखीचे वैद्यनाथ नगरीत उत्स्फूर्त स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० जून**

संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या पालखीचे आज (दि. २०) प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत आगमन होताच परळी शहरात हरिनामाचा गजर दुमदुमला. सकाळी औष्णीक विद्युत केंद्रातील शक्तीकुंज वसाहतीतून पालखी सोहळा निघाला आणि शहराच्या दिशेने मार्गस्थ झाला. या पवित्र सोहळ्याचे शहरातील भाविकांनी जल्लोषात स्वागत करत श्रींचे दर्शन घेतले.

# श्री संत मुक्ताबाई पालखीचे गेवराईत स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२० जून**

आषाढी वारीसाठी हरिनामचा गजर करत जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथून निघालेल्या श्री संत मुक्ताबाई पालखीचे गुरुवार रोजी सायंकाळी ६ वाजता वडीगोद्रीमार्गे गेवराई शहरात आगमन झाले. शहरातील चिंतेश्वर महादेव मंदिर येथे आरतीनंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. शुक्रवारी पहाटे पालखी पाडळसिंगीकडे प्रस्थान झाली.

बुधवारी वडीगोद्री येथे मुक्काम करून पालखीने गुरुवारी पहाटे गेवराईकडे प्रस्थान केले. सकाळी शहागड येथील गोदावरी नदीत पादुकांचे स्नान घालण्यात आले. सायंकाळी ६ वाजता गेवराई शहरात आल्यानंतर भाविकांनी रस्त्यावर रांगोळी काढून, फुले टाकून पालखीचे स्वागत केले. पालखीतील वारक-यांना जेवणाची सोय गेवराई येथील भाविकांच्या वतीने करण्यात आली होती.

# जिल्हाभरात दि.२१ जून रोजी योग दिन नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जून**

जिल्हयात दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले असून जिल्हा क्रीडा संकुल, जालना रोड, बीड येथे सकाळी ६.३० वाजता या कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, योग साधक, विद्यार्थी, युवक युवती, नागरीक आदींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

तालुकास्तरावरून देखील मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येणार आहे. सदर नियोजनासाठी प्रशासनाबरोबरच पतंजली योगपीठ, योगा असोसिएशन, योगा संघटना आणि विविध सामाजिक संस्था सहभागी होणार आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केलेला आहे. पाच हजार वर्षांपासून अधिक परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देगणी असून व्यक्तीच्या शारिरीक आणि आत्मिक विकासासाठी योग विद्या सहाय्यभूत ठरते. जागतिक योग दिनाचे आयोजन करताना देशभर व जगातील विविध देशात देखील याचे कायक्रम केले जातात. यामध्ये सकाळी ६.३० ते ८.०० या कालावधीत सामूहीक योगाची प्रात्यक्षिके करणे आणि त्याबाबत जनजागृती घडवून सर्वसामान्य व्यक्तीस याचे महत्त्व पटवून देणे, यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो. यामुळे जिल्हयामध्ये देखील योग दिनानिमित्त समाजातील सर्व स्तरावरील महिला, पुरुष, युवक-युवतींनी यामध्ये सहभाग घ्यावा.

योग दिनाच्या पुर्वतयारी बाबत बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी एन.जी. हजारे, ए. बी. खेडकर, जिल्हा आयुष अधिकारी आनंद लिमकर, पतजंली योगपीठाचे जिल्हा प्रमुख ॲड. श्रीराम लाखे, जिल्हा योगा असोसिएशनचे सचिव विनायक वझे, क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य पुरस्कारार्थी प्रा. जे.पी. शेळके, डॉ. अविनाश बारगजे, योगगुरू विकास गवते, भागवत वाघ, मयुरेश गावस्कर, क्रीडा अधिकारी अनकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिश राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक आदी उपस्थित होते. तालुक्याच्या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करताना तहसिलदार नोडल अधिकारी म्हणून, गटविकास अधिकारी हे सह नोडल अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी हे सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.ग्रामीण भागातील तालुक्याचे ठिकाण आणि बीड शहराचे ठिकाण वगळता इतर गावांमधील शालेय विद्यार्थी व नागरिकांसाठी त्या त्या गावामध्ये तसेच शाळा, विद्यालये, महाविद्यालये या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करावे बाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे.

# पाली येथील नागनाथ मंदिरात पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी अखंड अन्नछत्र व प्रथमोपचार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जून**

शुक्रवारी पाली येथील नागनाथ मंदिर येथे पंढरपूर जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांसाठी अखंड अन्नछत्र व प्रथमोपचार उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्यासाठी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर तसेच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, मारुती खेडकर, तसेच पाली ग्रामस्थ राहुल नवले, बाबासाहेब नवले, वैजीनाथ नवले, जालिंदर नवले, अनिल साळुंके, मधुकर नवले यांची उपस्थिती होती. तसेच रतिलालजी दुगड, अशोक तिवारी, किशोर बाहेती, राजू राठी, गोविंद मुंदडा, गोटू घोलप यांची उपस्थिती होती. यावेळी पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते पहिल्या ३ दिंडीचे प्रमुख ह.भ.प.सुधाकर महाराज मेहुणकर (मुक्ताबाई देवस्थान मेहुण), ह.भ.प.कृष्णा महाराज गिरी (चैतन्य कानिफनाथ महाराज पायी दिंडी सोहळा), ह.भ.प.रमेश महाराज(वै.सद्गुरू मुकुंद महाराज इंगावनकर) यांचे स्वागत करण्यात आले.यावेळी संतोषजी सोहनी यांनी सर्वांचे आभार मानले.

# आ.संदीप क्षीरसागर शहरात 'ऑनफील्ड'

## शहरातील विविध कामांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जून**

शहरातील नागरी प्रश्न आणि कामे मार्गी लागावेत यासाठी आ.संदीप क्षीरसागर, शहरातील विविध भागांमध्ये दररोज जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत. यासोबतच सुरू असलेल्या कामांकडे लक्ष ठेवून आहेत. गुरूवारी (दि.१९) रोजी आ.क्षीरसागर यांनी शहरात सुरू असलेल्या विविध कामांच्या ठिकाणी भेटी देऊन संबंधितांना सुचना दिल्या.

बीड शहरात खासबाग ते मोमीनपुरा भागाला जोडणार्या पूल बांधणीचे सर्वेक्षण करण्यासाठी अभियंत्यांचे पथक आले होते.



यावेळी आ.क्षीरसागर यांनी अभियंत्यांसोबत जाऊन या ठिकाणी पाहणी केली. याठिकाणी मजबूत आणि भविष्यात दिर्घकाळ टिकणार्या पुलाचे बांधकाम होणार असल्याचे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. तसेच शहरातील बार्शी नाका ते विधी महाविद्यालयापर्यंत ३३ के.व्ही. विद्युत मार्गिकेचे काम सुरू होत आहे. याठिकाणचीही आ.क्षीरसागर यांनी पाहणी करून संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना केल्या. यासोबतच कारंजा ते जुनाबाजार परिसरात नगरपालिकेकडून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याठिकाणी आ.संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, संबंधित यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## ऑनलाइन घरकुलासाठी कोणालाही पैसे देऊ नये-नवनाथ शिराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ जून**

सध्या घरकुल ऑनलाईन करण्याची प्रक्रिया १८ तारीख असल्याचे समजते तरी काही दलाल गोरगरीब लोकांना अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून लोकांच्या खिशावर अधिकाऱ्याच्या संगणमताने डल्ला मारण्याचे काम करत असल्याचे सध्या दिसत आहे तरी अशा दलालखोर लोकांना कोणीही पैसे देऊ नयेत ऑनलाईन प्रक्रिया ही स्वतः सेल्फ आपल्या मोबाईल वरती करण्यासाठी मोदी सरकारने लोकांच्या हितासाठी ही योजना केलेली आहे एका मोबाईल वरती एकच घरकुल ऑनलाईन करता येते या घरकुल योजनेच्या वेबसाईटवर जाऊन त्या ठिकाणी आपले आधार लिंक नंबर टाकून नाव नोंदणी करण्यात यावी याच्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला व त्याच्या दलाला कोणत्याही नागरिकांनी पैसे देऊ नयेत जर कोणी पैसे मागण्याचा प्रयत्न करत असेल तर डायरेक्ट आमच्याशी संपर्क साधावा किंवा पोलीस प्रशासनाचे अँटीकरप्शन पोलीस यांच्याशी संपर्क करावा.

# स्वत:साठी आणि समाजासाठी योग – आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५

२१ जून हा दिवस आता फक्त खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा राहिलेला नाही , तर मानवी जीवनात शारीरिक , मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्याच्या जागृतीचा एक जागतिक उत्सव म्हणून ओळखला जाऊ लागला आहे . दरवर्षी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय योग दिन हा आधुनिक युगातील व्यापक आरोग्य चळवळींपैकी एक झाला आहे . २०२५ मध्ये या दिनासाठी निश्चित करण्यात आलेली संकल्पना आहे – स्वत:साठी आणि समाजासाठी योग . या घोषवाक्यामुळे आपल्याला योगविद्येच्या व्याप्तीचा खरा अंदाज येतो.

मानवाच्या एकूण कल्याणाचा विचार केल्यास , योग हे फक्त शरीर तंदुरुस्त ठेवण्याचे साधन नसून ते मानसिक स्वास्थ्य , भावनिक स्थैर्य , आणि सामाजिक समरसतेचंही मूळ आहे . ' स्वत:साठी योग ' या विचारामध्ये आत्मशुद्धी , मन:शांती , आणि अंतर्मुखता येतात . दुसरीकडे , 'समाजासाठी योग' हा दृष्टिकोन आपल्याला परस्परसंबंध , सहअस्तित्व , आणि सामूहिक स्वास्थ्याकडे नेतो . आजच्या तणावपूर्ण आणि धकाधकीच्या जीवनात ही समन्वयाची भावना अधिक आवश्यक ठरते.

योग ही भारताने जगाला दिलेली एक अनमोल देणगी आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या साधनेने अनंत ऋषी , योगी आणि संतांना जीवनाच्या गूढ अर्थांशी जोडले , समृद्ध केले . आज जगभरात योगविद्येच्या विविध प्रकारांचा अभ्यास करणाऱ्या लोकांची संख्या कोट्यवधींच्या घरात आहे . योगाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील सार्वत्रिकता – कोणत्याही वयाचा , धर्माचा , सामाजिक स्तराचा माणूस योगाभ्यास करू शकतो . त्यात कोणताही भेदभाव नाही . योगाची ही समावेशकता आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या व्यापक यशामागील खरी प्रेरणा ठरते .

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व वर्षानुवर्षे वाढतच चालले आहे . सरकारी संस्था , शिक्षणसंस्था , सामाजिक संघटना , तसेच खासगी



उद्योग सुद्धा या दिवशी सामूहिक योग सत्रांचे आयोजन करतात . काही ठिकाणी हे उपक्रम आठवडाभर चालतात . अनेक शहरांमध्ये हजारो लोक एकत्र येऊन उद्याने , मैदानं , समुद्रकिनारे , तसेच ऐतिहासिक स्थळांवर एकत्र योग करतात . अशा सत्रांमध्ये सामाजिक सलोख्याचाही अनुभव येतो . योग दिनाच्या निमित्ताने लोकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढते . व्यायामाची सवय लागते . शाळा – महाविद्यालयांमध्ये योग शिकवण्याची चळवळ गतिमान होते . काही संस्था तर नियमित योगशिक्षणाचा कार्यक्रम राबवतात . ग्रामीण भागातही या दिवशी आरोग्य शिबिरे घेतली जात आहेत . विशेष म्हणजे या सगळ्याचा व्यावसायिक हेतू नसतो . हा दिवस एका शुद्ध , नि:स्वार्थी आरोग्य प्रेरणेचा अविष्कार असतो .

२०२५ मधील संकल्पना – स्वत:साठी आणि समाजासाठी योग – अत्यंत समर्पक आहे . एरव्ही अनेकदा आरोग्यविषयक उपक्रम स्वत:पुरतेच मर्यादित राहतात . पण या थीमनुसार योगाचा प्रभाव व्यक्तिगत आरोग्यापलीकडे जातो . आपण जर शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून सुदृढ असू , तर आपण समाजात अधिक सकारात्मक भूमिका बजावू शकतो . आपण इतरांच्या मदतीला धावून जाऊ शकतो , संयमी संवाद साधू शकतो , आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेत समर्पक भूमिका घेऊ शकतो .

आज जगभरात अनेक समाज विकोपाला जात आहेत , त्यामागे वाढती असहिष्णुता , संवादाचा अभाव , आणि मानसिक अस्थैर्य ही कारणं आहेत . योगाद्वारे व्यक्तीच्या मनोवृत्तीमध्ये जो स्थैर्य आणि समजुतदारपणा येतो , तोच समाजात दीर्घकालीन शांती साधू शकतो . म्हणूनच ' समाजासाठी योग ' ही संकल्पना व्यक्तिगत आरोग्याच्याही पलीकडे जाते , महत्त्वाची ठरते .

या दिनानिमित्ताने आपण आपल्या जीवनशैलीबद्दलही आत्मपरीक्षण करतो . झपाट्याने बदलणाऱ्या जीवनाच्या गतीमुळे आपल्या सवयी , आहार , झोप , आणि विचार यांच्यावर दुष्परिणाम होतो . योगाद्वारे या सगळ्यांत शिस्त , संतुलन , आणि जागरूकता निर्माण करता येते . काही काळ नियमित योग केल्यानंतर अनेक जण सांगतात की त्यांना केवळ शरीर सुदृढ वाटते असेच नाही , तर निर्णयक्षमता , स्मरणशक्ती , आणि आत्मविश्वासही वाढल्याचे जाणवते . हे सगळं ' स्वत:साठी योग ' या विचारात सामावलेलं आहे .

शालेय शिक्षणातही योगाचा समावेश आवश्यक आहे. लहान वयातच जर मुलांना योग , प्राणायाम , आणि ध्यान शिकवले , तर ते अधिक शांत , अभ्यासक्षम , आणि सहृदय होतील . बालवयातील मानसिक आरोग्याचे अनेक प्रश्न आज गंभीर होत चालले आहेत . यावरही योग हा एक निसर्गसंपन्न उपाय ठरू शकतो.

ज्या समाजात वृद्धांची काळजी घेतली जाते , तिथेही योग महत्वाची भूमिका बजावतो . वृद्धांसाठी साधे योगासन , श्वसन तंत्र , आणि शांत ध्यान यांचा उपयोग शारीरिक वेदना , निद्रानाश , आणि चिंता कमी करण्यासाठी होतो . अनेक ज्येष्ठ नागरिक केंद्रांमध्ये योग सत्र आयोजित केले जातात. हे कार्यक्रम केवळ आरोग्यासाठी नसतात , तर सामाजिक संवादासाठीही उपयुक्त ठरतात.

मानसिक आरोग्य या विषयावर जगभर चर्चा होते आहे . योग ही मानसिक आरोग्यासाठी अमूल्य साधना आहे . नैराश्य , चिंता , आणि अस्थिरतेपासून दूर राहण्यासाठी ध्यान आणि श्वसनावर आधारित तंत्र अत्यंत उपयुक्त आहे . आंतरराष्ट्रीय योग दिन मानसिक आरोग्याच्या चर्चेलाही सकारात्मक दिशा देतो . शिवाय , पर्यावरण आणि योग यांच्यात एक अदृश्य परंतु दृढ संबंध आहे . निसर्गाच्या सान्निध्यात योग करणं , किंवा निसर्गस्नेही जीवनशैली स्वीकारणं , हे योगदृष्टीने आदर्श मानलं जातं . योग हे केवळ व्यायाम नसून जीवनाच्या सर्व पैलूंचा समन्वय साधणारे तंत्र आहे . हे तत्त्व आपण पर्यावरणाच्या बाबतीतही लागू करू शकतो – म्हणजेच योगामुळे केवळ मनुष्यच नाही तर निसर्गही संरक्षित राहू शकतो.

या दिवशी आपण योगाच्या मूळ भारतीय संदर्भांकडेही पाहायला हवे . योग ही संकल्पना आपल्या ग्रंथांमध्ये 'योगः कर्मसु कौशलम्' या रूपात मांडलेली आहे . म्हणजेच कर्मात कौशल्य म्हणजेच योग . आपले दैनंदिन जीवनही जर समतोल आणि सजगतेने जगता आले , तर ते स्वतःच एक योगसाधना होईल.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे , आंतरराष्ट्रीय योग दिन हा कोणत्याही धर्माचा उत्सव नाही . तो सर्व धर्मांपलीकडचा , सर्व संस्कृतींसाठी खुला असा उत्सव आहे . हा दिन एकजुटीचा , सहजीवनाचा , आणि आत्मशुद्धीचा उत्सव आहे . त्यामुळे जगभरातील कोट्यवधी लोक हे सगळे मतभेद बाजूला ठेवून एकाच वेळी , एकाच श्वासात एकत्र येतात . हाच त्याचा खरा गाभा आहे – एकात्मतेचा अनुभव.

आज , २०२५ मध्ये , आपण या दिवसाकडे केवळ एक दिवसापुरता कार्यक्रम म्हणून न पाहता , एक जीवनशैली म्हणून स्वीकारायला हवे . स्वत:साठी आणि समाजासाठी योग हे घोषवाक्य म्हणजे एक दीर्घकालीन दृष्टिकोन आहे . जेव्हा प्रत्येक माणूस स्वतःच्या जीवनात योग घडवतो , तेव्हा समाजात शांती आणि समृद्धी आपोआप फुलू लागते .

आंतरराष्ट्रीय योग दिन हा शारीरिक आरोग्याचा , मानसिक स्थैर्याचा , आणि सामाजिक समरसतेचा एक संगम आहे . २०२५ सालातील संकल्पना आपल्याला या तीनही स्तरांवर चिंतन करण्यास प्रवृत्त करते . हा दिवस नुसता साजरा न करता , त्याने दर्शवलेली दिशा स्वीकारणं – हाच खरा योग आहे . प्रत्येक व्यक्ती जर स्वत:ला सशक्त करून समाजासाठीही सकारात्मक योगदान देईल , तर जग अधिक समंजस , शांत , आणि सुजाण होईल .

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनला नुकतेच बदली झालेले समीर मुजावर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२० जून**

बीड येथून आंबेजोगाई शहर पोलीस स्टेशनला बदली होऊन आलेले समीर मुजावर यांचे आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यातील पोलिसांची मलिन झालेली प्रतिमा सुधारण्याच्या उद्देशाने मागील महिन्यात २६ मे रोजी जिल्ह्यातील ६०३ पोलीस कर्मचाऱ्यांच्या एकाच वेळी ते कार्यरत आसलेल्या तालुक्याच्या बाहेर बदल्या करून पोलीस खात्या मध्ये बॉम्ब उडवून दिला.

या बदलीने असंख्य पोलीस कर्मचारी नाराज होते. या नाराजी नाट्या मधून काही कर्मचाऱ्यांनी मॅट कोर्टात धाव घेतली आहे. अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनलाही २६ पोलीस कर्मचारी बदली होऊन आलेले असून या पैकी बार्शी येथील रहिवासी असलेले समीर मुजावर (वय ४२) हे ही रहिवासी असलेले समीर मुजावर (वय ४२) हे ही

एक होते. मुजावर हे बार्शीचे राहिवासी असल्याने त्यांचा स्व जिल्ह्यात म्हणजे सोलापूर जिल्ह्यात बदली साठी प्रयत्न सुरु होता. मागील २ दिवस ते पोलीस स्टेशनच्या कामासाठीच मंबईला गेले होते आणि रात्रीच परत अंबाजोगाईला आले होते. आज आपल्या अन्य सहकाऱ्यां सोबत चनई रोडवरील किरायाने



घेतलेल्या रूममध्ये मुजावर असतानाच त्यांना हृदयविकाराच्या तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे दुःखद निधन झाले. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात सध्या त्यांच्या शवविच्छेदची प्रक्रिया सुरु असून त्यांच्या पश्चात पत्नी २ मूले व अन्य परिवार आहे. मुजावर यांच्या दुःखद निधना मूळे पोलीस वर्तुळात हळहळ व्यक्त होतं आहे.